CMYK

सोलापूर
# तरुण भारत
SOLAPUR TARUN BHARAT
न मे कर्मफले स्पृहा
सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित

सोलापूर | मंगळवार, २९ जुलै २०२५ | युगाब्द ५१२७ | वर्ष ४१ वे अंक २६० | पाने १२ | किंमत रु. ६/-

| RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |
ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही

dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com

### विचारपुष्प



सेवा म्हणजे स्वत:स विसरून समाजासाठी, राष्ट्रासाठी काम करणे. ही सेवा म्हणजेच आमचे जीवन आहे. शुद्ध विचारांना कृतीची जोड हवी. केवळ बोलून किंवा वाचून राष्ट्र निर्माण होत नाही.
**– हस्तीमल,**
रा. स्व. संघाचे पूर्व अ. भा. संपर्क प्रमुख

### आज नागपंचमी



# दिव्या जगज्जेती

## मराठमोळ्या दिव्या देशमुखने घडविला इतिहास

### महिला बुद्धिबळ विश्वचषक जिंकणारी पहिली भारतीय!

### ग्रॅण्डमास्टर होणारी केवळ चौथी भारतीय महिला



**बटुमी, २८ जुलै**

भारतीय बुद्धिबळपटू नागपूरच्या दिव्या देशमुखने सोमवारी येथे आपल्याच देशाची व अधिक अनुभवी कोनेरू हम्पीवर टाय-ब्रेक विजय मिळवून फिडे महिला बुद्धिबळ विश्वचषक जिंकून आपल्या कारकिर्दीतील सर्वात मोठे यश मिळवले. या विश्वविजेतेपदाबरोबरच १९ वर्षीय दिव्याला केवळ प्रतिष्ठेचा किताब मिळाला नाही, तर ती ग्रॅण्डमास्टरही झाली. ग्रॅण्डमास्टर होणारी ती भारतातील केवळ चौथी महिला आहे व एकूण ८८ वी बुद्धिबळपटू आहे. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आणि ग्रॅण्डमास्टर विश्वनाथन आनंद यांनी तिचे दिव्याचे अभिनंदन केले.

शनिवारी आणि रविवारी कोनेरू हम्पीविरुद्ध खेळल्या गेलेल्याअंतिम फेरीतील दोन शास्त्रीय सामने अनिर्णीत राहिल्यानंतर सोमवारी टाय ब्रेकमध्ये नागपूरच्या दिव्या देशमुखने भारताची अव्वल क्रमांकाची खेळाडू आणि जागतिक रॅपिड बुद्धिबळ विजेती ३८ वर्षीय कोनेरू हम्पीवर शानदार विजय नोंदविला व विश्वचषकावर आपले नाव कोरले.

विश्वविजेत्या दिव्याला प्रतिष्ठेचा फिडे विश्वचषक व ५० हजार डॉलर्स अर्थात ४३.२३ लाख रुपयांचा धनादेश लप्रदान करण्यात आला. उपविजेती कोनेरू हम्पीला ३५ हजार डॉलर्स अर्थात ३०.२६ लाख रुपयांचा धनादेश मिळाला.

सोमवारी झालेल्या वेळेनुसार नियंत्रित टायब्रेकरमध्ये, पांढऱ्या सोंगट्यानिशी खेळणाऱ्या दिव्याला पुन्हा एकदा बरोबरीत रोखण्यात आले, परंतु परतीच्या डावामध्ये काळ्या सोंगट्यानिशी खेळताना दिव्याने दोन वेळच्या जागतिक जलद बुद्धिबळ विजेती कोनेरू हम्पीवर २.५-१.५ असा विजय मिळविला.

हा विजय अशा वेळी आला आहे जेव्हा भारत पुरुष बुद्धिबळात यशाच्या शिखरावर आहे, विश्वविजेता डी. गुकेश, आर. प्रज्ञानंद आणि अर्जुन एरिगासीसारखे खेळाडू सातत्याने चांगले निकाल देत आहेत. भारतातील ग्रॅण्डमास्टर्स बनलेल्या महिलांच्या यादीत आता दिव्या देशमुख हम्पी, द्रोणवल्ली हरिका आणि आर. वैशाली यांच्यात सहभागी झाली आहेत.

महिला विश्वचषक स्पर्धेच्या अंतिम फेरीत पोहोचल्यामुळे, दिव्या देशमुखने पुढील वर्षी होणाऱ्या कॅण्डिडेट स्पर्धेतही स्थान मिळवले, या स्पर्धेत फिडे महिला विश्वचषकात चीनच्या विश्वविजेत्या जू वेनजुनविरुद्ध कोण लढणार हे ठरवले जाईल.

दिव्याने जॉर्जिया येथे झालेली फिडे महिला बुद्धिबळ विश्वचषक स्पर्धा जिंकल्याचा मला अभिमान वाटतो, अशा मोजक्या शब्दात दिव्याचे वडील डॉ. जितेंद्र देशमुख यांनी आनंद व्यक्त केला.

(वृत्तसंस्था)

### हे नशिबाने मिळवून दिले : दिव्या देशमुख

**हे नशिबाने ठरविले होते. स्पर्धेपूर्वी मी विचार करत होते की, मी कदाचित ग्रॅण्डमास्टरचा नॉर्म मिळवू शकेन. मला ते पार पाडण्यासाठी वेळ हवा आहे. मला वाटते की हे नशिबाने घडले, मला अशा प्रकारे ग्रॅण्डमास्टर पद मिळाले. याआधी माझ्याकडे एकही ग्रॅण्डमास्टर नॉर्म नव्हता आणि आता मी ग्रॅण्डमास्टर झाली आहे, असे दिव्या विजयानंतर म्हणाली.**

### आनंदाश्रू अनावर

अंतिम सामन्यात जलद टायब्रेकमध्ये दिव्याने आपल्या वयाच्या दुप्पट प्रतिस्पर्ध्याविरुद्ध विजय मिळवल्यानंतर ती खूप भावूक झाली, ती आपले अश्रू रोखू शकली नाही आणि तिने आईला घट्ट मिठी मारली. ही प्रेमाची मिठी म्हणजे दिव्याचा प्रवास, संघर्ष, त्याग आणि अभिमान सर्व काही सांगून जाते.



दोन उत्कृष्ट भारतीय बुद्धिबळपटूंचा समावेश असलेला ऐतिहासिक अंतिम सामना! २०२५ मध्ये महिला जागतिक बुद्धिबळ विजेती झाल्याबद्दल युवा दिव्या देशमुखचा अभिमान आहे. या उल्लेखनीय कामगिरीबद्दल तिचे अभिनंदन, जे अनेक तरुणांना प्रेरणा देईल. कोनेरू हम्पीने संपूर्ण स्पर्धेत प्रचंड पराक्रम दाखवला आहे. दोन्ही खेळाडूंना त्यांच्या भविष्यातील प्रयत्नांसाठी शुभेच्छा.
**- नरेंद्र मोदी**, पंतप्रधान



नागपूर आणि महाराष्ट्राची कन्या बुद्धिबळपटू दिव्या देशमुख यांनी किशोरवयातच जागतिक बुद्धिबळ स्पर्धेत विजेतेपद पटकावले असून 'ग्रँड मास्टर' हा किताब मिळविला आहे. त्यांची ही कामगिरी अभिमानास्पद आहे. राज्य शासनाच्या वतीने त्यांचा यथोचित सन्मान करण्यात येईल.
**-देवेंद्र फडणवीस**, मुख्यमंत्री



दिव्याच्या विजयाने संपूर्ण देशाची मान अभिमानाने उंचावली आहे. केवळ नागपूर आणि महाराष्ट्रासाठी नाही, तर संपूर्ण देशासाठी हा आनंदाचा आणि गौरवाचा क्षण आहे. दिव्या यशाची नवनवीन शिखरे गाठत राहो, शुभेच्छा दिल्या.
**-नितीन गडकरी**, केंद्रीय मंत्री

### राज्य शासनातर्फे करण्यात येणार सन्मान : मुख्यमंत्री

**नागपूर** : नागपूर व महाराष्ट्राची कन्या बुद्धिबळपटू दिव्या देशमुख हिचा राज्य शासनाच्या वतीने त्यांचा यथोचित सन्मान करण्यात येणार असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज येथे सांगितले.

रामगिरी शासकीय निवासस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी प्रसार माध्यमांशी संवाद साधला. दिव्या देशमुख यांनी भारतीय बुद्धिबळपटू कोनेरू हम्पी यांना जागतिक बुद्धिबळ स्पर्धेच्या अंतिम सामन्यात पराभूत करून ही महत्त्वपूर्ण कामगिरी केली आहे. कोनेरू हम्पी यांचे अभिनंदन करत दिव्या देशमुख यांनी दुसऱ्यांदा या स्पर्धेत सहभाग घेत यशोशिखर गाठल्याचे त्यांनी सांगितले.

## पक्षांचे अस्तित्व टिकवण्यासाठी ठाकरे बंधू एकत्र : पालकमंत्री गोरे

### ● आगामी निवडणुकींचा निर्णय वरिष्ठ घेतील

**तभा वृत्तसेवा | विशेष प्रतिनिधी**
**सोलापूर, दि.२८ जुलै-**

उध्दव ठाकरे आणि राज ठाकरे एकत्र येत असल्याचे श्रेय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना जाते. दोन भाऊ एकत्र येत असल्याचा आनंदच आहे, पण ते दोघे का एकत्र येत आहेत याचा विचार केल्यास दिसते की, पक्षाचे अस्तित्वच धोक्यात आल्याने आपापल्या पक्षाचे अस्तित्व टिकविण्यासाठी ठाकरे बंधू एकत्र येत असल्याचा टोला राज्याचे ग्रामविकास मंत्री तथा सोलापूरचे पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी ठाकरे बंधूंना लगावला.

सोमवारी सोलापूरच्या दौऱ्यावर आलेल्या ना. गोरे यांनी भाजपाच्या मंडल अध्यक्षांची बैठक घेतली. त्या बैठकीनंतर ते पत्रकारांशी बोलत होते. याप्रसंगी आ. सचिन कल्याणशेट्टी उपस्थित होते. पत्रकारांशी बोलताना गोरे म्हणाले की, जिल्हा परिषदेच्या आगामी निवडणुकांची रणणिती ठरविण्यासाठी आज मंडल अध्यक्षांची बैठक घेतली आहे. महायुती बाबतचा निर्णय पक्षाचे वरिष्ठच घेतील पण आपण येथील स्थानिक राजकीय परिस्थिती वरिष्ठांच्या निदर्शनास आणून देवू. आजच्या बैठकीला आमदार अपेक्षित नव्हते आणि जे माझ्यासोबत उपस्थित आहेत. ते आम्ही आ. कोठेंच्या कार्यक्रमाला सोबत जाणार आहोत. मंडल अध्यक्षांच्या बैठकीसाठी आ. सुभाषबापू देशमुख आणि आ. विजयकुमार देशमुख यांच्या मतदारसंघातील मंडल अध्यक्षदेखील उपस्थित होते. जिल्हा कमिट्या, तालुका कमिट्या करणे, विशेष कार्यकारी अधिकारी नियुक्त्या, जिल्हा नियोजन समितीचा निधी वितरण करणे आदीबाबत चर्चा झाली. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकी बाबत रणणिती ठरविण्याबाबतची चर्चा झाली. बंद खोलीतील चर्चा माध्यमांसमोर सांगायची नसते, असेही ना. गोरे यांनी हसत-हसत सांगितले.



पहलगाम येथील अतिरेकी हल्ल्यानंतर भारताने पाकवर हल्ला करत त्यांना धडा शिकवला. आज सैनिकांनी केलेल्या कारवाईत ठार झालेले अतिरेकी पहलगाम हल्ल्याशी संबंधित होते. आपल्या भारतीय सैन्यांनी केलेल्या कारवाईचा आपल्याला गर्व असल्याचेही जयकुमार गोरे म्हणाले.





## पहलगाम हल्ल्याचा सूत्रधार हाशिम मुसाला कंठस्नान



श्रीनगर : जम्मू-काश्मिरातील दाचिगामजवळ असलेल्या हरवान जंगलात सोमवारी झालेल्या भीषण चकमकीत लष्कराने पहलगाम हल्ल्याचा सूत्रधार हाशिम मुसासह तीन पाकिस्तानी अतिरेक्यांना कंठस्नान घातले. 'ऑपरेशन महादेव'अंतर्गत ही कारवाई करण्यात आली, अशी माहिती अधिकाऱ्यांनी दिली. पहलगाम येथील दहशतवादी हल्ल्यात २६ निष्पाप नागरिकांचा बळी घेणारा सुलेमान शहा ऊर्फ हाशिम मुसा फौजी हा लष्कर-ए-तोयबाचा वरिष्ठ कमांडर होता. श्रीनगर, सोनमर्ग महामार्गावरील बोगद्याच्या कामावर असलेल्या ७ कामगारांच्या हत्येतही त्याचा सहभाग होता.मुसाला यमसदनी धाडण्यासाठी लष्कर, जम्मू-काश्मीर पोलिसांनी संयुक्त कारवाई केली.







सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.
सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

# ऑपरेशन सिंदूर थांबले नाही

## कुरापत काढल्यास पाकिस्तानला पुन्हा धडा : राजनाथसिंह






**नवी दिल्ली, २८ जुलै**

'ऑपरेशन सिंदूर' थांबवले नाही, र स्थगित केले आहे. पाकिस्तानने न्हा कुरापत काढल्यास ते पुन्हा सुरू ले जाईल, अशी गर्जना संरक्षण मंत्री ाजनाथसिंह यांनी सोमवारी ोकसभेत केली. या अभियानात ०० पेक्षा जास्त अतिरेकी, त्यांचे ाठीराखे आणि प्रशिक्षक मारले गेले, से ते म्हणाले.

'ऑपरेशन सिंदूर'वर लोकसभेत र्चा सुरू करताना राजनाथसिंह यांनी ापल्या जवळपास ५० मिनिटांच्या णाघाती भाषणात विरोधकांनी पस्थित केलेल्या सर्व आक्षेपांचे ाणि आरोपांचे मुद्देसूद खंडन केले. यावेळी गृहमंत्री अमित शाह, भूपृष्ठ परिवहन आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी, आरोग्यमंत्री जे.पी. नड्डा सभागृहात उपस्थित होते.

कुणाच्या दबावाखाली 'ऑपरेशन सिंदूर' थांबवण्यात आले, हे पूर्णपणे चुकीचे आहे, उद्दिष्ट पूर्ण झाल्यामुळे हे ऑपरेशन थांबवण्यात आले. भारताचा मुख्य उद्देश युद्ध छेडणे नव्हे, तर भारताविरुद्ध छुपे युद्ध पुकारणाऱ्या पाकिस्तानला धडा शिकवणे हा होता, असे राजनाथसिंह म्हणाले.

भारताच्या हवाई दलाची प्रत्युत्तरातील प्रभावी कारवाई, सीमेवर भारतीय लष्कराने आक्रमकपणे दिलेले उत्तर आणि नौदलाच्याही तेवढ्याच दमदार कारवाईच्या शक्यतेमुळे पाकिस्तानला माघार घेणे भाग पडले. पाकिस्तानची ही माघार फक्त त्यांच्या लष्कराचे अपयश नाही, तर त्यांचे सैन्यबल आणि मनोबल हा दोघांचाही पराभव आहे.

'ऑपरेशन सिंदूर'मध्ये आमची किती विमाने पडली, असा प्रश्न विरोधक उपस्थित करीत असलेला प्रश्न देशातील जनभावनांचे प्रतिनिधित्व करीत नाही, तर आपण पाकिस्तानचे किती विमाने पाडली, असा प्रश्न त्यांनी विचारायला पाहिजे होता. 'ऑपरेशन सिंदूर' यशस्वी झाले का, या प्रश्नाचे उत्तर हो असे आहे, असे राजनाथसिंह यांनी सांगितले.

लक्ष्य जेव्हा मोठे असते, तेव्हा छोट्याछोट्या मुद्यांकडे लक्ष द्यायचे नसते, यामुळे देशाची सुरक्षा, सैनिकांचा सन्मान आणि उत्साह यावरून आमचे लक्ष विचलित होऊ शकते. विरोधी पक्षातील आमचे मित्र या ऑपरेशनवर योग्य असे प्रश्न उपस्थित करीत नाही, असे ते म्हणाले. *(तभा वृत्तसेवा)*

### परीक्षेत निकाल महत्त्वाचा

राजनाथसिंह म्हणाले की, आपल्या लष्कराने पाकिस्तानी सैन्य ठिकाणांवर हल्ले चढवल्यानंतर पाकिस्तानने जवळपास पराभव मान्य करीत युद्धबंदीचे आर्जव आपल्याकडे केले होते. पाकिस्तानच्या लष्करी कारवाई महासंचालकांनी केलेल्या विनंतीनंतर दोन्ही देशांच्या लष्करी अधिकाऱ्यांत चर्चा झाली अन् युद्धबंदी लागू करण्यात आली. परीक्षेत निकाल काय लागला, हे महत्त्वाचे असते, आम्ही मुलांच्या गुणांकडे लक्ष द्यायला पाहिजे, याकडे नाही की परीक्षा सुरू असताना पेन्सिल तुटली.

### आम्ही सुदर्शन चक्र उचलले

'शठ्ये शाठ्यंम समाचरेत' म्हणजे धर्माच्या रक्षणासाठी वेळ पडली तर सुदर्शन चक्रही चालवले पाहिजे, हे आम्ही भगवान श्रीकृष्णाकडून शिकलो. प्रभू हनुमतांने बनवलेल्या लंकेवर हल्ल्याची योजनेप्रमाणेच आम्हीही योजना बनवली होती. आम्ही २००६ चा संसदभवनवरील हल्ला, २००८चा मुंबईवरील दहशतवादी हल्ला पाहिला, आता खूप झाले. त्यामुळे आम्हाला सुदर्शन चक्र हातात घ्यावे लागले. भारताने आता दहशतवादाविरुध्द दृढ आणि सशक्त असे पाऊल आम्ही उचलले आहे.

# भारताला 'भारत'च म्हणा; तीच आपली ओळख : सरसंघचालक

**तिरुवनंतपुरम्, २८ जुलै**

भारत हे एक सर्वनाम आहे आणि त्याचे भाषांतर 'इंडिया' असे केले जाऊ नये. आपल्या बोलण्यात, लिहिण्यात, व्यक्तिशः असो किंवा सार्वजनिक ठिकाणी भारताला सर्वांनी भारतच म्हटले पाहिजे. कारण तीच आपली ओळख आहे, असे प्रतिपादन राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत यांनी केले.

शिक्षा संस्कृती उत्थान न्यायाद्वारे अमृता इन्स्टिट्यूट ऑफ मेडिकल सायन्सेस, केरळ येथे आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. कार्यक्रमाचा विषय 'शिक्षणातील भारतीयता' हा होता. सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत म्हणाले की, जर कोणाचे नाव गोपाल असेल तर ते इंग्रजीतही लिहिताना, बोलताना गोपालच राहील. त्याचप्रमाणे भारत हे भारतच राहिले पाहिजे. कारण तीच आपली ओळख आहे, तोच आपला सन्मान आहे. जर आपण आपली ओळख विसरलो तर आपल्यात कितीही विशिष्ट गुण असले तरी आपल्याला कधीही



सन्मान मिळणार नाही. सुरक्षाही मिळणार नाही. हाच नियम आहे. तुम्ही जे आहात त्यातच उत्कृष्ट कामगिरी करा. त्याचप्रमाणे आपल्याला भारतीयता शिक्षणात आणायची असेल तर प्रथम भारताला जाणून घ्यावे लागेल आणि आपल्या अस्तित्वाच्या खुणेवर विश्वास ठेवावा लागेल. आपली ओळख समजून घ्यावी लागेल. म्हणून भारताला माना, भारताचेच बना...हीच भारतीयता आहे. ते पुढे म्हणाले, मुळात कमावणे आणि शिकणे याचा काही संबंधच नाही. शिक्षण का घ्यायचे? तर मानवाच्या व्यक्तित्व विकासासाठी. माणूस मन, वचन, कर्माने जसा व्यक्त होतो तेच खरे शिक्षण आहे. शिक्षण आपल्याला उदरनिर्वाह कसा करायचा, हे शिकवतेच पण, भारताचे शिक्षण हे इतर लोकांना जगणे शिकवणारे आहे. शिक्षणाचा अर्थ केवळ शाळा, महाविद्यालय नाही तर ते घरातील संस्कारांवरही अवलंबून आहे. यात समाजाचेही दायित्व फार मोठे आहे. म्हणून संस्कार अतिशय महत्त्वाचे आहेत. संस्कारांनीच आचरण बनते आणि आचरणानेच जीवनाची उन्नती होते.

### भारतीयत्व म्हणजे फक्त नागरिकत्व नाही

सरसंघचालक म्हणाले की, भारत म्हणजे केवळ भौगोलिक सीमेत राहणे किंवा नागरिकत्व मिळवणे असे नाही. भारतीयत्व ही एक अशी दृष्टी आहे, जी संपूर्ण जीवनाच्या कल्याणाचा विचार करते. धर्मावर आधारित ही दृष्टी चार पुरुषार्थांना - धर्म, अर्थ, काम आणि मोक्ष - जीवनाचा भाग मानते. यापैकी मोक्ष हे अंतिम ध्येय आहे.

# भारताने १.७८ लाख हेक्टरपेक्षा जास्त वनीकरण वाढवले

**नवी दिल्ली, २८ जुलै**

२०१९-२० ते २०२३-२४ रम्यान भारताने २ लाख ९ हजार ९७ हेक्टर वनीकरणाचे लक्ष्य ठेवले ते. या काळात १,७८,२६१ क्टरवर वनीकरण केले आहे जे ोजित लक्ष्याचे ८५ टक्के आहे, सा अहवाल केंद्रीय सक्षम समितीने र्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या हवालात म्हटले आहे.

गुजरात, चंदीगड, मिझोराम व ध्य प्रदेश या राज्यांनी वनीकरणाचे क्ष्य पूर्ण केल्याचे अहवालात म्हटले ाहे. मध्य प्रदेशने २१ हजार ७४६.८२ हेक्टरवर वनीकरण केले. कर्नाटकनेही जवळजवळ संपूर्ण लक्ष्य गाठले, २ हजार ७७५.१२ हेक्टरच्या तुलनेत २ हजार ७६१.२६ हेक्टर क्षेत्र व्यापले. अरुणाचल प्रदेशने २१ हजार ४७८.०३ हेक्टरच्या तुलनेत २० हजार ७१९.४६ हेक्टर लागवड केली. एकूण ९६.६ टक्के यश मिळवले.

उत्तर प्रदेशने ६ हजार ९६.७ हेक्टरच्या तुलनेत ५ हजार ८७७.१६ हेक्टरवर वृक्ष लागवड केली. आसामने १ हजार १९१.८२ हेक्टरच्या तुलनेत १ हजार १४९.६४ हेक्टर लागवड केली. *(वृत्तसंस्था)*

# अवसानेश्वर महादेव मंदिरात चेंगराचेंगरी; दोन ठार

### माकडांनी उड्या मारल्या, तार तुटली!

**बाराबंकी, २८ जुलै**

उत्तरप्रदेशमध्ये श्रावण सोमवारी मोठी दुर्घटना घडली. बाराबंकी जिल्ह्यातील हैदरगड भागात असलेल्या प्रसिद्ध अवसानेश्वर महादेव मंदिरात विद्युत प्रवाह पसरल्याने चेंगराचेंगरी झाली. यामध्ये दोन भाविकांचा मृत्यू झाला, तर ४० जण जखमी झाले.

जखमींना उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. या घटनेमुळे मंदिर परिसरात काही काळ गोंधळाचे वातावरण निर्माण झाले. मिळालेल्या माहितीनुसार, श्रावण सोमवार असल्याने अवसानेश्वर महादेव मंदिरात भाविकांची मोठी गर्दी होती. जलाभिषेकादरम्यान काही माकडांनी मंदिरात असलेल्या टिन शेडवर उड्या मारल्या. त्यामुळे तार तुटली आणि शेडवर पडली. तार पडताच त्यातून विद्युत प्रवाह शेडमध्ये पसरला, ज्यामुळे तेथे उपस्थित लोक घाबरले आणि चेंगराचेंगरी झाली.

मृतांमध्ये लोणीकात्रा पोलिस स्टेशन परिसरातील मुबारकपुरा गावातील २२ वर्षीय रहिवासी प्रशांत आणि आणखी एका भाविकाचा समावेश आहे. दोघांनाही उपचारासाठी त्रिवेदीगंज सीएचसी येथे आणण्यात आले होते. मात्र, त्यांचा मृत्यू झाला. रविवारी उत्तराखंडमधील हरिद्वार येथील प्रसिद्ध मनसा देवी मंदिरात गर्दीमुळे चेंगराचेंगरी झाल्याची धक्कादायक घटना समोर आली होती. यामध्ये सहा जणांचा मृत्यू झाला असून अनेक जण जखमी झाले. *(वृत्तसंस्था)*




जखमींवर बाराबांकी येथील रुग्णालयात उपचार सुरू आहेत

# जर्मन सैन्यात गुप्तहेर झुरळांची तैनाती

**बर्लिन, २८ जुलै**

रशिया-युक्रेन युद्धानंतर, जर्मनीने आता भविष्यातील युद्धाची तयारी सुरू केली आहे. यासाठी गुप्तहेर झुरळे आणि एआय रोबोट तयार केले जात आहेत, जे लवकरच सैन्यात समाविष्ट केले जाणार आहेत.

जर्मनी २०२९ पर्यंत आपले संरक्षण बजेट जवळजवळ तिप्पट वाढवून १६२ अब्ज युरो (म्हणजे १६.६६ लाख कोटी) दरवर्षी करण्याची योजना आखत आहे. या बजेटचा मोठा भाग एआय रोबोट्स, मानवरहित मिनी-पाणबुड्या आणि गुप्तचर झुरळे बनवण्यासाठी देखील खर्च केला जात आहे. *(वृत्तसंस्था)*

# दिव्याची विश्वचषकापर्यंत घोडदौड



स्पर्धेच्या सुरुवातीला १५ व्या क्रमांकावर असलेल्या नागपूरची कन्या असलेल्या १९ र्षीय दिव्या देशमुखने अनेक प्रतिस्पर्ध्यांवर मात रून जेतेपदाच्या लढतीत भारताच्या सर्वात तिष्ठित दिग्गज खेळाडूंपैकी एक असलेल्या कोनेरू हम्पीवर खळबळजनक विजय नोंदविला.

अंतिम फेरीतील दोन शास्त्रीय डाव अनिर्णीत राहिले व सामना जलद टायब्रेकमध्ये ढकलला गेला. पहिला डाव दिव्याने पांढऱ्या सोंगट्यासह खेळताना बरोबरीत राखला, पण दुसऱ्या डावामध्ये काळ्या सोंगट्यांसह दिव्याने धैर्याला उत्कृष्टपणे रोखले. वेळेच्या तीव्र दबावाखाली कोनेरू हम्पीने शेवटच्या डावामध्ये महत्त्वाच्या चुका केल्या. दिव्याने तिच्या चुकीचा फायदा घेत आत्मविश्वासाने संस्मरणीय विजय मिळवला.

विजेतेपदाच्या मार्गावर दिव्याने चौथ्या फेरीत दुसऱ्या मानांकित झू जिनर, उपांत्यपूर्व फेरीत दहाव्या मानांकित हरिका द्रोणवल्ली आणि उपांत्य फेरीत तिसऱ्या मानांकित टॅन झोंगी यांच्यासह अनेक उच्च मानांकित प्रतिस्पर्ध्यांना पराभूत करून उल्लेखनीय कामगिरी केली. या विजयासह, दिव्याने केवळ विश्वचषक जिंकला नाही तर तिचा शेवटचा ग्रॅण्डमास्टर नॉर्म सुद्धा मिळवला व अधिकृतपणे ग्रॅण्डमास्टर किताब मिळवला.

### प्रबळ दावेदार नसताना दिग्गज खेळाडूंना केले चकित

स्पर्धेपूर्वी विजेतेपदाची प्रबळ दावेदार नसतानाही दिव्याच्या निर्भय खेळाच्या आणि डावपेचांच्या शैलीने दिग्गज खेळाडूंना चकित केले. दिव्याचा हा विजय जागतिक स्तरावर आपली छाप पाडणाऱ्या भारतीय बुद्धिबळपटूंच्या नवीन पिढीच्या ताकदीवर प्रकाश टाकते.

# देशांतर्गत, आशियाई स्पर्धांमध्ये पदकांची लयलूट

दिव्या देशमुखने जुलै २०२५ मध्ये फिडे महिला बुद्धिबळ विश्वचषक जिंकले, सोबतच तिने ग्रॅण्डमास्टर पदसुद्धा मिळविले. तिने बुद्धिबळ ऑलिम्पियाडमध्ये तीन वेळा सुवर्णपदके जिंकली. आशियाई बुद्धिबळ, जागतिक ज्युनिअर बुद्धिबळ तसेच जागतिक युवा बुद्धिबळ स्पर्धेतही तिने अनेकवेळा सुवर्णपदके जिंकली आहेत.

दिव्याचे वडील जितेंद्र देशमुख व आई नम्रता देशमुख दोघेही डॉक्टर आहेत. दिव्या भवन्स भगवानदास पुरोहित विद्या मंदिरची विद्यार्थिनी आहे.

२०२१ मध्ये दिव्या देशमुख भारताची २१ वी महिला बुद्धिबळ ग्रॅण्डमास्टर झाली. तिने २०२२ महिला भारतीय बुद्धिबळ अजिंक्यपद जिंकले. तिने २०२२ बुद्धिबळ ऑलिम्पियाडमध्ये वैयक्तिक कांस्यपदक सुद्धा जिंकले. ती सुवर्णपदक विजेत्या ऑनलाइन बुद्धिबळ ऑलिम्पियाड २०२० संघाचा देखील भाग होती. डिसेंबर २०२४ पर्यंत ती भारतातील दुसऱ्या क्रमांकाची महिला बुद्धिबळपटू होती.

२०२३ मध्ये अल्माटी येथे दिव्याने आशियाई महिला बुद्धिबळ अजिंक्यपद जिंकले. त्यानंतर तिने तळाच्या मानांकित असूनही टाटा स्टील इंडिया बुद्धिबळ स्पर्धेच्या महिलांच्या जलद विभागात प्रथम स्थान मिळवले. स्पर्धेत तिने हरिका द्रोणवल्ली, वंतिका अग्रवाल, कोनेरू हम्पी, सविता श्री बी, इरिना क्रश आणि निनो बत्सियाश्विली यांचा पराभव केला, महिला विश्वविजेत्या जू वेंजुन आणि अण्णा उशेनिना यांच्याविरुद्ध बरोबरी साधली आणि पोलिना शुवालोवा यांच्याकडून तिचा एकमेव पराभव झाला.

मे २०२४ मध्ये दिव्या देशमुख शारजाह चॅलेंजर्स विजेती ठरली. ही एक मोठी खुली स्पर्धा होती, त्यामुळे तिला पुढच्या वर्षी शारजाह मास्टर्समध्ये स्थान मिळाले. १३ जून २०२४ मध्ये दिव्या २० वर्षांखालील मुलींच्या गटाची विश्वविजेती झाली. २००१ मध्ये कोनेरू हम्पी, २००८ मध्ये हरिका द्रोणवल्ली आणि २००९ मध्ये सौम्या स्वामीनाथन यांच्यानंतर ती विश्व ज्युनियर मुलींच्या गटाचा किताब जिंकणारी चौथी भारतीय ठरली. सप्टेंबर २०२४ मध्ये, दिव्या देशमुखने बुडापेस्ट येथे झालेल्या ४५ व्या बुद्धिबळ ऑलिम्पियाडमध्ये टीम इंडियाला सांघिक सुवर्णपदक जिंकण्यास मदत केली.







महिला बुद्धिबळ विश्वचषक २०२५ दरम्यान, १५ व्या मानांकित दिव्या देशमुखने अंतिम फेरीत चौथ्या मानांकित हम्पी कोनेरूविरुद्ध टायब्रेकवर विजेतेपद जिंकून ऐतिहासिक विजय मिळवला. या विश्वविजेतेपदामुळे दिव्या २०२६ च्या महिला कॅण्डिडेट्स स्पर्धेसाठी पात्रता आणि ग्रॅण्डमास्टर विजेतेपद दोन्ही निश्चित झाले. विश्वचषक जिंकणारी ती पहिली भारतीय महिला ठरली.

### २०२५ मध्ये जागतिक कनिष्ठ गटाच्या क्रमवारीत अव्वल



१९ जून २०२५ रोजी, नागपूरची जागतिक कनिष्ठ गटातील अव्वल मानांकित व आंतरराष्ट्रीय मास्टर दिव्या देशमुख हिने लंडनमध्ये झालेल्या २०२५ च्या जागतिक रॅपिड आणि ब्लिट्झ टीम बुद्धिबळ स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरी केली. ब्लिट्झ सेमीफायनलमध्ये हेक्सामाइंड बुद्धिबळ क्लबचे प्रतिनिधित्व करताना, तिने ७४-मूव्ह रुक-वि-बिशप एंडगेममध्ये महिला जागतिक क्रमांक १ हौयिफानचा पराभव केला, ज्यामुळे चिनी ग्रँडमास्टरवर तिचा पहिला विजय झाला.

### पंतप्रधान नरेंद्र मोदींनी केले कौतुक



भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दिव्या देशमुखच्या 'धैर्य व दृढनिश्चयाबद्दल' तिचे कौतुक केले आणि तरुण बुद्धिबळपटूंसाठी प्रेरणास्थान म्हणून तिचे वर्णन केले. दिव्याने आपल्या कामगिरीचे श्रेय आपल्या सहकाऱ्यांच्या प्रोत्साहनाला व पंतप्रधानांच्या प्रेरक संदेशाला दिले.



दिव्या देशमुखचा हौवरचा विजय आठ ब्लिट्झ गेममधील सहा विजयांपैकी एक होता, ज्यामुळे तिला २६०६ चे कामगिरी रेटिंग मिळाले आणि ब्लिट्झ स्पर्धेत हेक्सामाइंडच्या कांस्यपदकात महत्त्वपूर्ण योगदान मिळाले. स्पर्धेच्या सुरुवातीला, तिने रॅपिड विभागात हेक्सामाइंडच्या रौप्य पदकाच्या कामगिरीतही महत्त्वाची भूमिका बजावली होती, तिने २४२० च्या कामगिरी रेटिंगसह १२ पैकी ८ गुण (पाच विजय, सहा ड्रॉ, एक पराभव) मिळवले. तिच्या प्रयत्नांना बोर्ड सिक्सवर वैयक्तिक कांस्यपदकाने आणखी मान्यता मिळाली.

# दिव्याच्या घरी आनंदोत्सव

**नागपूर, २७ जुलै**

जॉर्जियातील बाटुमी येथे आयोजित फिडे ुद्धिबळ विश्वचषक स्पर्धेत भारताच्याच ोनेरू हम्पीला पराभूत करीत दिव्या देशमुखने ेतिहासिक विजय प्राप्त केला. कोनेरू हम्पी ाणि दिव्या देशमुख यांच्यातील दोन्ही लढती रोबरीत राहिल्यानंतर ट्रायब्रेकरमध्ये दिव्याने हे भूतपूर्व यश संपादन करीत ग्रॅण्डमास्टर ोण्याचा बहुमान मिळविला. दिव्याच्या या शाने नागपूरचा नावलौकिक ातासमुद्रापलीकडे पोहोचला आहे. ागपुरातील शंकरमधील तिच्या घरी ानंदोत्सव साजरा करण्यात आला.

गतिमान बुद्धिबळ स्पर्धेत दिव्याने ातापर्यंत बरेच सामने जिंकले असून, ती फक्त १९ वर्षांची आहे. तिची प्रतिस्पर्धी हम्पी मात्र अनुभवी आहे.

भवन्स भगवानदास पुरोहित विद्या मंदिरमध्ये शिक्षण घेतलेल्या दिव्याचे आई-वडील डॉक्टर आहेत. २००४ चे ग्रॅण्डमास्टर चेन्नईचे आर. बी. रमेश यांच्या मार्गदर्शनाखाली तिने हे यश संपादन केले.

दिव्या ग्रॅण्डमास्टर झाल्याचा आनंदोत्सव तिच्या शंकरनगरातील घरी साजरा करण्यात आला. माध्यम प्रतिनिधी व चाहत्यांनी दुपारपासूनच तिच्या गर्दी केली होती. दिव्याची आई तिच्यासोबत परदेशात आहे. दिव्याचे वडील डॉ. जितेंद्र देशमुख म्हणाले, दिव्याने केलेल्या परिश्रमाचे हे फळ आहे. तिची आजी डॉ. कमल देशमुख व काकू डॉ. स्मिता देशमुख यांनीही खूप आनंद झाल्याचे माध्यम प्रतिनिधींना सांगितले. तिच्या कुटुंबीयांनी या ऐतिहासिक कामगिरीबद्दल पेढे वाटून आनंदोत्सव साजरा केला. या ऐतिहासिक विजयाचा जल्लोष दिव्या परदेशातून आल्यावर करू, असे नागपूर चेस असोसिएशनचे अध्यक्ष सच्चिदानंद सोमण यांनी सांगितले.

दिव्या देशमुखने शेवटपर्यंत कडवी झुंज दिली आणि विजय खेचून आणला, अशी प्रतिक्रिया बुद्धिबळाचे ज्येष्ठ पंच दीपक पात्रीकर यांनी दिली. *(तभा वृत्तसेवा)*



दिव्याने केलेल्या कामगिरीमुळे आम्ही संपूर्ण कुटुंब खूप आनंदी आहे. ही मोठी उपलब्धी आहे. केवळ देशमुख परिवारसाठीच नव्हे तर नागपूरकर, महाराष्ट्र व देशवासीयांसाठी अभिमानाची बाब आहे.
**-डॉ. स्मिता देशमुख**, दिव्याची काकू

नागपूरची कन्या दिव्या देशमुख विश्वविजेती ठरली व नागपूर, महाराष्ट्र आणि देशाचे नाव उज्ज्वल केले आहे. तिचे अथक परिश्रम आणि जिद्दीचे हे फलित आहे. बालपणापासूनच तिने दाखवलेली प्रतिभा आणि आज मिळवलेले यश हे संपूर्ण तरुणाईसाठी प्रेरणादायी आहे.
**-आ. संदीप जोशी**

एका १९ वर्षांच्या मुलीने दिग्गज खेळाडूला पराभूत करून देशासाठी पहिल्यांदाच 'वर्ल्डकप' जिंकणे, हा नागपूरकरांसाठी हा आनंद, अभिमानाचा व ऐतिहासिक क्षण आहे. दिव्याने केवळ 'वर्ल्डकप'च जिंकला नाही तर ती देशातील ८८ वी ग्रॅण्डमास्टर बनली. नागपुरात परतल्यावर आम्ही दिव्याचा जंगी सत्कार करण्याचा बेत आखला आहे.
**- के. के. बराट,** सचिव, नागपूर जिल्हा बुद्धिबळ संघटना

दिव्याने पहिले दोन वर्ष प्रशिक्षक राहुल जोशी यांच्या मार्गदर्शनात सराव केला. दोन वर्षांनंतर आणि ७ वर्षांखालील मुलींची राष्ट्रीय स्पर्धा जिंकण्यापूर्वी दिव्याला प्रशिक्षण देण्याची मला संधी मिळाली. दिव्या प्रतिभावंत खेळाडू असून जिंकण्याची जिद्द तिच्या मनात असते. दिव्याने आज विश्वकरंड जिंकून हे सिद्ध केले. भविष्यात ती मोठी गगन भरारी घेईल.
**-गुरप्रितसिंग मरास,** दिव्याचे प्रशिक्षक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत

## अग्रलेख...

# समस्येचे खरे मूळ

काँग्रेस ही गांधी-नेहरू घराण्याची खाजगी मालमत्ता आहे आणि या पक्षावर नेहमी या घराण्याचीच सत्ता चालेल असा गेल्या अनेक दशकांपासून दिला जाणारा स्पष्ट संकेत काँग्रेसचे खासदार आणि लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी पक्षनिष्ठेचा मुलामा देऊन घराण्याची लाचारी करणाऱ्या ताटाखालच्या तमाम मांजरांना पुन्हा एकदा दिला आहे. या पक्षाने देशावर सत्ता गाजविली असा सर्वसामान्य जनतेचा समज असला, तरी खरी सत्ता या घराण्यानेच गाजविली हे काँग्रेसी निष्ठावंतांना चांगलेच ठावूक आहे. या पक्षाचा अध्यक्ष कोणीही असो किंवा काँग्रेसी सत्ताकाळात पंतप्रधान कोणीही असो, गांधी घराण्याचे वारसदार हेच या पक्षाचे सर्वेसर्वा आणि सत्तेचे संचालक असतात, हेही या निष्ठावंतांस ठावूक आहे. त्यामुळे, या घराण्याशी निष्ठा राखणे हीच राष्ट्रनिष्ठा मानून या घराण्याच्या वारसांचा प्रत्येक शब्द वेद मानण्याची मानसिकता पक्षात रुजली आहे. अन्यथा, तसे नसते तर गेल्या आठवड्यात राहुल गांधी यांनी केलेल्या एका वक्तव्यावर काँग्रेस पक्षात अंतर्गत प्रश्नचिन्हे निश्चितच उमटली असती. तसे न होता राहुल गांधींच्या त्या वक्तव्यानंतर पक्षनिष्ठेचा मुखवटा पांघरलेल्या ताटाखालच्या मांजरांची छाती अभिमानाने फुलून गेली, हे उभ्या देशाने अनुभवले ते चांगले झाले. राहुल गांधी हे पक्षाचे अन्य काही खासदारांपैकी एक खासदार आहेत. काँग्रेसकडे देशाची सत्ता होती त्या काळात ते पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष होते, अन्यथा त्यांच्याकडे पक्षाच्या किंवा देशाच्या सत्तेची कोणतीही मक्तेदारी कधीही नव्हती. आता तर ते सातत्याने पराभूत होत चाललेल्या आणि अनेक राज्यांतून पुरती वजाबाकी होत गेलेल्या एका पक्षाचे नेते आहेत. तरीही या देशाच्या राजकारणावर, समाजकारणावर आपली सरंजामशाही पकड शाबूत राहिली पाहिजे यासाठीचे त्यांचे प्रयत्न अनेकदा प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे स्पष्ट दिसून आले आहेत. गेल्या आठवड्यात दिल्लीच्या तालकटोरा स्टेडियमवरील ओबीसी न्याय संमेलनातील त्यांची ताजी वक्तव्ये हा त्या सरंजामशाही मानसिकतेचाच अस्सल पुरावा ठरतो. जातनिहाय जनगणना न करणे ही पक्षाची नव्हे तर व्यक्तिशः माझी चूक होती अशी कबुली त्यांनी या मेळाव्यात दिली, तेव्हा अपक्षेप्रमाणे काँग्रेसमधील गांधीनिष्ठ ताटाखालच्या मांजरांची छाती अभिमानाने फुलली असेलच, पण जे काम सत्ताकाळात पक्षाने करावयास हवे होते, ते न केल्याबद्दलच्या सरकारच्या जबाबदारीची मक्तेदारी स्वतःकडे घेऊन त्यांनी पुन्हा एकदा सत्तेपेक्षा वरचढ असल्याच्या आपल्या मानसिकतेचे प्रदर्शन कसे घडविले असा प्रश्न मात्र कोणासच पडला नसेल. जातनिहाय जनगणना करण्याची मागणी पंधरा वर्षांपूर्वी, २०१० मध्ये तत्कालीन पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंह यांनी तत्त्वतः मान्य केली होती. सरकारची त्यासाठी तयारी असल्याचेही त्यांनी दर्शविले होते आणि तेव्हा विरोधक असलेल्या भारतीय जनता पार्टीने या मागणीस पाठिंबाही दिला होता. त्यामुळे जातनिहाय जनगणनेस भाजपा अनुकूल असतानाही, मनमोहन सिंह सरकारने या मुद्यावर पावले मागे का घेतली हा प्रश्न न पडता ताटाखालच्या निष्ठावंत मांजरांनी राहुल गांधी यांच्या कबुलीचा डांगोरा पिटावा ही आश्चर्याची बाब म्हणावी लागेल.

काँग्रेसच्या जातनिहाय जनगणनेच्या किंवा सामाजिक आरक्षणाबाबतच्या भूमिकेचा इतिहास संपूर्ण देशाला माहीत आहे. ओबीसी, दलित, मागासवर्गीय नेतृत्वाच्या संधी या पक्षात कशा डावलल्या गेल्या किंवा संधी दिल्यानंतर या वर्गातील नेतृत्वास कसे अपमानित केले गेले, याची उजळणी अनेकांनी वारंवार केली आहे. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना लोकसभा निवडणुकीत पराभूत करण्याच्या मोहिमेतील काँग्रेसी कारवायांचा इतिहासही अनेकदा उजेडात आणला गेला आहे. याच पक्षातील बाबू जगजीवन राम, सीताराम केसरी आदी नेत्यांच्या नेतृत्वास लगाम घालून सातत्याने गांधी घराण्याच्या छत्रछायेखाली वावरण्यात समाधान मानणाऱ्या निष्ठावंतांच्या इतिहासाचे पाढेही अनेकदा वाचले गेले आहेत आणि मनमोहन सिंह यांच्या पंतप्रधानपदाच्या काळात सरकारचा अध्यादेश जाहीरपणे फाडून सरकारला माघार घेण्यास भाग पाडण्याचा राहुल गांधी यांचा वर्चस्ववादही देशाने अनुभवला आहे.

आरक्षण किंवा जातनिहाय जनगणना हे कोणा पक्षाच्या प्रमुखाच्या किंवा पक्षाच्या अखत्यारीतील निर्णय नसून सरकारने घ्यावयाचे निर्णय असतात. राहुल गांधी हे कधीच सरकारात नव्हते आणि त्यांच्या पक्षाचे सरकार असताना त्याबाबत कोणताच निर्णय घेतला गेला नव्हता. त्यामुळे, असे निर्णय घेण्याचे श्रेय किंवा न घेण्याची जबाबदारी थेट सरकारचीच असताना, स्वतःकडे घेण्याचा राहुल गांधींचा कांगावा पाहता, सत्तेवरील वर्चस्वाच्या सरंजामी मानसिकतेचा स्पष्ट संकेत त्यांनी दिला आहे, असेच म्हणावे लागेल. जातनिहाय जनगणना न करणे ही आपल्या २१ वर्षांच्या राजकीय कारकीर्दीतील चूक होती, अशी कबुली त्यांनी दिली असा मोठा कांगावा त्या दिवशी केला गेला. वस्तुतः, ज्या गोष्टीशी त्यांचा संबंधदेखील नव्हता, त्या गोष्टीची जबाबदारी आपली आहे असे भासविण्याचा व त्यातून पक्ष किंवा सत्तेवर आपली हुकूमत असल्याचा संकेत देण्याचा हा प्रयत्न हास्यास्पद ठरतो. उलट, असे न केल्याची जबाबदारी त्यांनी स्वतःकडे घेतली असेल, तर ज्या पक्षाने या सामाजिक प्रश्नाची उपेक्षा केली व त्यामुळे संबंधित समाजातील अनेकांस अनेक संधींपासून डावलले गेल्याने अन्याय सोसावा लागला, त्याचे प्रायश्चित्तही त्यांनी घ्यावयास हवे. याच दरम्यान राहुल गांधी यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची अपमानजनक खिल्ली उडविण्याचा लाजिरवाणा प्रयत्न केला. पंतप्रधान मोदी ही देशापुढील समस्या नाही, असे उद्गार राहुल गांधी काढत होते, तेव्हा पंतप्रधान मोदी इंग्लंड, मालदीवसोबतच्या ऐतिहासिक कराराच्या प्रक्रियेत सहभागी झाले होते आणि उभे जग या राजनीतीकडे आदराने पाहात होते. पंतप्रधान मोदी यांच्यावर अवमानकारक टिप्पणी करून नियोजित पद्धतीने त्यास प्रसिद्धी मिळविण्याचा राहुल गांधी यांचा नवा राजकीय फंडा आता उघड झाला आहे. पण अशी टीका करून ते आपल्या देशाच्या विरोधी पक्षनेतेपदाची प्रतिष्ठा पणाला लावत आहोत, याचे भान विसरलेली ताटाखालची मांजरे मात्र, अशा टीकेवर टाळ्या पिटतात. मोदी यांच्या नेतृत्वाखालील रालोआस सत्ता मिळाल्यापासून सातत्याने काँग्रेसची पीछेहाट होत आहे. अनेक राज्यांत आणि लोकसभा-राज्यसभेतही काँग्रेसच्या प्रतिनिधित्वास गळती लागली आहे. नरेंद्र मोदी ही देशापुढील समस्या नाही हे खरेच, पण गेल्या दहा-अकरा वर्षांपासून काँग्रेसपुढील समस्या मात्र ठरले आहेत. याच काळात मोदी यांच्या नेतृत्वास आव्हान देण्यासाठी राहुल गांधी यांना उभे करण्याचे काँग्रेसचे सर्व प्रयत्न फोल ठरले. सद्भावना यात्रेच्या निमित्ताने राहुल गांधी यांना देशभर पायपीट करावयास लावूनही काँग्रेस पक्ष आपली जनमानसातील प्रतिमा पुन्हा उभी करण्यात यशस्वी ठरला नाही. पंतप्रधान मोदी यांच्या प्रत्येक परदेश दौऱ्यात भारताची प्रतिमा आणि प्रतिष्ठा सातत्याने उंचावलेली पाहावयास मिळते. इंग्लंडसोबतचा ऐतिहासिक मुक्त व्यापार करार ही देशाच्या विदेश नीतीच्या इतिहासातील स्वागतार्ह घटना ठरली. मोदी यांच्या नेतृत्वाची खिल्ली उडविणाऱ्या राहुल गांधी यांच्या नावावर अशा कोणत्या ऐतिहासिक देशहिताच्या कामगिरीचा जमाखर्च मांडावयास गेले तर हाती काय लागेल याचे उत्तर निष्ठावंतांस देता येणार नाहीच. उलट, देशात महत्त्वाच्या, संवेदनशील घडामोडी घडत असताना, राहुल गांधी मात्र कोणताच सुगावा लागू न देता परदेश वाऱ्या करतात, तेव्हा त्याचे खुलासे करताना या निष्ठावंतांचीच दमछाक होते. तब्बल २१ वर्षांची राजकीय कारकीर्द असलेल्या राहुल गांधींना आता आपली चूक उमगली हे त्यांच्या कारकीर्दीचे मोठे अपयशही डांगोऱ्यासारखे पिटून त्यावर टाळ्या वाजविणाऱ्या निष्ठावंतांनी आता राहुल गांधींच्या कारकीर्दीतील अपयशांचा मागोवा घ्यावयास हवा. या नेत्याने देशाचे काय भले केले हा प्रश्न कदाचित सोडविता येणार नाही, पण पक्षाचे तरी काय भले केले, याचा लेखाजोखा मांडावयास हवा असे जेव्हा या निष्ठावंतांस वाटेल, तो पक्षाचा सुदिन ठरेल, यात शंकाच नाही. ▮


## आंतरराष्ट्रीय

**प्रा. जयसिंग यादव**

# चीनचा वॉटरबॉम्ब

चीनचे पंतप्रधान ली कियांग यांनी न्यिंगची शहरातील ब्रह्मपुत्रा नदीच्या खालच्या भागात आयोजित समारंभात धरणाच्या बांधकामाची सुरुवात करण्याची घोषणा केली. 'शिन्हुआ' वृत्तसंस्थेच्या म्हणण्यानुसार तिबेट स्वायत्त प्रदेशातील न्यिंगची येथील मेनलिंग जलविद्युत केंद्राच्या धरणाच्या ठिकाणी भूमिपूजन समारंभ पार पडला. न्यिंगची शहराला स्थानिक पातळीवर यारलुंग झांगबो म्हणून ओळखले जाते. या प्रकल्पावरील एकूण गुंतवणूक सुमारे १.२ ट्रिलियन युआन (सुमारे १६७.८ अब्ज अमेरिकन डॉलर्स) असल्याचा अंदाज आहे. या निमित्ताने ब्रह्मपुत्रा नदीवर जगातील सर्वांत मोठे धरण बांधले जात आहे. चीन १४ लाख कोटी रुपये खर्च करून ब्रह्मपुत्रेवर धरण बांधत आहे. २०२३ च्या अहवालानुसार या जलविद्युत केंद्रातून दरवर्षी ३०० अब्ज किलोवॅट तासांपेक्षा जास्त वीज निर्माण होण्याची अपेक्षा आहे. ती ३० कोटींहून अधिक लोकांच्या वार्षिक गरजा पूर्ण करण्यासाठी पुरेशी आहे. ती प्रामुख्याने बाह्य वापरासाठी वीज पुरवेल. तिबेटमधील स्थानिक मागणीदेखील त्यातून पूर्ण होईल. गेल्या वर्षी डिसेंबरमध्ये या प्रकल्पाला मंजुरी देण्यात आली. हे धरण हिमालयाच्या शिखरावर एका विशाल दरीत बांधले जाईल. जिथे ब्रह्मपुत्रा नदी एक मोठे वळण घेते आणि अरुणाचल प्रदेश आणि नंतर बांगलादेशमध्ये वाहते. याशिवाय चीनने तिबेटमधील सर्वांत मोठे जलविद्युत केंद्रदेखील चालवण्यास सुरुवात केली आहे. हा प्रकल्प २०१५ मध्ये सुरू झाला. ब्रह्मपुत्र नदी तिबेटमध्ये उगम पावते आणि भारत आणि बांगलादेशमधून वाहते. त्यावर धरण बांधून, चीन या खालच्या भागात पाण्याचा प्रवाह नियंत्रित करण्याची क्षमता मिळवू शकतो. त्याचा वापर भू-राजकीय शस्त्र म्हणूनदेखील केला जाऊ शकतो.

या प्रकल्पामुळे भारतात चिंता निर्माण झाली आहे. कारण ते वॉटर बॉम्ब सिद्ध होऊ शकते, जे पावसाळ्यात पूरपरिस्थिती वाढवू शकते किंवा दुष्काळात पाणी न सोडता अडवू शकते. सर्वप्रथम, या धरणाच्या खर्चाने अनेकांना आश्चर्यचकित केले आहे. अंदाजे १.२ ट्रिलियन युआन खर्च असल्याने हा पैशाचा योग्य वापर आहे का, असा प्रश्न अनेकांना पडला आहे. याशिवाय नवीन धरण हिमालयीन तिबेटच्या भूकंपाच्या दृष्टीने सक्रिय प्रदेशात बांधले जात आहे. याचा अर्थ असा की, मोठे भूकंप झाल्यास आपत्तिजनक नुकसान टाळण्यासाठी बांधकाम पुरेसे मजबूत आणि स्थिर आहे, याची खात्री करण्यासाठी शास्त्रज्ञ आणि अभियंत्यांना आणखी कठोर परिश्रम करावे लागतील. या प्रकल्पाशी संबंधित फारच कमी माहिती चीनने दिली आहे. त्यामुळे भारत आणि बांगलादेशसारख्या शेजारील देशांची चिंता वाढली आहे. चीनची अर्थव्यवस्था वेगाने वाढत आहे. यासोबतच, त्याची ऊर्जेची मागणीदेखील वाढत आहे. जलविद्युत हा एक स्वच्छ ऊर्जेचा महत्त्वाचा स्रोत आहे. त्यामुळे



कोळशावरील अवलंबित्व कमी होण्यास आणि कार्बन उत्सर्जन नियंत्रित करण्यास मदत होते. मोठी धरणे केवळ वीजनिर्मिती करत नाहीत, तर सिंचन आणि पूर नियंत्रणातदेखील मदत करतात. तिबेटसारख्या दुर्गम भागात अशा मेगा प्रकल्पांचे बांधकाम हा प्रादेशिक विकासाला चालना देण्याचा आणि या भागावरील चीनचे नियंत्रण मजबूत करण्याचा एक मार्ग आहे. अशा धरणांमुळे नदीचा नैसर्गिक प्रवाह विस्कळीत होतो. त्यामुळे जलचरांच्या, विशेषतः माशांच्या स्थलांतरावर आणि प्रजननावर नकारात्मक परिणाम होतो.

दुसरी महत्त्वाची बाब म्हणजे धरणांच्या मागे गाळ साचतो. त्यामुळे धरणाची क्षमता कमी होते आणि खालच्या भागात सुपीक गाळाचा प्रवाह थांबतो. तिबेटी पठार हा भूकंपाच्या दृष्टीने सक्रिय प्रदेश आहे. मोठ्या धरणांच्या बांधकामामुळे या प्रदेशात भूकंपाचा धोका वाढू शकतो. धरणांमुळे हवामानबदलाशी संबंधित अतिवृष्टी आणि पूर यासारख्या घटनांचा धोका वाढू शकतो. धरणांच्या बांधकामामुळे मोठ्या संख्येने स्थानिक लोकसंख्येचे विस्थापन होते. त्यामुळे सामाजिक अशांतता निर्माण होऊ शकते. स्पेन, फ्रान्स आणि स्वीडनसारखे युरोपमधील अनेक देश आपली जुनी धरणे वेगाने बंद करत आहेत. २०२३ पर्यंत १५ युरोपीय देशांनी ४८७ धरणे, अडथळे काढून टाकले. त्यांनी २०३० पर्यंत २५ हजार किलोमीटर नद्या अडथळामुक्त करण्याचे लक्ष्य ठेवले आहे. धरणे नद्यांच्या नैसर्गिक परिसंस्थेला विस्कळीत करतात. ती काढून टाकल्याने नद्या मूळ स्वरूपात परत येतात आणि जलीय जैवविविधता पुनर्संचयित करण्यास मदत करतात. धरणे सॅल्मनसारख्या माशांचे स्थलांतर मार्ग रोखतात. त्याचा त्यांच्या प्रजननचक्रावर नकारात्मक परिणाम होतो. धरण काढून टाकल्याने मासे पुन्हा मुक्तपणे वर आणि खाली जाऊ शकतील. बंधारे काढून टाकल्याने गाळ पुन्हा नदीच्या नैसर्गिक प्रवाहासोबत जाऊ शकेल. ते खालच्या प्रवाहाच्या भागांसाठी महत्त्वाचे आहे. हवामानबदलामुळे अतिवृष्टी आणि पुराचा धोका वाढल्यामुळे अनेक जुन्या धरणांच्या सुरक्षिततेबद्दल चिंता वाढली आहे. या धरणांची देखभाल करणे महाग आणि धोकादायक असू शकते.

आणखी एक दखलपात्र बाब म्हणजे काही जुनी धरणे आता पूर्वीइतकी फायदेशीर ठरत नाहीत आणि त्यांची देखभाल महागडी झाली आहे. अशा परिस्थितीत ती काढून टाकणे आर्थिकदृष्ट्या अधिक व्यवहार्य बनते. युरोप या दृष्टीने समतोल साधत आहे. चीन आणि युरोपीय देशांच्या धरणांशी संबंधित धोरणांमधील हा विरोधाभास वेगवेगळ्या प्राधान्यक्रमांचे आणि विकासाच्या टप्प्यांचे वास्तव प्रतिबिंबित करतो. चीन अजूनही जलद आर्थिक वाढ आणि ऊर्जा सुरक्षेवर लक्ष केंद्रित करत असताना आणि त्यासाठी मोठ्या प्रमाणात पायाभूत सुविधा उभारत असताना युरोपमधील देश त्यांच्या नद्यांच्या परिसंस्थेला झालेले नुकसान भरून काढण्याकडे आणि पर्यावरणीय शाश्वततेला प्राधान्य देण्याकडे वाटचाल करत आहेत. हे जागतिक स्तरावर मानवी विकास आणि पर्यावरण संरक्षण संतुलित करण्याचे आव्हान प्रतिबिंबित करते. चीनने मात्र अरुणाचल प्रदेशातील भारतीय सीमेजवळ तिबेटमधील ब्रह्मपुत्र नदीवर १६७.८ अब्ज अमेरिकन डॉलर्सच्या धरणाचे बांधकाम औपचारिकपणे सुरू केले. गेल्या वर्षी डिसेंबरमध्ये या प्रकल्पाला मंजुरी देण्यात आली होती. हे धरण हिमालय पर्वतरांगांमधील एका विस्तीर्ण दरीत बांधले जाईल, जिथे ब्रह्मपुत्र नदी अरुणाचल प्रदेश आणि नंतर बांगलादेशमध्ये प्रवेश करण्यासाठी एक मोठा 'यू-टर्न' घेते. पूर्वीच्या अहवालांनुसार या प्रकल्पाचा आकार जगातील इतर कोणत्याही पायाभूत सुविधा प्रकल्पांपेक्षा खूप मोठा असेल. त्यात चीनच्या 'थ्री गॉर्जेस' धरणाचा समावेश आहे. तो जगातील सर्वांत मोठा मानला जातो.

चीनने २०१५ मध्ये तिबेटमधील सर्वांत मोठे १.५ अब्ज अमेरिकन डॉलर्स खर्चाचे 'जेम हायड्रो पॉवर स्टेशन' आधीच कार्यान्वित केले आहे. हा प्रकल्प हा केवळ पर्यावरण किंवा जलसुरक्षेचा प्रश्न नाही, तर अस्तित्वाला धोका आहे. या धरणामुळे सीमावर्ती आदिवासींचे जीवन, जमीन आणि संसाधने नष्ट होऊ शकतात. भारतासह बांगलादेशदेखील या प्रकल्पाला विरोध करत आहे, कारण दोन्ही देशांची शेती, पिण्याचे पाणी आणि परिसंस्था ब्रह्मपुत्रेतून येणाऱ्या पाण्यावर मोठ्या प्रमाणात अवलंबून आहेत. दोन्ही देशांचा विश्वास आहे की धरणामुळे पाण्याच्या प्रवाहाला अडथळा येईल, पोषक तत्त्वांनी समृद्ध गाळ येणे थांबेल आणि सर्वांत मोठी चिंता म्हणजे चीन नदीचे पाणी धोरणात्मक फायद्यासाठी वापरू शकतो. ▮

(लेखक राज्यशास्त्राचे प्राध्यापक आहेत.)

## वेध

**नितीन शिरसाट**

# अवैध गुटखा विक्रीवर प्रतिबंध आवश्यक

राज्यात गुटखाबंदी असली तरी राज्याच्या कानाकोपऱ्यात गुटखा सर्रास विकला जात आहे. गुटखा तस्करांनी अवैधपणे मोठ्या प्रमाणात विक्री सुरू केली आहे. राज्यातील युवा पिढी मोठ्या प्रमाणात गुटख्याच्या आहारी जात होती. त्याचप्रमाणे गुटख्याच्या सेवनामुळे फुफ्फुस, तोंड उघडणे, मुख दुर्गंधी आणि आतड्यांच्या कर्करोगांचे वाढते प्रमाण विचारात घेऊन तत्कालीन काँग्रेस-राष्ट्रवादी आघाडी सरकारने २०१२ ला राज्यात गुटखाबंदी लागू केली होती. त्यासाठी राज्य शासनाने गुटख्यापासून मिळणाऱ्या वार्षिक १०० कोटी रुपयांच्या महसुलावरही पाणी सोडले होते. मात्र शासनाने ज्या उदात्त हेतूने गुटखाबंदी जारी केली होती त्यावर गुटखा तस्कारांनी केव्हाच पाणी फेरलेले दिसत आहे.

गुटखाबंदी लागू केली त्यावेळी राज्यात गुटखा उत्पादन करणारे ४० कारखाने होते. या उत्पादकांनी राज्य शासनाच्या निर्णयाला उच्च न्यायालयात आव्हान दिले होते पण त्यांचे दावे टिकू शकले नाहीत. परिणामी काही गुटखा उत्पादकांनी आपले कारखाने मध्यप्रदेश, कर्नाटक, गुजरातसारख्या लगतच्या राज्यांमध्ये स्थलांतरित केले. या लगतच्या राज्यांमध्ये गुटखाबंदी नाही. त्यामुळे महाराष्ट्रात बंदी आदेश लागू केल्यापासूनच चोरट्या मार्गाने या राज्यातून गुटख्याची आवक सुरू झाली होती. जिल्ह्यांच्या सीमाभागात असणाऱ्या उत्पादन शुल्क, पोलिस आणि परिवहन विभागाच्या प्रतिबंधित नाक्यांवरील अधिकाऱ्यांचे हात ओले केले जात आहेत. राज्यात गुटख्याची पाच हजार कोटींवर उलाढाल पोहोचली आहे. राज्यात गुटखाबंदी असल्याने गुटखा कंपन्यांनी सुगंधी सुपारी आणि तंबाखू एकत्रच पण वेगवेगळ्या पॅकिंगमधून विकायला सुरुवात केली आहे. २०२४ मध्ये महाराष्ट्र शासनाने अवैध गुटखा निर्मिती, वाहतूक आणि विक्री करणाऱ्यांना कायद्यानुसार जन्मठेपेच्या शिक्षेची तरतूद करावी असा प्रस्ताव केंद्र शासनाला पाठविलेला आहे. दुसरीकडे २०१५ मध्ये शिवसेना-भाजपा युती सरकारने गुटखा तस्करी आणि विक्री हा अजामीनपात्र गुन्हा ठरविण्याचा निर्णय घेतला होता. पण या निर्णयाचीही कुठे अंमलबजावणी होताना दिसत नाही. परिणामी, या प्रकरणी कुणाला अटक झाली तरी तो लगेचच जामिनावर सुटून मोकळा होतो. राज्यात गुटखाबंदी जाहीर करताना तत्कालीन सरकारने जाहीर केलेल्या आकडेवारीनुसार १० टक्के शालेय विद्यार्थी, ४० टक्के महाविद्यालयीन विद्यार्थी गुटख्याचे सेवन करत होते. अलिकडील काही वर्षांत हे प्रमाण आणखी वाढल्याचे दिसत आहे. राज्यातील सरासरी २७ टक्के प्रौढ व्यक्ती गुटख्याचे सेवन करतात, अशी आरोग्य विभागाची आकडेवारी सांगते. विशेष म्हणजे त्यामध्ये काही प्रमाणात महिलांचाही समावेश आहे. खामगाव शहरातील सिव्हिल लाईन भागातील गरजेच्या वस्तू विक्रीच्या दुकानातून गुटखा विक्री करीत असल्याची गुप्त माहिती शहर पोलिसांना मिळाली. या माहितीच्या आधारे शहर पोलिसांच्या गुन्हे शोधपथकाने पडताळणी केली. एकूण सव्वा लाखाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. पथकाने बुलढाणा चिखली राज्य मार्गावर सापळा रचला. त्या कारवाईत तब्बल ६१ लाख रुपयांचा अवैध गुटखा साठा जप्त केला आहे स्थानिक गुन्हे शाखेने मोठी कारवाई करत गुटख्याने भरलेला एक टाटा आयशर ट्रक पकडला. या वाहनाची तपासणी करण्यात आल्यावर त्यात गुटख्याचा मोठा साठा असल्याचे आढळून आले. गुटखा तस्करीचे मध्यप्रदेशापर्यंत धागेदोरे असल्याचे या कारवाईने पुन्हा सिद्ध झाले आहे. या घटनेतील आरोपी सईद खान रशीद खान हा देवास (मध्यप्रदेश) मधील रहिवासी आहे. वाशीम-अकोला जिल्ह्याच्या सीमेवरील मेडशी टी पॉईंटवर पावणे सात लाखांचा गुटखा जप्त केला आहे. या प्रकरणी एका आरोपीस ताब्यात घेण्यात आले आहे. दुसरीकडे भारतात गांजावर पूर्णपणे बंदी आहे. तरीही लोक छुप्या पद्धतीने गांजाची लागवड करतात. तत्कालीन सरकारने १९८५ मध्ये गांजावर बंदी घातली. गेल्या अनेक वर्षांपासून देशात गांजावरील बंदी हटविण्याची मागणी होत आहे. काही भागांतील शेतकऱ्यांनी गांजाची लागवड करण्याची सरकारने परवानगी द्यावी अशी देखील मागणी केली आहे. बुलढाणा पोलिसांनी अमली पदार्थ विरोधात उघडलेल्या मोहिमेत लागोपाठ गांजाची शेती करणाऱ्यांवर कारवाई केल्याने हा जिल्हा गांजाचे भांडार म्हणून ओळखला जाऊ लागला आहे. मोताळा, मलकापूर तालुक्यातील शेतात मोठ्या प्रमाणावर गांजाची लागवड व झाडे आढळून आली. पोलिसांनी आतापर्यंत अठरा लाख रुपये किमतीचा गांजा जप्त केला आहे. लोणार तालुक्यात पोलिसांनी गांजाची शेती शोधून जवळपास दीड कोटी रुपयांचा गांजा जप्त केला होता. आता शासन, प्रशासनाने अवैध गुटखा विक्री व गांजाची शेती करणाऱ्यांविरोधात कठोर पावले उचलण्याची आवश्यकता व्यक्त करण्यात येत आहे. ▮

९८८१७१७८२८

## इतस्ततः

**दत्तात्रेय आंबुलकर**

# कंपनीतील कामाचे तास आणि कार्यसंस्कृती

कंपन्यांतर्गत कर्मचाऱ्यांच्या कामकाजाच्या संदर्भात त्यांचे कामाचे तास व कंपनीतील कामाची पद्धत दर्शविणारी कार्यसंस्कृती हे मुद्दे बरेचदा व विविध संदर्भात चर्चेला येत असतात. कधी काळी कामाचे तास आणि वैयक्तिक-पारिवारिक जीवनात समन्वय आणि संतुलन साधणे व आपल्या कामापोटी कंपनीसाठी प्रदीर्घ तास आणि वेळ काम करण्याचा काळ गेल्या काही वर्षांत माघारी पडला आहे. याउलट आता कंपन्यांच्या अपेक्षेनुरूप कर्मचाऱ्यांनी कार्यालयातच नव्हे, तर घरूनसुद्धा अधिकाधिक काम करावे, अशी काही व्यवस्थापन-कंपन्यांची अपेक्षा दिसून येते. यामागे कर्मचऱ्यांना त्यांचे काम आणि त्यासाठीचे कामाचे तास याबाबत गृहीत धरण्यात आले असल्याची भावना विविध उद्योगांसह विशेषतः संगणक (आयटी) सेवा क्षेत्रात काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांमध्ये बळावली आहे. कामाच्या व कर्मचाऱ्यांच्या कामकाजाच्या तासांच्या संदर्भातील ही स्थिती व मानसिकता ही कंपन्या आणि कर्मचारी या उभयतांच्या संदर्भात आव्हानात्मक व चिंताजनक ठरली आहे.

सद्यःस्थितीत विशेषतः खाजगी क्षेत्रातील व त्यातही बहुराष्ट्रीय कंपन्यांमध्ये काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांकडून मर्यादित वेळेत अमर्यादित स्वरूपातील कामाची अपेक्षा केली जाते. यात विशेषतः नवे वा नव्याने काम करणारे कर्मचारी अधिकच भरडले जातात. व्यवस्थापक व व्यवस्थापनाच्या दृष्टिकोनातून खाजगी क्षेत्रात काम करणारा प्रत्येक जण व सर्वच कर्मचारी कायमस्वरूपी अस्थायी असतात. हे अलिखित तत्त्व अशा कर्मचाऱ्यांसाठी विशेष तापदायी ठरते.

वाढत्या व्यावसायिक स्पर्धेचे व त्यातून निर्माण होणाऱ्या ताणतणाव व नैराश्याचे लोण आता कंपनी व्यवस्थापन, व्यवस्थापक वा उच्च-पदस्थांपुरतेच मर्यादित न राहता, हे लोण आता सर्व स्तरांवरील व शेवटच्या टप्प्यातील कर्मचारी-कामगारांपर्यंत पोहोचले आहे, हे सद्यःस्थितीत एक कटु वास्तव ठरते. गेल्यावर्षी 'सीए'सारखे व्यवस्थापन क्षेत्र वा कायदा सल्लागार अथवा संगणकशास्त्र वा कॉल सेंटरमधील कर्मचारी असोत, यापैकी काही जणांनी कामाचे स्वरूप व त्यापोटी येणारा ताणतणाव यामुळे आत्महत्येचा मार्ग चोखाळला होता. कामासाठी धडपडणाऱ्यांकडून युवावस्थेत कामापोटी आत्महत्येसारखा आततायी व दुःखद मार्ग स्वीकारणे मोठे दुःखदायक ठरते.



यासंदर्भात 'राष्ट्रीय गुन्हेगारी नोंदणी' विभागातर्फे २०२२ सालचा तपशील व आकडेवारी यांच्याशी निगडित अहवाल सर्वांचेच डोळे उघडणारा ठरला आहे. या अहवालातील महत्त्वाचा व चिंतनीय भाग म्हणजे, २०२२ साली देशातील आत्महत्येच्या एकूण आकडेवारीतील दहा टक्के आत्महत्या करणारे हे पगारदार कर्मचारी-अधिकारी होते. अशाच प्रकारची माहिती अन्य संबंधित सर्वेक्षणांद्वारा वेळोवेळी समोर येतच असते. या जीवघेण्या प्रकाराशी संबंधित ज्वलंत मुद्दा म्हणून 'गॅलप'तर्फे जागतिक स्तरावरील कंपन्यामधील कामाचा प्रकार, कामाचे स्वरूप व कामकाज पद्धत यासंदर्भात नव्याने म्हणजे २०२४ साली केल्या गेलेल्या सर्वेक्षणाचा उल्लेख अपरिहार्य ठरतो. 'गॅलप'च्या या जागतिक स्तरावरील कर्मचारी आणि त्यांचे काम यासंदर्भातील सर्वेक्षणानुसार आपल्यासाठी महत्त्वाची व तेवढीच चिंतनीय बाब म्हणजे, सद्यःस्थितीत भारतातील कर्मचाऱ्यांपैकी बहुसंख्य म्हणजेच तब्बल ८६ टक्के कर्मचारी हे आपले काम व कामाच्या ठिकाणी कामाच्या विलक्षण ताणतणावाखाली व संघर्षशील अवस्था व मानसिकतेत काम करीत आहेत.

आधी बहुराष्ट्रीय कंपन्यांमध्ये असह्य काम आणि जीवघेणे कामाचे तास हा प्रकार व कामाची पद्धत आता भारतीय कॉर्पोरेट क्षेत्रातच नव्हे, तर सेवा उद्योग क्षेत्राच्या माध्यमातून आपल्याकडे सर्वदूर पसरली आहे. याला प्रामुख्याने पाश्चात्त्य व विदेशी कंपन्यांतर्फे भारतीय कंपन्यांतर्फे विशेषतः संगणकीय सेवा क्षेत्रात काम करवून घेणे, हे मोठे व महत्त्वाचे कारण ठरले आहे. मुख्य म्हणजे, या नव्या कामकाज पद्धतीला बँकिंग, विमा क्षेत्रांसह शासन व शासकीय विभाग पण आता अपवाद म्हणून उरले नाहीत, ही वस्तुस्थिती आहे. व्यवस्थापन तज्ज्ञ व कर्मचाऱ्यांचे कामकाज आणि त्यांची कामाच्या संदर्भातील व कामाच्या ठिकाणची मानसिकता यावर अभ्यास करणाऱ्यांच्या मते, कर्मचाऱ्यांच्या संदर्भात काम करताना ज्या प्रमुख गोष्टी त्यांना असह्य व यातनादायी होतात, त्यामध्ये प्रामुख्याने कर्मचाऱ्यांना कामाच्या ठिकाणी दुय्यम दर्जाची वागणूक मिळणे, त्यांच्या व त्यांच्याशी संबंधित कामकाज आणि कामाच्या पद्धतीत त्यांचा सहभाग नसणे वा त्यांच्याकडे दुर्लक्ष होणे, त्यांच्याकडून कायम दुय्यम दर्जाची वा प्रसंगी अनावश्यक वा अनैतिक कामे करवून घेणे, त्यांना कायम तणावग्रस्त स्थितीत काम करणे व त्यावर भर म्हणजे त्यांना अवमानजनक बोलणे, ऐकणे या आणि यासारख्या मुद्यांचा व परिस्थितीचा समावेश असतो. याच विषयाशी निगडित उत्तर अमेरिकेतील कंपन्यांचे मुख्याधिकारी व वित्तीय प्रमुखांमध्ये करण्यात आलेल्या विशेष सर्वेक्षणाद्वारे स्पष्ट झालेली बाब म्हणजे, त्याठिकाणी सर्वेक्षणात सहभागी झालेल्या ८० टक्के उच्चाधिकाऱ्यांनुसार, त्यांच्या कंपन्यांमधील कामकाज पद्धती व कार्यसंस्कृती कंपनी व कर्मचाऱ्यांच्या कामकाजाला पूरक नाही. आपल्याकडील 'गॅलप'द्वारा करण्यात आलेल्या व्यवस्थापकीय सर्वेक्षणामध्येसुद्धा नेमकी हीच बाब दिसून आली होती, ही बाब लक्षणीय आहे.

कर्मचाऱ्यांच्या स्थिर व सकारात्मक विचार आणि मानसिकतेच्या संदर्भात विशेष उपक्रम राबविणाऱ्या 'एचसीएल वेलनेस' कंपनीनुसार सद्यःस्थितीत व्यवस्थापक म्हणून काम करणाऱ्या अधिकाऱ्यांपैकी ३६ टक्के अधिकारी-व्यवस्थापक हे कामाच्या संदर्भात अति व अनावश्यक काळजी व त्याच्याच जोडीला कमी पातळीवरील कामाबद्दलचा गौरव या दोन्ही मुद्यांनी ग्रासलेले आहेत. हीच बाब कर्मचारी स्तरावर पण दिसून येते. मोठ्या संख्येत व काही ठिकाणी तर बहुसंख्य कर्मचारी हे त्यांचे काम, कामाचा प्रकार, कामाचे तास व एकूणच कामकाज म्हणजेच कार्यसंस्कृती यासंदर्भात त्रस्त झालेले असतात. यालाच जोड मिळते ती कंपनी-कर्मचाऱ्यांच्या दरम्यान असणाऱ्या ढासळत्या परस्पर विश्वास व समज आणि आपलेपणाची. कामाचे तास आणि कंपनीअंतर्गत कार्यसंस्कृती यामुळे कर्मचाऱ्यांचे सोडून जाण्याचे प्रमाण व टक्केवारी आजही सर्वाधिक असल्याचे नमूद करून 'गॅलप'ने त्यावर अभ्यासपूर्ण व जळजळीत प्रकाश टाकला आहे. एवढेच नव्हे अशा प्रकारे कंपनी व नोकरी सोडून जाणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या जागी नव्याची नेमणूक करताना व्यवस्थापनाला मोठा वेळ व आर्थिक भारही उचलावा लागतो, ही बाब साधार स्पष्ट केली आहे. ▮

(लेखक एचआर व्यवस्थापन सल्लागार आहेत.)

९८२२८४७८८६

## वाचक पत्रे

### 'त्या' लाडक्या भावांचे काय करणार?

निवडणुकीच्या काळात सत्ता काबीज करण्यासाठी प्रत्येक पक्ष काही ना काही आमिषे तसेच आश्वासन देत असतो. महाराष्ट्र सरकारने इतर राज्यातील अनुकरण करीत लाडकी बहीण योजना आणली. प्रत्येक बहिणीला १५०० रुपये प्रत्येक महिन्याला देऊ असे सांगितले. त्यानुसार अंमलबजावणी देखील झाली. मात्र या लाडक्या बहिणींमध्ये अनेक नियमांचे पालन करणे जमले नाही. जादा उत्पन्न असणारे, शासकीय नोकरदार महिलांनीही याचा लाभ घेतला. सगळ्यात धक्कादायक बाब म्हणजे केवळ महिलाच नव्हे तर पुरुषांनीही या लाडक्या बहिणींप्रमाणे लाभ घेतला असल्याचे उघड झाले आहे. यामध्ये सुमारे १४ हजार २९८ पुरुषांनी अंदाजे २१ कोटी ४४ लाख रुपयांचा लाभ घेतला असल्याचे उघडकीस आले आहे. अशा प्रकारे शासनाची फसवणूक करणाऱ्यांना काय शिक्षा देणार? दिलेली रक्कम त्यांच्याकडून वसूल करावी. या लाडक्या बहिणींसाठी सरकार वर्षाकाठी जवळपास ४२ हजार कोटी रुपये खर्च करीत आहे. मग अशा लबाड, खोट्या पुरुषांना कडक शासन करून त्यांनी घेतलेले रुपये परत जमा करून घ्यावे.

**संतोष राऊत**/९९६०१०४३४५

●● ●●

### ज्ञानेश्वरी वाचनाने जीवनाला सुंदर वळण

आपल्या देशात विविध धार्मिक ग्रंथ आहेत. या ग्रंथांचे वाचन, मनन, चिंतन केल्याने व या ग्रंथातील सकारात्मक बाबी जीवनात उतरविल्याने जीवनातील विविध गुंतागुंतीचे प्रश्न व समस्यांची उकल सहज होते. भारतीय धार्मिक ग्रंथ हे मानवी जीवनाला योग्य व सकारात्मक ऊर्जा देणारे पवित्र व मंगल असे मार्गदर्शक आहेत. देशातील सर्वच धर्मांचे सर्वच ग्रंथ यातून मिळणारे सुंदर, सकारात्मक व निर्मळ जीवन जगण्याचे ज्ञान हे छान जीवन जगण्यासाठी अत्यंत उपयुक्त होय. या सर्वच धार्मिक ग्रंथांपैकी ज्ञानेश्वरी हा ग्रंथ मानवी जीवनाला सत्यम्, शिवम्, सुंदरम् वळण देणारा व जीवन जगण्याचे सुमार्ग दाखविणारा खरा मार्गदर्शक आहे. ज्या देशातील नागरिकांचे अंतःकरण भक्तियुक्त, श्रद्धायुक्त व बुद्धियुक्त असते त्या देशातील प्रत्येक नागरिकाची कृती तेजस्वी, निकोप, निरोगी व निर्मळ असते. ज्ञानेश्वरी ग्रंथ वाचनातून वरील तिन्ही प्रकारचे ज्ञान मिळून वाचकांचे अंतःकरण शुद्ध व ज्ञानयुक्त बनते. यासाठी या भूतलावरील प्रत्येक व्यक्तीने ज्ञानेश्वरी अवश्य वाचावी व जीवन जगण्याचा आनंद घ्यावा.

**धोंडीरामसिंह राजपूत**/९४२१३१२२४४

●● ●●

### नागपंचमीचे धार्मिक महत्त्व

हिंदू धर्मामध्ये सर्प (नाग) हे देवतेच्या स्वरूपात पूजले जातात. नाग हे भगवान शिव आणि विष्णू या देवतांना अत्यंत प्रिय आहेत. भगवान शंकरांच्या गळ्यातील वासुकी नाग, तर भगवान विष्णू शेषनागावर विसावतात. यामुळे सर्पांना दिव्य स्थान प्राप्त झाले आहे. श्रावण महिना हा शिवपूजेसाठी महत्त्वाचा मानला जातो आणि नागपंचमीला सर्पांची पूजा करून शिव आणि विष्णू दोघांच्याही कृपाशीर्वादास पात्र होता येते.

या दिवशी नागदेवतेची पूजा केल्याने सापाबद्दलची भीती दूर होते आणि विषबाधेचे संकट टळते असे मानले जाते. ज्या व्यक्तींना कालसर्पदोष असतो त्यांनी नागपंचमीचे व्रत केल्यास त्यांचे दोष नाहीसे होतात. यमुना नदीतील कालिया नागाचा पराभव करून भगवान श्रीकृष्ण सुरक्षित नदीच्या वर आले. तो दिवस श्रावण शुद्ध पंचमीचा होता. तेव्हापासून नागपंचमी हा सण साजरा केला जाऊ लागला. एकदा एक शेतकरी आपल्या शेतात नांगरणी करत होता. शेतकऱ्याचे नांगर चुकून एका नागिणीच्या बिळावरून गेले आणि नागिणीचे पिल्लं मरण पावली. रागाने त्या नागिणीने शेतकऱ्याच्या मुलाला दंश केला आणि तो मुलगा मरण पावला. त्यानंतर त्या शेतकऱ्याने नागदेवतेची मनोभावे पूजा केली आणि क्षमा मागितली तेव्हा त्या नागिणीचा कोप शांत झाला आणि शेतकऱ्याचा मुलगा परत जिवंत झाला.

नागपंचमी हा सण श्रावण महिन्यातील शुक्ल पक्षाच्या पंचमी या तिथीला येतो. बहुतेक स्त्रिया या दिवशी उपवास करतात. घरामध्ये नागदेवतेचा फोटो लावून त्याची पूजा केली जाते. काही ठिकाणी वारुळाची पूजा केली जाते, तसेच मंदिरात देखील पूजा केली जाते. नागदेवतेला धूप, दीप लावून पूजा केली जाते आणि दूध आणि लाह्यांचा नैवेद्य दिला जातो. नागपंचमीच्या दिवशी झोका खेळण्याची प्रथा आहे. सर्व महिला एकत्र येऊन झोका खेळतात. नागपंचमीच्या दिवशी जमिनीची नांगरणी करू नये. चाकू, सूरी, कोयता किंवा शेतात वापरली जाणारी अवजारे यांचा वापर करू नये. शेतकरी नागपंचमीच्या आदल्या दिवशीच जनावरांसाठी चारा कापून ठेवतो. तसेच महिलांनी देखील स्वयंपाकघरामध्य चाकू, सुरीचा वापर करू नये. या दिवशी तव्याचा वापर करू नये. त्यामुळे शिजवलेले पदार्थ आणि दूध लाह्या खातात. सर्पांना दूध पाजणे टाळावे, हे पर्यावरणाच्या दृष्टीने हानिकारक आहे. ▮

**प्रा. प्रशांत पंत**/मूर्तिजापूर

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com
तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास ९८५०७५३२८१ या व्हॉट्स ॲप क्रमांकावर पाठवावा.

# सोलापूर दिनांक

**सोलापूर तरुण भारत,** सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.




## तुझा भाऊ समाजाचा अध्यक्ष कसा झाला म्हणत मारहाण

### १२ जणांवर गुन्हा दाखल

**सोलापूर, दि. २८ जुलै -**

तुझा भाऊ समाजाचा अध्यक्ष कसा झाला म्हणत जय शंकर तालीमजवळ मारहाण करणाऱ्या १२ जणांवर सदर बझार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत यल्लप्पा नरसप्पा कमलापूरे (वय ५०, रा. जय शंकर तालीम जवळ, मोदीखाना, जगजीवनराम झोपडपट्टी, मोदी, सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन अजय जंगडेकर, रघु जंगडेकर, राजू जंगडेकर, रमेश जंगडेकर, हरिष जंगडेकर, मंगेश जंगडेकर, दिनेश जंगडेकर, लक्ष्मी जंगडेकर, यल्लूबाई जंगडेकर, सुनिता जंगडेकर, अश्विनी जंगडेकर, मल्लम्मा जंगडेकर (सर्व रा. जय शंकर तालीम जवळ, मोदीखाना, जगजीवनराम झोपडपट्टी, मोदी, सोलापूर) यांच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. २७ जुलै रोजी रात्री साडेदहाच्या सुमारास यल्लप्पा कमलापूरे यांच्या घराशेजारी राहणाऱ्या अजय जंगडेकर आणि इतर आरोपीनी मिळून कमलापूरे व त्यांच्या कुटुंबातील लोकांना तुझा भाऊ समाजाचा अध्यक्ष कसा झाला, समाजाचा अध्यक्ष कुमार जंगडेकरच आहे असे म्हणून तेलगू भाषेत घाणघाण शिवीगाळ करून दमदाटी करून लोखंडी रॉड, लोखंडी पाईप, लाकडी बांबूने कमलापूरे यांना मारहाण करून गंभीर जखमी केले. तसेच महिलांनी कमलापूरे व त्यांच्या कुटुंबियांच्या अंगावर चटणी पावडर टाकून इजा पोहाचवलेली आहे. म्हणून सदर बझार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सहायक पोलिस निरीक्षक कुलकर्णी पुढील तपास करीत आहेत.

## ▶▶ महत्वाचे...

### पूर्व वैमनस्यातून तरूणास मारहाण; चौघांविरुध्द गुन्हा

**सोलापूर, दि.२८ जुलै-**

पूर्व वैमनस्यातून तरूणास मारहाण करणाऱ्या चौघांविरुध्द जोडभावी पेठ पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



याबाबत प्रभाकर सुरेश जमादार (वय २२, रा. घोंगडे वस्ती, भवानी पेठ, सोलापूर) याच्या फिर्यादीवरुन सुमित कोठे, श्रीशैल संगापूरे, सुदीप मेठी, प्रथमेश ताटे (सर्व रा. घोंगडे वस्ती, भवानी पेठ, सोलापूर) यांच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आल आहे. २७ जुलै रोजी सायंकाळी प्रभाकर जमादार हा घोंगडे वस्ती येथील मावस भाऊ किरण अडगळे मिळून घरासमोर बसलेले होते. त्यावेळी सुमित कोठे व इतरांनी तेथे येऊन दुपारी कुचन हायस्कूल येथे झालेल्या भांडणाचा राग मनात धरून जमादार यास शिवीगाळ करू लागले. त्यावेळी जमादार हा त्यांना समजावून सांगत असताना सुमित कोठे याने तेथेच पडलेले लाकडी काठी उचलून जमादार व त्याचा भाऊ अडगळे याच्या हातावर मारहाण केली. तसेच हाताने व लाथाबुक्क्याने मारहाण केली. मारहाणीत जमादार याच्या डाव्या हाताला व भाऊ किरण याच्या उजव्या हाताला उजव्या हाताला जखम झाली आहे. म्हणून जोडभावी पेठ पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हवालदार दुधाळे पुढील तपास करीत आहेत.



### दुकानाचे कुलूप तोडणाऱ्या डॉक्टराविरुध्द गुन्हा दाखल


**सोलापूर, दि. २८ जुलै -**

दुकानाचे कुलूप तोडून वृध्दास जागेमध्ये जाण्या प्रतिबंध करणाऱ्या डॉक्टराविरुध्द जेलरोड पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत जब्बार इमामसाब इंगळगी (वय ६५, रा. काजल नगर, आयडीएल शाळेच्या बाजूला, सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन डॉ. कदीर पटवेगार (रा. तेलंगी पाच्छा पेठ, सोलापूर) यांच्याविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. १७ मे २०२५ रोजी जब्बार इंगळगी हे त्यांच्या मालकीच्या तेलंगी पाच्छा पेठेतील दुकानाची पाहणी करण्यासाठी आले होते. त्यावेळी डॉ. कदीर पटवेगार हे दुकानाचे कुलूप इलेक्ट्रिक ग्रायंडरने कट करीत असताना दिसून आला. त्यामुळे इंगळगी यांनी पटवेगार यास कुलूप का तोडतो असे विचारले असता पटवेगार याने मी या बिल्डींगचा मालक आहे, मी काय पण करणार असे म्हणून इंगळगी यांच्या जागेमध्ये इंगळगी यांना प्रतिबंध केला व कुलूप तोडून नुकसान केले. म्हणून जेलरोड पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हवालदार मस्के पुढील तपास करीत आहेत.

### वृध्दाचे ६० हजार रुपये एटीएममधून काढून फसवणूक

**सोलापूर, दि.२८ जुलै-**

हातचालाखी करून वृध्दाचे ६० हजार रुपये एटीएममधून काढून घेऊन फसवणुक करणाऱ्याविरुध्द जोडभावी पेठ पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत बब्रुवान सदाशिव गायकवाड (वय ८४, रा. हनुमान नगर, वाघमोडे यांच्या वाड्यात, सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन अज्ञात व्यक्तीविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. २१ जून रोजी पावणे आकरा वाजता बाळीवेस येथील



स्टेट बँक ऑफ इंडिया येथील एटीएम सेंटर येथे बब्रुवान गायकवाड हे पेन्शनची रक्कम काढण्यासाठी गेले होते. त्यावेळी एका अनोळखी व्यक्तीने गायकवाड यांच्याजवळील एटीएम कार्ड घेऊन कार्डची हातचालाकी करून कार्डची आदलाबदल करून गायकवाड यांचे एटीएम कार्ड स्वतःकडे ठेवले. त्या अनोळखी व्यक्तीने त्याच्याकडील एटीएम कार्ड मशिनमध्ये घालून गायकवाड यांना चारअंकी पिन दाबण्यास सांगून तो पिन पाहून एटीएम सेंटरमधून निघून गेला. त्यानंतर त्या अनोळखी व्यक्तीने गायकवाड यांचे एटीएम वापरून त्यांच्या खात्यावरील ६० हजार रुपये काढून घेऊन फसवणुक केली. म्हणून जोडभावी पेठ पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हवालदार शिवशरण पुढील तपास करीत आहेत.







अकलूज : जयसिंह मोहिते पाटील व सुलक्षणा देवी मोहिते-पाटील, ऋतुजादेवी मोहिते-पाटील यांनी शिवपार्वती मंदिरामध्ये यांनी पूजाअभिषेक केला. दुसऱ्या छायाचित्रात नाम जप करताना महिला भगिनी. तर तिसऱ्या छायाचित्रात मंदिर व परिसरात करण्यात आलेली आकर्षक विद्युत रोषणाई.

## अकलूजच्या शिवमंदिरात दर्शनासाठी भाविकांची गर्दी

**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि.२८ जुलै-**

शंकरनगर येथील शिवपार्वती मंदिरामध्ये महाशिवरात्र यात्रा महोत्सव समितीचे अध्यक्ष जयसिंह मोहिते-पाटील त्यांच्या पत्नी सुलक्षणादेवी मोहिते-पाटील व कुटुंबातील सदस्यांनी लघुरुद्र अभिषेक केला. यावेळी ऋतुजादेवी मोहिते-पाटील व कृष्णप्रिया उपस्थित होत्या. लघुरुद्र अभिषेकाचे पौरोहित्य श्रीपुरचे भरत जोशी व त्यांच्या सहकाऱ्यांनी केले.

यावेळी मंदिराचे पुजारी प्रसाद कुलकर्णी, वेदांत कुलकर्णी यांनी त्यांना सहकार्य केले. पूजेनंतर प्रसाद वाटप करण्यात आला. शिवपार्वती मंदिरामध्ये गेली पाच वर्षापासून श्रावण महिन्यानिमित्त 'हर हर हर हर महादेवा पार्वती शंकर सदाशिवा' हा नाम जप अखंड चालू असतो या नामजपत परिसरातील १ हजार ३२० महिला सहभागी झाल्या आहेत. टप्प्याटप्प्याने महिला दररोज सकाळी आठ ते सायंकाळी सात पर्यंत हा नामजप करतात. तसेच दर सोमवारीही वर्षभरही नामजप सुरू असतो. नागपंचमी सणानिमित्त दि. २८ व २९ जुलै रोजी महिलांचा पारंपारिक खेळ आयोजित केला आहे. यासाठी परिसरातील सुमारे २० ते २५ हजार महिला उपस्थित राहतील असे संयोजकांनी सांगितले.



वारुळाची पूजा करताना महिला भगिनी

मंदिरामध्ये पहाटे हरिपाठ व सकाळी आरती सायंकाळी महाआरती व प्रसाद वाटप हा दररोजचा कार्यक्रम असतो. श्रावण महिन्या निमित्त शिवपार्वती मंदिरामध्ये दि. ४ ते ६ ऑगस्ट शिवलीला अमृत ग्रंथाचे पारायण होणार असून यामध्ये १ हजार ५०० महिलांनी नाव नोंदणी केली आहे. मंदिराच्यावतीने पारायणासाठी ग्रंथ व पूजेचे साहित्य देण्यात येणार आहे. पारायणानंतर महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. श्रावणी सोमवारनिमित्त माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते-पाटील, मदनसिंह मोहिते-पाटील, विश्वतेजसिंह मोहिते-पाटील यांनी दर्शन घेतले. अकलूज येथील जुना बाजारतळ महादेव मंदिरामध्ये वीरशैव लिंगायत समाजाचे वतीने विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. त्याप्रमाणे पहाटे सोमनाथ कथले व कुटुंबियाच्यावतीने अभिषेकपूजा करण्यात आली. तर मल्लिकार्जुन मंदिर येथे नागेश निगाडे व त्यांच्या कुटुंबाच्या वतीने महाभिषेक व पूजा करण्यात आली. ओम नमः शिवाय हा नाम जप दररोज महादेव मंदिर सायंकाळी सहा ते आठ असा होतो. नीरा नदी काठावरील महादेव मंदिरामध्ये सुभाष कुंभार व कुटुंबियांच्यावतीने अभिषेक व पूजा करण्यात आली. आनंदी गणेश येथील स्वयंसिद्ध महादेव मंदिरामध्ये मोहिते-पाटील कुटुंबियांच्या वतीने पूजन करण्यात आले. तर पुरातन बुरुजा महादेव मंदिरामध्ये भाविकांनी गर्दी केली होती. मंदिरामध्ये भाविकांच्या सुविधांसाठी दर्शन व्यवस्था प्रसाद वाटप करण्यात येत होते.



## पहिल्या श्रावण सोमवारनिमित्त महारुद्राभिषेक भक्तिभावात

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२८ जुलै-**

पहिल्या श्रावण सोमवारनिमित्त मारवाडी युवा मंच मिडटाउन महिला शाखा आणि लड्डा परिवारातर्फे सामूहिक महारुद्राभिषेक करण्यात आला. तुळजापूर वेस येथील महेश्वरी सांस्कृतिक भवनात कार्यक्रम झाला.

परळी येथील उत्तमजी महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली प्रारंभी गणेशपूजन झाले. त्यानंतर महारुद्राभिषेकास प्रारंभ झाला. यावेळी २७ दाम्पत्यांनी सामूहिक महारुद्राभिषेक केला. उत्तमजी महाराज यांनी पौरोहित्य केले. यानंतर भाविकांना प्रसादाचे वाटप करण्यात आले. याप्रसंगी भाविकांनी दर्शनासाठी गर्दी केली होती.

याप्रसंगी मारवाडी युवा मंच मिडटाउन महिला शाखेच्या अध्यक्षा राणी होलाणी, सचिवा निशा होलाणी, कोषाध्यक्षा सपना काबरा, प्रमुख नंदा लाहोटी, ज्योती चंडक, सुनिता बजाज, शोभा मालू, किशोरी लाहोटी, विजया भैय्या, राजश्री लड्डा, श्रीकांत लड्डा, लक्ष्मीकांत लड्डा, सुवर्णा बजाज, नीता राठी, हेमा बजाज, पद्मा बजाज आदी उपस्थित होत्या.

## तेलंगणा प्रांतात श्री काशी जगद्गुरूंचे तपोऽनुष्ठान

### ८ ऑगस्ट रोजी होणार जन्मोत्सव

**तभा वृत्तसेवा**
**वाराणसी, दि. २८ जुलै -**

श्री काशी जगद्गुरू डॉ. चंद्रशेखर शिवाचार्य महास्वामीजी यांचे श्रावण मासनिमित्त तेलंगणा प्रांतात तपोऽनुष्ठान होणार आहे. तेलंगणा प्रांताला पूर्वी त्रिलिंग देश असे नाव होते. अपभ्रंश होऊन आज त्याला तेलंगणा म्हणतात. श्रीसिद्धान्त शिखामणीमध्ये शिवयोगी शिवाचार्यांनी स्पष्टपणे सांगितले आहे, अथ त्रिलिंगविषये कुल्यपाकाभिदस्थले सोमेश्वर महालिंगात् प्रादुरासीत् स रेणुकः यातील विषय शब्द देशवाचक आहे. आंध्र आणि तेलंगणा या दोन राज्यांची निर्मिती आता झाली. पूर्वी हा एकच प्रांत होता. या प्रांताला त्रिलिंग देश म्हणण्याचे कारण म्हणजे या प्रदेशातील




तीन सुप्रसिद्ध लिंग होय. कोल्लिपाकी सोमेश्वरलिंग, श्रीशैल मल्लिकार्जुनलिंग, द्राक्षाराम क्षेत्रातील भीमनाथलिंग हे ते सुप्रसिद्ध तीन लिंग आहेत.

या तीन लिंगांमुळे या भागाला त्रिलिंग देश असे म्हटले जात होते. हे तीनही लिंग वीरशैवांच्या प्राचीन अशा पंचाचार्य परंपरेतील आहेत. सोमेश्वरलिंग कलियुगातील रंभापुरी पीठाचे जगद्गुरू रेवणसिद्धांचे प्राकट्य स्थान आहे. श्रीशैल क्षेत्रातील मल्लिकार्जुनलिंग हे जगद्गुरू पंडिताराध्यांचे प्राकट्यस्थान आहे. केदारपीठाचे भीमनाथलिंग हे श्री जगद्गुरू एकोरामाराध्यांचे प्राकट्य स्थान



आहे. वीरशैव लिंगायत परंपरेतील तीन जगद्गुरूंचे प्राकट्य स्थान असल्यामुळे या त्रिलिंग देशाला विशेष महत्त्व आहे. ब्रह्मसूत्रावरील श्रीकर भाष्य लिहिणारे वीरशैव भाष्यकार श्रीपती पंडिताराध्य आंध्रप्रदेशाचेच आहेत. महात्मा बसवेश्वरांवरील पहिले पुराण सुप्रसिद्ध भीम कवींनी तेलुगु भाषेतच रचले. त्यामुळे वीरशैवांचे वास्तव्य प्राचीन काळापासून भारतातील विविध प्रांतांबरोबर आंध्र, तेलंगणातही आहे.

त्रिलिंग म्हणजे स्थावर लिंगाबरोबरच इष्टलिंग, प्राणलिंग आणि भावलिंग होय. या तीन लिंगांची अर्चना करणाऱ्या वीरशैव लिंगायत भक्तांची संख्या या प्रदेशात मोठ्या प्रमाणावर होती. श्री काशी महास्वामीजींनी त्रिलिंग देशाचे महत्त्व आणि वीरशैव तत्त्वज्ञान सर्वांना समजावून सांगावे म्हणून पंधरा दिवसांचे तपोऽनुष्ठान तेलंगणा प्रांतातील भक्तांनी आयोजित केले आहे. २५ जुलैपासून ८ ऑगस्टपर्यंत अनुष्ठान तेलंगणा प्रांतात आहे. ८ ऑगस्ट रोजी महास्वामीजींचा ७९ वा जन्मोत्सव आहे. हे औचित्य साधून या कार्यक्रमाचे आयोजन केले आहे. महास्वामीजींच्या जन्मोत्सवामुळे पाच दिवस विशेष कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

## शहरात होणार यज्ञोपवितं परमम् पवित्रम् मंत्राचा जागर

### आज सहा ठिकाणी तर ९ ऑगस्टला तीन ठिकाणी ब्राह्मण समाजातर्फे श्रावणीचे कार्यक्रम

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर दि. २८ जुलै-**

ब्राह्मण समाजातील विविध संस्था आणि संघटनांतर्फे प्रतिवर्षी श्रावण महिन्यामध्ये नागपंचमी आणि श्रावण पौर्णिमा असे दोन दिवस वेगवेगळ्या भागात श्रावणीचे अर्थात नवीन यज्ञोपवित (जानवे) धारण करण्याचे कार्यक्रम आयोजित केले जातात. त्याप्रमाणे यावर्षी श्रावणीचे कार्यक्रम विविध ठिकाणी होत आहेत. यावर्षी मंगळवार दिनांक २९ जुलै नागपंचमी दिवशी ६ ठिकाणी तर ९ ऑगस्ट श्रावण पौर्णिमेला ३ ठिकाणी श्रावणीचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. *यज्ञोपवितं परमं पवित्रम् । प्रजापतेर्यत्सहजं पुरस्तात ।। आयुष्यमग्रं प्रतिमुञ्च शुभ्रं । यज्ञोपवितं बलमस्तु तेजा: या प्राचीन मंत्राचा जागर या श्रावणीच्या निमित्ताने होणार आहे.

वेगवेगळ्या भागात राहणाऱ्या समाज बांधवांना या कार्यक्रमात सहभागी होता यावे, यासाठी शहरातील विविध भागात हा श्रावणीचा कार्यक्रम होणार आहे. तरी सर्व समाज बांधवांनी आपापल्या जवळच्या ठिकाणी असलेल्या श्रावणीच्या कार्यक्रमात सहभागी होऊन नवीन यज्ञोपवीत धारण करावे, असे आवाहन ब्राह्मण समाजातील विविध संघटनांच्या वतीने करण्यात आले आहे. श्रावणीस येताना समाजबांधवांनी पळी, पंचपात्र, तामण, सोवळे, उपरणे, बसण्यासाठी आसन, जानवी जोड घेऊन यावेत. श्रावणीसाठी लागणारे अन्य साहित्य आणि व्यवस्था संयोजकांतर्फे केली जाणार आहे.

**बी.बी.एन.चा उपक्रम :** ब्राह्मण बिझनेस नेटवर्क या संस्थेतर्फे या श्रावणीच्या निमित्ताने उपक्रम राबविला जात आहे. समाज बांधवांना श्रावणीला जाणे जमणार नाही त्यांच्यासाठी वेदप्रतिष्ठानतर्फे होणाऱ्या श्रावणीमध्ये श्रावणीचा विधी करून मंतरलेली जानवी उपलब्ध करून दिली जाणार आहेत. इच्छुकांनी संपर्क साधण्याचे आवाहन रवी हलगीकर यांनी केले आहे.

### खालील ठिकाणी होणार श्रावणी कार्यक्रम

**वेद प्रतिष्ठान :** वेद प्रतिष्ठान या संस्थेतर्फे जुन्या एम्प्लॉयमेंट चौकातील दंडवते महाराज मठामध्ये सकाळी ६.३० वाजता श्रावणीचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. या ठिकाणी मुकुंद मुळेगावकर गुरुजी पौरोहित्य करणार आहेत, असे वेद प्रतिष्ठानचे सल्लागार गोविंद गवई गुरुजी यांनी कळविले आहे.

**ब्राह्मण सेवा संघ :** ब्राह्मण समाज सेवा संघातर्फे सकाळी ७.३० वाजता श्रावणी आयोजित करण्यात आली आहे. हा श्रावणीचा कार्यक्रम डफरीन चौकातील संस्थेच्या आदर्श मंगल कार्यालयात होईल. जयंत फडके गुरुजी हे श्रावणीचे पौरोहित्य करणार आहेत, अशी माहिती ब्राह्मण समाज सेवा संघाचे सचिव वामन कुलकर्णी यांनी दिली आहे.

**इंदिरानगर गणेश मंदिर :** विजापूर रोडवरील इंदिरानगर गणेश मंदिरात राघवेंद्राचार्य आद्य गुरुजी यांच्या पौरोहित्याखाली सकाळी साडेसहा वाजता श्रावणीचा कार्यक्रम होणार आहे, अशी माहिती लक्ष्मीकांत चपळगावकर गुरूजी यांनी दिली आहे.

**सहयोग ब्राह्मण सेवा संघ :** जुळे सोलापुरातील सहयोग ब्राह्मण सेवा संघातर्फे सकाळी सात वाजता दिपाली केटरर्स या ठिकाणी श्रावणी आयोजित करण्यात आली आहे. या ठिकाणी चंद्रशेखर सप्रे गुरुजी श्रावणीचे पौरोहित्य करणार आहेत, अशी माहिती सहयोग ब्राह्मण सेवा संघाचे अध्यक्ष श्रीकांत कुलकर्णी यांनी दिली आहे.

**वसंत नगर गणेश मंदिर :** जुळे सोलापुरातील वसंत नगरातील गणेश मंदिरामध्ये सकाळी साडेसहा वाजता श्रावणीचा कार्यक्रम होणार आहे. या ठिकाणी विठ्ठल जोशी वैरागकर हे पौरोहित्य करणार आहेत.

**ब्रह्म प्रतिष्ठान :** ब्रह्मप्रतिष्ठानतर्फे साडेसात वाजता श्रावणी आयोजित करण्यात आली आहे. ब्रह्मचैतन्य नगरातील सुहास देशपांडे यांच्या निवासस्थानी सकाळी सात वाजता हा कार्यक्रम होईल. जयंत तुळजापूरकर पौरोहित्य करणार आहेत, अशी माहिती संस्थापक अध्यक्ष सुहास देशपांडे यांनी दिली.

**जुळे सोलापूर ब्रह्म सेवा संस्था :** जुळे सोलापूर ब्रह्म सेवा बहुउद्देशीय संस्थेच्या वतीने शनिवार दिनांक नऊ ऑगस्ट रोजी श्रावणी आयोजित करण्यात आली आहे. या ब्रह्मवृंदांना २९ जुलै म्हणजे नागपंचमीच्या दिवशी श्रावणी करणे जमत नाही त्यांची सोय म्हणून प्रतिवर्षी ब्रह्मसेवा संस्थेतर्फे श्रावण पौर्णिमेलाच श्रावणी केली जाते अशी माहिती संस्थेचे अध्यक्ष डी. डी. कुलकर्णी यांनी दिली यावर्षी हा श्रावणीचा कार्यक्रम ९ ऑगस्ट श्रावण पौर्णिमेला जुळे सोलापुरातील श्रीकांत नगर येथील गणेश मंदिरात सकाळी साडेसात वाजता होणार आहे. या ठिकाणी राघवेंद्राचार्य आद्य गुरुजी हे पौरोहित्य करतील असेही डी. डी. कुलकर्णी यांनी सांगितले.

**यल्लालिंग मठ : कर्णिक नगर :** कर्णिक नगरातील ब्राह्मण समाजातर्फे याच परिसरात असलेल्या यल्लालिंग मठामध्ये दिनांक ९ ऑगस्ट रोजी म्हणजे श्रावणी पौर्णिमेला श्रावणी चा कार्यक्रम होणार आहे सकाळी साडेसात वाजता या कार्यक्रमास सुरुवात होईल अशी माहिती संयोजक राहुल उपाध्ये आणि बजरंग कुलकर्णी यांनी दिली आहे.

**मध्व परिषद : उत्तराची मठ :** सोलापूरच्या मध्व परिषदेतर्फे ९ ऑगस्ट रोजी सकाळी सात वाजता पाटील नगरातील उत्तरादी मठाच्या प्लॉटवर श्रावणीचा कार्यक्रम होणार आहे, अशी माहिती बी.जी. कुलकर्णी यांनी दिली आहे. याठिकाणी विद्या निधी आचार्य आणि अमित आचार्य हे पौरोहित्य करणार आहेत.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.
सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

# भागवत ग्रंथ म्हणजे भगवंताची वाङ्मयीन मूर्ती : ह.भ.प. डॉ. जयवंत बोधले महाराज

**तभा वृत्तसेवा**
**बार्शी, दि.२८ जुलै-**

भगवंताच्या स्वरुपाचं चिंतन ज्या ग्रंथात केलेले आहे. तो ग्रंथ म्हणजेच श्रीमद्भागवत होय. 'भागवत' या शब्दाचं मराठी माणसावर फार मोठं गारुड आहे. असं जरी असलं तरी 'भागवत' हे एका राज्यापुरतं मर्यादित नसून ते सर्व व्यापक आहे. शास्त्राने भागवताचे तीन अर्थ सांगितले आहेत. १) भगवंताच्या स्वरुपाचं चिंतन ज्या ग्रंथात केलेले आहे ते भागवतच आहे. २) भगवंताकडून जे सांगितले जाते किंवा भगवंत जे उपदेश करतात ते भागवतच आहे. ३) भगवंत ज्यांच्या हृदयामध्ये आहे अशा भक्तांचा विचार ज्या ग्रंथात केलेला आहे, तो ग्रंथ भागवत ग्रंथच आहे, असे निरुपण श्रीगुरु डॉ. जयवंत महाराज बोधले यांनी केले. ते आज श्रावणमास प्रवचनमालेतील तिसऱ्या दिवशीचे श्रीमद्भागवत कथा चिंतन या विषयावर चिंतन करत होते.



श्रावणमास प्रवचनमाला
भाग - ३

भागवतामध्ये एकूण १२ स्कंद सांगितलेले आहेत. त्यातील एकादश स्कंदावर संत एकनाथ महाराजांनी मराठी भाषेत निरुपण केलेले आहे. म्हणून, त्यास एकनाथी भागवत असे म्हटले जाते. भागवताची महती सांगताना शुकाचार्य राजा परिक्षिताला म्हणतात- श्रीमद्भागवत म्हणजेच भगवंत आणि भगवंत म्हणजेच श्रीमद्भागवत होय. भगवंताचे स्वरुप हे सच्चिदानंद स्वरुप आहे. निर्गुण दृष्टीने भगवंताचे स्वरुप सांगताना, जे सद् रुप आहे, जे चिद् रुप आहे आणि जे आनंद रुप आहे, ते भागवत आहे. थोडक्यात सद् रुपाचा विचार ज्या ग्रंथात आहे, ते भागवत आहे. चिद् रुपाचा विचार ज्या ग्रंथात आहे, ते भागवत आहे आणि आनंद रुपाचा विचार ज्या ग्रंथात आहे ते भागवत आहे. सत् म्हणजे सत्य, तात्विकतेने त्याचा अर्थ सत्ता असा आहे. चित् म्हणजे प्रकाश, परमात्मा प्रकाशमय आहे. 'ज्ञानदेव म्हणे ज्योतीची निजज्योति' आनंद म्हणजेच सुख 'सुखरूप ऐसा दुजा कोण सांगा,' असे तुकाराम महाराज म्हणतात. परमात्म्याचे असे वर्णन ज्या ग्रंथात आहे ते भागवत आहे. म्हणजेच भगवंत सच्चिदानंद स्वरुप आहे आणि भागवत ही सच्चिदानंद स्वरुपच आहे. म्हणजेच जीवाला जर सद् रुप व्हायचे असेल तर भागवत ऐकावे, जीवाला जर चिद् रुप व्हायचे असेल तर भागवत ऐकावे आणि जीवाला जर आनंद रुप व्हायचे असेल तर भागवत ऐकावे, असे हभप श्रीगुरु डॉ. जयवंत महाराज बोधले यांनी सांगितले. ज्ञानोबाराय म्हणतात, भगवंत म्हणजे यश, श्री, औदार्य, ज्ञान, वैराग्य आणि ऐश्वर्य या सहा गुणांनी जे युक्त आहे तेच भगवंत आहेत. भगवंताच्या स्वरुपाचा विचार करताना ज्या सहा गोष्टी सांगितल्या आहेत, त्याचा विस्तृत विचार भागवत ग्रंथामध्ये आहे कलियुगातील विकारग्रस्त जीवांना सोडविण्याचे कार्य ज्या ग्रंथ श्रवणाने होईल तो ग्रंथ म्हणजे भागवत होय. शेवटी भगवंताला उद्धवाने विचारले की, आपण कुठे आहात तर भगवान म्हणतात की भागवतामध्ये मी आहे याचा अर्थ भागवत म्हणजे भगवंताचे शरीर होय, असे विचार डॉ. जयवंत महाराज बोधले यांनी श्रोत्यांसमोर मांडले .

## सुप्रभात

### आजचा दिवस

| | |
|---|---|
| वार : मंगळवार | दिनविशेष- चांगला दिवस |
| दि. २९ जुलै २०२५ | जागतिक व्याघ्र दिन, |
| विक्रम संवत् २०८२ | नागपंचमी, मंगलागौरी पूजन |
| शके - १९४७ | ....राहू काल.... |
| संवत्सर - विश्वावसु | रविवार : दु.४.३० ते ६.०० |
| मास - श्रावण | सोमवार : स. ७.३० ते ९.०० |
| शु. पंचमी (२४.४५) | मंगळवार : दु. ३.०० ते ४.३० |
| ऋतु - वर्षा | बुधवार : दु. १२ ते १.३० |
| नक्षत्र - उ. फाल्गुनी (१९.३६) | गुरुवार : दु. १.३० ते ३.०० |
| योग - शिव (२७.०३) | शुक्रवार : स.१०.३० ते १२ |
| करण - बव (१२.००) | शनिवार : स. ९ ते १०.३० |

### राशीभविष्य

**मेष :** अंगिकृत कार्यात मनासारखी प्रगती साधता येईल. आर्थिक गुंतवणूक योग्य प्रकारे करावी. कौटुंबिक जीवनात सामंजस्याने रहावे.

**वृषभ :** उत्साहवर्धक घटना घडतील. गृहसजावट, गृहबांधणी अशा व्यवसायात मनासारखी प्रगती होईल.

**मिथुन:** कितीही योजना करा, वेळेला जे हवे आहे तेच होत असते. धनस्थ मंगळा मुळे आर्थिक बाबतीत विशेष जागरूक रहावे.

**कर्क:** घाईने निर्णय नको रूप आणि रूपया यावर कधीच गर्व नाही करायचा. गरीबी, आजार कधीच सांगून येत नाही.

**सिंह :** नवीन योजना विचारपूर्वक स्वीकाराव्यात. प्रकृतीच्या तक्रारींची दखल घ्यावी. डोळ्याच्या तक्रारी संभवतात. काळजी घ्यावी.

**कन्या :** वैद्यकिय, कृषि क्षेत्रात मनासारखी प्रगती होत जाईल. कौटुंबिक जीवनातील समस्या विचाराने, सामंजस्याने सोडवाव्यात.

**तुळ :** आत्मविश्वास वाढविणाऱ्या घटना घडतील. कला-गुणांच्या प्रगतीसाठी अधिक प्रयत्नांची गरज आहे. नव्या संधीचे स्वागत करावे.

**वृश्चिक :** कौटुंबिक जीवनात सौख्य लाभेल. अडचणीतून मार्ग निघत जाईल. नव्या योजना विशेष लाभदायक ठरतील. महत्त्वाची कामे करून घ्यावीत.

**धनु :** कार्यक्षेत्रात अधिक विचाराने रहावे. घाईने कोणतेही निर्णय घेऊ नका. स्थावर बाबतीत शुभ घटना घडतील.

**मकर :** नव्या योजना विचारपूर्वक स्वीकाराव्यात कला-गुणांचा विकास होत जाईल. जीवनात वादाचे प्रसंग टाळावेत. प्राप्तीचे प्रमाण समाधानकारक राहिल.

**कुंभ :** उत्साहवर्धक घटना घडतील. नव्या कामांना गती मिळेल. चिकाटीने रहावे. प्रगती होत जाईल. अपेक्षित संधी लाभतील.

**मीन:** व्यवसायात विचाराने रहावे. सरकारी कामे करून घ्यावीत. यश मिळेल. नव्या विचारांना चालना मिळेल.

## ए. जी. पाटील अभियांत्रिकीच्या विद्यार्थ्यांकडून

# ब्लड प्रेशर चेकिंग कम मसाजरची निर्मिती

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २८ जुलै-**

विजापूर रोडवरील सोलापुरातील एक नामांकित संस्था अशी ओळख असणाऱ्या तसेच नावीन्यपूर्ण प्रकल्प बनविण्यासाठी प्रसिद्ध असणाऱ्या ए.जी.पाटील अभियांत्रिकी कॉलेजच्या मेकॅनिकल इंजिनिअरिंगच्या अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांनी अतिशय नाविन्यपूर्ण अशा ब्लड प्रेशर चेकिंग कम मसाजर मशीनची अंतिम वर्षाच्या प्रकल्पांतर्गत निर्मिती केल्याची माहिती महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. व्ही.व्ही. पोतदार यांनी दिली.या मशीनचा उपयोग व्यक्तींचा ब्लडप्रेशर जाणून घेण्यासाठी तर होतोच त्याचबरोबर याचा उपयोग दुखापतग्रस्त स्नायूंना मसाज करण्यासाठी होतो. साधारणपणे या दोन्ही गोष्टींसाठी दोन वेगवेगळ्या मशीन्सची गरज भासते, या प्रॉब्लेम वर उपाय म्हणून विद्यार्थ्यांनी या मशीनची निर्मिती केली. या मशीनचा उपयोग गृहिणी, वृद्ध माणसे, ट्रेकर्स, मेडिकल फिल्ड मध्ये काम करणारे यांना विशेष करून होईल अशी माहिती यावेळी त्यांनी दिली.



या मशीनची निर्मिती ही शिवराज पाटील, गुरुराज पाटील आणि वीरभद्र पाटील यांनी केली असून मेकॅनिकल विभागाचे प्रा. उपाध्ये एस.एन. यांनी मार्गदर्शन केले तसेच प्रा. लिगाडे एस. जे. यांनी इलेक्ट्रॉनिक पार्ट संदर्भात मार्गदर्शन केले. विभागप्रमुख डॉ. एस.बी. गदवाल, प्राचार्य डॉ.व्ही. व्ही. पोतदार,कॅम्पस डायरेक्टर डॉ. एम.ए. चौगुले, संस्थेचे ट्रस्टी एस. एस. पाटील व संस्थेचे अध्यक्ष एस. ए .पाटील यांनी सर्वांचे कौतुक केले.

# २७ ग्रॅम सोन्याचे दागिने एसटी बसमधून लंपास

■ **अज्ञात चोरट्याविरुध्द गुन्हा दाखल**

**बार्शी, दि.२८ जुलै-**

तालुक्यातील पानगाव येथील पती-पत्नी हडपसर, पुणे येथे मुलाकडे एस.टी. बसमधून जाताना चोरट्यांनी पर्सचा कप्पा कापून नेकलेस व राणीहार २७ ग्रॅम सोन्याचे दागिने अडीच लाख रुपयांचा ऐवज लंपास केला. याप्रकरणी बार्शी तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे.

दिलीप मोरे (वय ५२, रा. पानगाव) यांनी फिर्याद दाखल केली अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला असून ही घटना शनिवारी दुपारी साडेबाराच्या दरम्यान उघडकीस आली. पती-पत्नी मुलाकडे हडपसर येथे जात होते. बसमध्ये चढताना गर्दी होती.

बस खांडवीपर्यंत गेल्यावर पर्सचा एक कप्पा कापला गेल्याचे लक्षात आले. एक तोळ्याचे नेकलेस व १७ ग्रॅमचा राणीहार गायब होता. तरीही प्रवास करुन हडपसर येथे गेलो. नातेवाईकांशी चर्चा करुन पहाटे परत येऊन फिर्याद दिली असे म्हटले आहे. या घटनेचा पोलीस तपास करीत आहेत.



# गृहरक्षक नलिनी सागरे सेवानिवृत्त

**तभा वृत्तसेवा**
**अक्कलकोट दि २८ जुलै**

अक्कलकोट गृहरक्षक पथकाच्या वतीने पथकातील महिला होमगार्ड नलिनी राजकुमार सागरे यांचा गृहरक्षक दलातुन सेवानिवृत्त झाल्याने त्यांचा सत्कार डॉक्टर आसावरी पेडगावकर यांच्या हस्ते करण्यात आला निरोप समारंभाचा कार्यक्रम पार पाडला . नलिनी सागरे अंत्यत होतकरू कष्ठाळ् प्रामाणिक शिस्तप्रिय सेवाकार्यातील २५ वर्ष सातत्य यामुळे परिचित होत्या असे गौरवोदगार यावेळी समादेशक अधिकारी विजयकुमार हंद्राळमठ यांनी व्यक्त केले. या कार्यक्रमास समादेशक अधिकारी विजयकुमार शिवय्या . हदराळमठ होमगार्ड अधिकारी स्वामी व दसाडे करपे संजय बनसोडे सवळतोट गायछोडे माडकर विलास गजदाने शहाणू कुंभार राकेश गायकवाड जावेद मुल्ला राजू पाटील श्री व सौ शेटे व महिला होमगार्ड सुज्ञानी हदराळमठ कोळी व पथकातील सर्व पुरुष व महिला उपस्थित होते.

# निमगाव येथे शनिवारी होणार वावडी व हिरकणी महोत्सव

■ **सिने अभिनेत्री हिंदवी पाटील यांची उपस्थिती**

**तभा वृतसेवा**
**पिलीव दि २८ जुलै-**

संपूर्ण महाराष्ट्रभर आकर्षण असणारा निमगाव वावडी व मुली व महिलांसाठी होणारा हिरकणी महोत्सव शनिवार दि.०२ ऑगस्ट रोजी दुपारी १२.०० वा निमगाव -पिलीव रस्ता,जिल्हा परिषद शाळा केशवनगर शेजारी आयोजित केला असून या वावडी व हिरकणी महोत्सवाच्या स्पर्धेचे बक्षीस वितरण सुप्रसिद्ध अभिनेत्री हिंदवी पाटील यांच्या हस्ते होणार असल्याची माहिती वावडी व हिरकणी महोत्सवचे आयोजक निनाद पाटील यांनी पत्रकारांशी बोलताना दिली यावेळी वावडी व हिरकणी महोत्सव संयोजन समितीचे सदस्य बाळासाहेब मगर, युवराज मगर,नंदकुमार मगर




पाटील, भारत मगर सर,जयसिंग मोरे,दत्तात्रय मगर ,विश्वनाथ मगर,उदय कदम, नितीन मगर, हनुमंत जगताप,विलास मगर,गंगाधर पवार,प्रमोद मगर ,शशांक जाधव,हर्षद मगर,सोनू पवार,सुमित ढवळे आदी मान्यवर उपस्थित होते५ फुटापासून ते ३० फुटापर्यंतच्या वावड्या तयार करणे व त्या उडविणे हा अनोखा व पारंपारिक खेळ निमगाव ता माळशिरस येथे श्रावण महिन्यात नागपंचमीनिमित्त अनेक पिढ्यांपासून खेळला जातो गत ५ वर्षापासून निमगाव वावडी महोत्सव च्या माध्यमातून या पारंपारिक कलेचे स्पर्धेच्या माध्यमातून जतन केले जात असून या माध्यमातून प्रत्येक गटा नुसार रोख रकमेची बक्षिसे दिली जातात या स्पर्धेत तरुणाईचा सहभाग मोठा असतो सन २०२५ च्या वावडी महोत्सव स्पर्धेसाठी एक फूट ते सात फूट, सात फूट ते तेरा फूट व तेरा फूट ते व त्यावरील सर्व असे तीन गट केले असून प्रत्येक गटात रोख रकमेची चार बक्षिसे व सन्मान चिन्ह सुप्रसिद्ध सिने अभिनेत्री हिंदवी पाटील यांच्या हस्ते वितरित केली जाणार आहे.

याचबरोबर मुली व महिलांसाठी हिरकणी महोत्सव आयोजित केला असून महिलांसाठी होणाऱ्या हिरकणी महोत्सवात वेगवेगळ्या स्पर्धा आयोजित केल्या असून यामध्ये पिठाची चक्की,गॅस शेगडी, पैठणी साडी,हॅड मिक्सर,टिफीन बॉक्स व महिलांसाठी गृहपयोगी वस्तू भेट देण्यात येणार आहे स्पर्धेत सहभागी होणाऱ्या प्रत्येक महिलेला आकर्षक भेटवस्तू देण्यात येणार आहे तरी या वावडी महोत्सव व हिरकणी महोत्सवात सर्वांनी सहभाग घ्यावा असे आवाहन वावडी व हिरकणी महोत्सव संयोजन समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

# शरदचंद्र राष्ट्रवादीच्या वैद्यकीय सेल पश्चिम महाराष्ट्र सरचिटणीसपदी बळीराम एडके

## सोलापूर शहराध्यक्षपदी गायकवाड तर शहर कार्याध्यक्षपदी शिवशरण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २८ जुलै-**

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या राष्ट्रीय कार्याध्यक्ष खासदार सुप्रियाताई सुळे यांच्या आदेशानुसार, वैद्यकीय सेलचे प्रांत अध्यक्ष गौतम पंडित आगा यांच्या सूचनेनुसार, सोलापूर शहराध्यक्ष सुधीर खरटमल यांच्या मान्यतेने, वैद्यकीय सेलचे राज्य प्रभारी प्रा. राहुल बोळकोटे यांच्या शिफारशीनुसार राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार वैद्यकीय सेलच्या पश्चिम महाराष्ट्र सरचिटणीस पदी बळीराम एडके, सोलापूर शहराध्यक्षपदी व्ही. डी. गायकवाड तर शहर कार्याध्यक्षपदी सूर्यकांत शिवशरण यांची निवड करण्यात आली आहे. याप्रसंगी निवडीचे पत्र शहराध्यक्ष सुधीर खरटमल यांच्या हस्ते देऊन सर्वांचा सत्कार करण्यात आला.



यावेळी बोलताना सुधीर खरटमल म्हणाले की आपल्या पक्षात अनुभवी लोकांची गरज आहे. या महागाईच्या युगात गोरगरीब नागरिकांना वैद्यकीय सेवा उपलब्ध करून देणे मोठे काम आहे. ते पुढे म्हणाले की सोलापुरात वैद्यकीय सेल चे काम योग्य पद्धतीने चालू असून नागरिकांनी अडचणीच्या काळात सोलापूर शहरातील वैद्यकीय सेलच्या पदाधिकाऱ्यांना संपर्क करावे.यावेळी बोलताना राज्य प्रभारी राहुल बोळकोटे म्हणाले की केंद्र सरकार आणि राज्य सरकारच्या वतीने विविध वैद्यकीय योजनांचा लाभ गोरगरीब जनतेपर्यंत पोहोचवण्यासाठी पक्षाचे वैद्यकीय सेलचे कार्यकर्ते, पदाधिकारी खासदार सुप्रियाताई सुळे आणि प्रदेश अध्यक्ष गौतम आगा पंडित यांच्या नेतृत्वाखाली कटिबद्ध असून त्याची सुरुवात सोलापूर शहर जिल्ह्यापासून होईल. याप्रसंगी शहर सरचिटणीस संदीप साळुंखे, मिडिया सेलचे दक्षिण कार्याध्यक्ष मल्हार शिंदे, शिवराज पडशेट्टी, वसीम खान, आदी उपस्थित होते.

## स्व. मोहम्मद रफी यांच्या स्मृतीदिनानिमित्त

# यादों की महफिल कार्यक्रम

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २८ जुलै-**

सरगम स्टुडिओ सोलापूरच्या वतीने स्व. मोहम्मद रफी यांच्या ४५ व्या पुण्यतिथीनिमित्त मंगळवार दि. ३० जुलै २०२५ रोजी सायंकाळी ६.३० वाजता हुतात्मा स्मृती मंदिर येथे यादों की महफिल या ऑर्केस्ट्राचा कार्यक्रम सादर होणार आहे, अशी माहिती संयोजक गायक आरिफ एलाल आणि मॅनेजर जावेद लुंजे यांनी पत्रकार परिषदेत दिली.

संगीतप्रेमींसाठी एक खास संगीतमय संध्या सोलापूरमध्ये आयोजित करण्यात आली आहे. या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून नेते सुधीर खरटमल, जावेद लुंजे आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत. या कार्यक्रमात स्व. मोहम्मद रफी यांनी गायलेली अजरामर गीते सादर केली जाणार आहेत. या कार्यक्रमात गायक म्हणून आरिफ एलाल, अनिल लोंढे, मुस्तकीम एलाल, एस. एस. सैफन, अल्ताफ के. के., जुबेर पटेल, बाबर आणि पार्श्वगायिका निर्मला नीली, आम्रपाली लोखंडे, चैताली क्षीरसागर, जौसेफिया मुर्शद, बाशा सगरी, अमर सोलापूर, अविनाश चिल्ला, अंजली पडसलगी, इरफान गदवाल, वर्षा घोडके आदी कलाकार सहभागी होणार आहेत. या कार्यक्रमास प्रवेश विनामूल्य आहे. सर्वांनी याचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.या पत्रकार परिषदेस एस. एस. रामशरण, अल्ताफ कुमठे, आम्रपाली लोखंडे, चैताली क्षीरसागर ,अंजली पडसलगी, मुस्तलगी मेलल आदी उपस्थित होते.



# स्पर्धेच्या युगात यश मिळवण्यासाठी विद्यार्थ्यांनी जिद्द बाळगावी : आ.शिंदे

■ **राष्ट्रीय गुरव समाज महासंघातर्फे सत्कार**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २८ जुलै-**

स्पर्धेच्या युगात यश मिळवण्यासाठी विद्यार्थ्यांनी अंगी जिद्द आणि चिकाटी बाळगली पाहिजे असे प्रतिपादन राष्ट्रीय गुरव समाज महासंघाचे राष्ट्रीय अध्यक्ष आमदार विजयराज शिंदे यांनी केले.

राष्ट्रीय गुरव समाज महासंघ शाखा सोलापूर जिल्ह्याच्यावतीने गुरव समाजातील विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केलेल्या, पदोन्नती मिळालेल्या तसेच शैक्षणिक क्षेत्रात विशेष यश संपादन केलेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभात ते बोलत होते. उपशिक्षणाधिकारी विठ्ठल ढेपे, शशिकांत जिद्दीमनी, अजय पाटील, शिवानंद फुलारी, सोनाली गुरुनाथ चिंचोले, अमृता जिद्दीमनी, यतीराज डांगे, स्मिता बिराजदार, निखिल पाटील, बलभीम बिराजदार, विजय पाटील यांच्यासह १०वी आणि १२वीत ७० टक्केपेक्षा अधिक गुण मिळवून यशस्वी झालेल्या ५५ विद्यार्थ्यांचाही सत्कार करण्यात आला. शासकीय सेवेतून निवृत्त झालेल्या गुरव समाजातील मान्यवरांचाही यावेळी सत्कार झाला. राष्ट्रीय गुरव समाज महासंघाचे कार्याध्यक्ष मल्लिकार्जुन गुरव,राष्ट्रीय उपाध्यक्ष शशिकात जिडडीमनी, उद्योजक गणपती फुलारी,प्रदेशाध्यक्ष बाळासाहेब क्षीरसागर, यशवंत ढेपे, काशिनाथ मेलगिरे, बसवराज तेलगाव,दत्तात्रय शिंदे उपस्थित होते.

प्रास्ताविक जिल्हाध्यक्ष निंगराज विंचुरे यांनी केले याप्रसंगी गणपत फुलारी, मल्लिकार्जुन गुरव, बाळासाहेब शिरसागर, शिवानंद फुलारी,प्रा. सुहास पुजारी यांचीही यावेळी भाषणे झाली. सूत्रसंचालन वैशाली मेलगिरे व सुरेश पाटील यांनी केले. आभार नंदकुमार विजापूर यांनी मानले.कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी महादेव चिंचोळे, वैशाली पाथरकर, मनोरमा जिद्दीमनी, श्रेया पाटील, सारिका पाटील, राजश्री पुजारी, मनीषा गुरव, अनिता पाटील,शिवशंकर विजापुरे, गंगाधर पुजारी, शिवानंद बिराजदार, ज्ञानेश्वर पाटील, चिन्नया स्वामी, मल्लिनाथ बनपुरे, आनंद पुजारी, राजशेखर हुगार, हणमंत गुरव, राजकुमार पुजारी, शंकर पाटील, नवनाथ गुरव,महादेव स्वामी,अनंत पुजारी,जगन्नाथ पाटील, हनुमंत पुजारी यांनी परिश्रम घेतले.

# सोलापूर शहरस्तरीय इंग्रजी वक्तृत्व स्पर्धा उत्साहात



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २८ जुलै-**

शहरस्तरीय इंग्रजी वक्तृत्व स्पर्धा यशस्वीरित्या पार पडली. ज्यामुळे विद्यार्थ्यांना त्यांची भाषिक कौशल्ये प्रदर्शित करण्यासाठी एक व्यासपीठ मिळाले.

सोलापूर जिल्हा इंग्रजी भाषा शिक्षक संघटना यांच्या वतीने आयोजित हा कार्यक्रम व्ही. एम. मेहता हायस्कूल येथील सभागृहात पार पडला. श्री संगमेश्वर महाविद्यालय, सोलापूरचे सेवानिवृत्त प्राध्यापक धनप्पा मेत्री, कबड्डी राज्य पंच सुभाष माने, महाराष्ट्र मुख्याध्यापक संघाचे अध्यक्ष तानाजी माने उपस्थित होते. अध्यक्षस्थानी एल. व्ही. एम. मेहता हायस्कूलच्या मुख्याध्यापिका श्रुती बागेवाडी या होत्या. शहरातील २५ शाळांमधून २०० हून अधिक विद्यार्थ्यांनी उत्साहाने भाग घेतला आणि त्यांची उत्कृष्ट संवाद कौशल्ये दाखवली.

मुख्य अतिथी आणि मान्यवरांच्या हस्ते विजेत्यांना बक्षिसे देऊन त्यांच्या उत्कृष्ट कामगिरीचा गौरव करण्यात आला. संपूर्ण जिल्हा इंग्रजी भाषा शिक्षक संघटनेचे अध्यक्ष डॉ. शहाजी ठोंबरे आणि त्यांची टीम, ज्यात सचिव प्रणिल माणिकशेटे, सहसचिव सचिन पवार आणि इतर समर्पित पदाधिकारी व समिती सदस्य यांचा समावेश होता. यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम पार पडला.

शीतल कोर्टीकर, श्रीमती बटगेरी, स्मिता अनिखिंडी, कल्पना यादव, सुनीशा केंगैल, अनिता नीला, ज्योती जाधव, उल्हास सोनार, पाटील सर आणि इतर सदस्यांचा समावेश असलेल्या उत्कृष्ट परीक्षक मंडळाने विद्यार्थ्यांना मौल्यवान अभिप्राय आणि प्रोत्साहन दिले.

या कार्यक्रमात जिल्हा इंग्रजी भाषा शिक्षक संघटनेचे माजी अध्यक्ष श्री. मुचंडे आणि सेवानिवृत्त इंग्रजी शिक्षक अभिनंदन विभूते यांच्या उल्लेखनीय योगदानाचाही गौरव करण्यात आला. याव्यतिरिक्त, मार्च २०२५ च्या एसएससी बोर्ड परीक्षेत इंग्रजी विषयात ९७ पेक्षा जास्त गुण मिळवलेल्या विद्यार्थ्यांना, त्यांच्या मार्गदर्शक शिक्षकांसह, स्मृतीचिन्ह आणि पुष्पगुच्छ देऊन त्यांच्या शैक्षणिक उत्कृष्टतेचा गौरव करण्यात आला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विधाते मॅडम यांनी केले. सचिन पवार यांनी आभार मानले.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## महत्वाचे...

## वडकबाळ येथे श्री शरण बसवेश्वर पुराणास प्रारंभ

**सोलापूर, दि. २८ जुलै -**



वडकबाळ येथे श्रावणमास पुराण कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहे. श्री शरण बसवेश्वर पुराण संगीतमय वातावरणामध्ये तद्देवाडीचे वेदमूर्ती महांतेश स्वामी यांच्या रसाळ वाणीने सुरू झाले . प्रथम दिवशी दासोहात योगदान देणारे कट्टेव्वा देवी गोशाळा अध्यक्ष उमा बिराजदार यांचे शाल, श्रीफळ, पुष्पहार देऊन सत्कार करण्यात आले. यावेळी श्री सिध्देश्वर कृषी उत्पन्न बाजार समितीच्या माजी सभापती इंदुमती अलगोंडा पाटील, श्री सिद्धेश्वर साखर कारखान्याचे संचालक विद्याधर मुलगे, आनंदा कोल्हे, कंदलगाव, हत्तुर, होनमुर्गी, वांगी, सोरेगाव, सोलापूर येथील सदभक्त मंडळी व श्री कट्टेव्वादेवी मंदिर समितीचे सर्व पदाधिकारी, देवीचे पुजारी विठ्ठल विंचुरे व वडकबाळचे रतिकांत पाटील, सोमू पुजारी , आस्पाक शेख, भिमराव घडेराव, चंदू नाईक , दत्ता भोई, कृष्णप्पा वाघमारे, मल्लिकार्जुन महिला भजनी मंडळ, बसय्या स्वामी, आण्णाप्पा कोळी आदी उपस्थित होते.



अध्यक्ष सतीश नोमुल | उपाध्यक्ष नागेश आळगी | सचिव सुरज बिराजदार

## हेरिटेज मणिधारी एम्पायर सांस्कृतिक मंडळ अध्यक्षपदी सतीश नोमुल

### नागेश आळगी उपाध्यक्ष, सचिव सुरज बिराजदार

**सोलापूर, दि. २८ जुलै -**

अक्कलकोट रोड स्थित हेरिटेज मणिधारी एम्पायर या संकुलातील बहुचर्चित सांस्कृतिक मंडळाच्या वर्ष २०२५-२६ करीता मावळते अध्यक्ष गजानन होनराव यांच्या अध्यक्षतेखाली बैठकीत नुतन पदाधिकारी सर्वानुमते निवडण्यात आले. **पदाधिकारी याप्रमाणे :** अध्यक्ष- सतीश नोमुल,उपाध्यक्ष- नागेश आळगी, सचिव- सुरज बिराजदार, सहसचिव- जगदीश मरबे, खजिनदार- नितीन पतंगे, सहखजिनदार- विलास नामा, सूर्यकांत गोडाळे, मिरवणूक प्रमुख- राजू चोळ्ळे, सहमिरवणूक प्रमुख गुरूशांत ढंगे, सैदू गाडी, पूजा प्रमुख- शंकर गाडी, शिवय्या मसुती, संतोष स्वामी, प्रसिद्धीप्रमुख- दशरथ वडतीले, राहुल म्हमाणे, सांस्कृतिक प्रमुख- सचिन क्षिरसागर, अंबादास खराडे, शिवय्या मसुती, जय कबाडे, रवी कोरे, पवनकुमार आमले, केदारनाथ बिराजदार, नितीन पतंगे, राहुल म्हमाणे, उमाकांत कोटे, विलास नामा, विजयकुमार गोडाळे. सल्लागार समिती - नवीन तापसे, सुरेश येळमेली, गजानन होनराव, काशिनाथ बिराजदार, अविनाश कटारे, सिध्देश्वर श्रीगादी, संजय जोगीपेठकर, शंकर गाडी, सचिन पतंगे, माळप्पा सुरवसे.



## लोकमंगल पतसंस्था बाळे शाखेतर्फे एन.के. किड्स स्कूलमध्ये वृक्षारोपण

**सोलापूर, दि. २८ जुलै-**

लोकमंगल नागरी सहकारी पतसंस्था, बाळे शाखेच्या वतीने आज एन. के. किड्स स्कूलच्या प्रांगणात वृक्षारोपण करण्यात आले. आयोजन करण्यात आले. या उपक्रमात लोकमंगल पतसंस्थेच्या विभागीय अधिकारी महबूबी शेख या प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होत्या. वृक्षारोपण कार्यक्रम शाखाधिकारी सुचिता गिरे व कर्मचारी आदित्य पांडे यांच्या पुढाकारातून पार पडला. यावेळी एन. के. किड्स स्कूलचे मार्गदर्शक राजा आलूरे, संचालक विकास कस्तुरे, मुख्याध्यापिका श्वेता कस्तुरे, हेड शिक्षिका दिपाली कुलकर्णी, अश्विनी शिंगण,पुनम कळसाईत, शितल सुतार, सेविका संगीता हेगडकर, नरेंद्र जाधव आदीसह शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते. यावेळी शाळेच्या आवारात विविध स्थानिक प्रजातींची तेलगाव, बाभुळ, बरगद, नीम आदी वृक्षांची लागवड केली. उपस्थितांनी वृक्षलागवडीचा महत्त्व व त्यातून होणाऱ्या पर्यावरणपूरक फायद्यांवर विचारविनिमय केला. याप्रसंगी 'वृक्षजीवन, मानवजीवन' हा संदेश देत पर्यावरण संवर्धनासाठी जनजागृती करण्यात आली.



## बाबूराव बोत्रे प्रतिष्ठनतर्फे शैक्षणिक साहित्याचे वाटप

**पिलीव,दि.२८ जुलै-**

बाबुराव बोत्रे पाटील ग्रामविकास प्रतिष्ठानच्यावतीने गरजु विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे व खाऊचे वाटप ऊस उत्पादक शेतकरी शांतीलाल काटकर यांच्या हस्ते करणयात आले. ओंकार परिवाराचे चेअरमन बाबुराव बोत्रे-पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी ओंकार साखर कारखान्याचे संचालक प्रशांतराव बोत्रे पाटील व ओमराजे बोत्रे-पाटील यांच्या मार्गदशनाखाली विविध सामाजिक उपक्रम राबविले जातील अशी माहीती रामभाऊ मगर यांनी दिली.




## कोकरे यांना राज्यस्तरीय समाजरत्न पुरस्कार

### शेती क्षेत्रातील योगदानाबद्दल उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते सन्मान

**तभा वृत्तसेवा,**
**करमाळा दि.२८ जुलै-**

पुणे येथे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर त्रिशताब्दी राज्यस्तरीय जयंती उत्सवानिमित्त विविध क्षेत्रात उल्लेखनीय योगदान देणाऱ्या मान्यवरांना 'समाजरत्न पुरस्कार' प्रदान करण्यात आले. यामध्ये कुगाव (ता.करमाळा) येथील प्रगतशील शेतकरी धुळाभाऊ कोकरे यांना उपमुख्यमंत्री अजितदादा पवार व क्रीडामंत्री दत्तात्रयमामा भरणे यांच्या हस्ते राज्यस्तरीय समाजरत्न पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.

श्री. कोकरे यांच्या आधुनिक शेती, तंत्रज्ञानाचा वापर, निर्यातक्षम उत्पादन, पर्यावरणपूरक शेती, आणि कृषी पर्यटनाच्या क्षेत्रातील कार्याची दखल घेत त्यांना सस्मानित करण्यात ाले. त्यांनी आपल्या शेतात 'एआय' चा शेतीत वापर करून हवामान भाकीत, पीक आरोग्य निरीक्षण, खत वापर नियोजन व कीड व्यवस्थापनाच्या निर्णय प्रक्रियेला वैज्ञानिक आधार दिला आहे. त्यांच्या शेतात संपूर्ण १०० टक्के ड्रिप सिंचन प्रणाली कार्यरत आहे. यामुळे जलसंपत्तीचा अत्यंत कार्यक्षम वापर केला जातो. शेतात बसवलेल्या सेन्सर तंत्रज्ञानाच्या सहाय्याने मातीची स्थिती, आर्द्रता, तापमान व खत गरज यावर आधारित निर्णय घेतले जातात. ही शेती आता केवळ स्थानिक गरज भागवणारी न राहता उत्पादनक्षम, निर्यातक्षम आणि शिक्षणक्षम मॉडेल शेती ठरली आहे. त्यांच्या शेतातून तयार होणारी केळी आज निर्यातक्षम दर्जाची आहे. उसाचे विक्रमी उत्पादन हे देखील त्यांच्या व्यवस्थापन कौशल्याचा नमुना आहे. शेताच्या बांधावर नारळ, आंबा, चिकू, चिंच यासारख्या बहुपीक झाडांची लागवड करून त्यांनी बायोडायव्हर्सिटी संवर्धनासोबतच आर्थिक शाश्वततेचा मार्ग शोधला आहे. धुळाभाऊ केवळ शेती करून थांबले नाही, तर त्यांनी आपल्या परिसराच्या भौगोलिक, नैसर्गिक आणि आर्थिक वैशिष्ट्यांचा अभ्यास करून एक नवे मॉडेल तयार केले कृषी पर्यटन. उजनी बॅकवॉटरचा किनारा लाभल्याने त्यांनी बोटींगची सुविधा सुरू केली. त्यांच्या शेतात शाळा, महाविद्यालये आणि कृषी विद्यार्थी शैक्षणिक सहलीसाठी येतात. पर्यटक व अभ्यासकांना शेतीत वापरले जाणारे एआय तंत्र, ड्रिप सिंचन, खत व्यवस्थापनाचे प्रात्यक्षिक प्रत्यक्ष पाहायला मिळते. या उपक्रमातून स्थानिक रोजगार, पर्यावरण संवर्धन, व शेतीविषयक जागरूकता वाढते.

## पिक विम्यातील तफावतीबाबत वाळूज परिसरात शेतकऱ्यांत रोष




### लोकप्रतिनींधीच्या दुर्लक्षाबद्दल होतेय चर्चा

**तभा वृत्तसेवा**
**वाळूज, दि. २८ जुलै -**

वाळूज (ता. मोहोळ) येथील काही पात्र शेतकऱ्यांच्या बँक खात्यावर संबंधित विमा कंपनीकडून पीक विमा अनुदान वितरित झाले आहे. शेतकऱ्यांना विमा रक्कम मंजूर झाली असली तरी त्यामध्ये तफावत आहे. त्यामुळे येथील शेतकऱ्यांतून रो, व्यक्त होत आहे.

कोणते शेतकरी पात्र व कोणते शेतकरी अपात्र हे समजून येत नाही. सामाईक क्षेत्र असणारे व ज्यांचे क्षेत्र एक हेक्टर पेक्षा जास्त आहे असे शेतकरी पीक विम्यापासून अद्यापही वंचितच आहेत. हे वंचित शेतकरी आपल्याला आपण भरलेल्या विम्यापोटी नियमानुसार योग्य नुकसान भरपाई कधी भेटेल याबाबत आशा लागली आहे. अतिवृष्टी, दुष्काळ, गारपीट, वादळ व अन्य कारणांमुळे पिकांचे नुकसान होते. अशा आपत्तीमुळे शेतकऱ्यांवर आर्थिक संकट कोसळते. पीक हातचे गेल्याने कर्ज फेडणेही कठीण होते. अनेक वेळा संपूर्ण हंगाम वाया जातो आणि त्याचा परिणाम पुढील वर्षीच्या शेतीवरही होतो. या संकटातून सावरण्यासाठी शेतकऱ्यांना सरकारी मदतीची गरज भासते. त्यावेळी पीक विम्याचा चांगलाच आधार शेतकऱ्यांना होतो. काहीअंशी तरी नुकसान भरपाई विमा कंपनीकडून मिळते मात्र विमाही उशिरा मिळतो किंवा मिळत नाही. वारंवार अशा विलंबामुळे शेतकऱ्यांचे नुकसान वाढत असल्याने विमा योजनेच्या अंमलबजावणीबाबत अधिक पारदर्शकता आणि काटेकोर नियोजनाची गरज आहे.

> पाऊस व नैसर्गिक आपत्तीमुळे खरिपासह रब्बी पिकांचे सततचे होत असलेले नुकसान पाहून शासनाने दिलेल्या निर्देशानुसार मी २०२४ साली पीक विमा काढला. पण मला अद्याप पीक विम्याचे पैसे मिळाले नाहीत. संकटात आपल्याला भरपाई मिळेल या आशेने विमा हप्ता भरला. मात्र, पावसामुळे नुकसान होऊनही विमा कंपनी भरपाई द्यायला टाळाटाळ करीत आहे. कोणत्या आधारावर क्लेम नाकारला याबाबतची माहिती समजू शकली नाही. तसेच सामाईक खाते असणारे व ज्यांचे क्षेत्र एक हेक्टर पेक्षा जास्त आहे असे शेतकरी पीक विम्यापासून अद्यापही वंचितच आहेत. शेतकऱ्यांना विम्याचा त्वरित लाभ मिळावा यासाठी आमदार, खासदार, कृषी अधिकारी यांनी अडचणी तातडीने दूर करून पीक विम्याची रक्कम मिळवून द्यावी अशी आमची मागणी आहे. ती न मिळाल्यास तीव्र आंदोलन करू.
>
> **- शरद कादे,** शेतकरी, वाळूज

## 'पत्रकार वारकरी' या मुक्त संवादातून उलगडले वारीतील कंगोरे

### विश्व संवाद केंद्रातर्फे आयोजन

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.२८ जुलै-**

वार्तांकनाबरोबरच वारी समजून घेण्यासाठी पालखी सोहळा पत्रकार संघाच्या वतीने प्रशिक्षण कार्यक्रम राबविण्यात येणार असल्याची घोषणा विश्व संवाद केंद्राच्या 'पत्रकार वारकरी' या मुक्त संवाद कार्यक्रमात करण्यात आली.

आषाढी वारीपूर्वी दोन महिने आधी हा प्रशिक्षण कार्यक्रम होईल, अशी माहिती संघाने दिली. वारीतील परंपरा, नियम, वार्तांकनाचे कंगोरे, तंत्र आणि समन्वयाचा यात अभ्यास असेल. महाराष्ट्राचे सांस्कृतिक वैभव असलेली आषाढी वारी आता झपाट्याने बदलत असली, तरी त्यातील आत्मियता आणि जिव्हाळ्याचा भाव कायम असल्याचे मत पालखी सोहळा पत्रकार संघाचे अध्यक्ष सूर्यकांत भिसे यांनी व्यक्त केले. वारीचे वार्तांकन प्रभावीपणे करण्यासाठी आणि ती अधिक चांगल्या प्रकारे समजून घेण्यासाठी प्रशिक्षणाची गरज असल्याचेही त्यांनी सांगितले. शुक्रवार



पेठेतील भारत भवन येथे झालेल्या या संवादात पालखी सोहळा पत्रकार संघाचे उपाध्यक्ष शंकर टेमघरे, सचिव ॲड. विलास काटे, सहसचिव राजेंद्रकृष्ण कापसे, सदस्य पावलस मुगुट्मल, छायाचित्रकार मनोज मांढरे, सांस्कृतिक वार्तापत्राचे संपादक मिलिंद शेट्ये आणि विश्व संवाद केंद्राचे कार्यवाह नितीन देशपांडे उपस्थित होते. पत्रकारितेचे शिक्षण घेणारे विद्यार्थी आणि माध्यम प्रतिनिधींसाठी हा संवाद आयोजित करण्यात आला होता.

पालखी सोहळा पत्रकार संघाचे उपाध्यक्ष श्री. टेमघरे यांनी 'ई-वारी'मुळे आषाढी वारी जगभरातील मराठी जनांपर्यंत पोहोचल्याचे नमूद केले. ॲड विलास काटे म्हणाले, वारी म्हणजे श्रद्धा, त्याग, समर्पण, निष्ठेची अनुभूती आहे. संतांचे चरित्र व्यापक असून त्यांच्या साहित्यात अध्यात्मासोबत विज्ञानही आहे. हीच सकारात्मकता घेऊन वारी जगभरात पोहोचायला हवी आणि जगण्याचा मार्ग दाखवणाऱ्या संतांचे चरित्र अभ्यासक्रमात असायला हवे. पावलस मुगुट्मल यांनी वारकऱ्यांचे व्यवस्थापन अलौकिक असल्याचे सांगितले. यावेळी सांस्कृतिक वार्तापत्राचे संपादक मिलिंद शेटे यांनी वारीची माहिती दिली. विश्व संवाद केंद्राच्या संपादक अंजली तागडे यांनी प्रास्ताविक केले. नितीन देशपांडे यांनी वारकरी पत्रकारांचा सत्कार केला. सम्राट कदम यांनी आभार मानले.



## श्री मल्लिकार्जुन हायस्कूलमध्ये सक्षम तू अभियान कार्यक्रम साजरा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २८ जुलै-**

श्री मल्लिकार्जुन हायस्कूल हत्तुरे नगर येथे सक्षम तू अभियान हा कार्यक्रम घेण्यात आला. अध्यक्षस्थानी धरेप्पा हत्तुरे उपस्थित होते. विजापूर नाका पोलीस स्टेशनचे पोलीस नाईक उदयसिंह साळुंखे, सामाजिक कार्यकर्त्या सायरा शेख यांच्या हस्ते सरस्वती मातेच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यावेळी प्रमुख अतिथींचा शाल व बुके देऊन सत्कार करण्यात आला.

याप्रसंगी पोलीस नाईक उदयसिंह साळुंखे यांनी मोबाईलचा चुकीच्या पद्धतीने वापर करू नये व सायबर गुन्ह्याविषयी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

पोलीस कॉन्स्टेबल सौ. कोळी यांनी मुलींनी आपल्या मोबाईलवर आपले फोटो सेंड करू नये, तसेच समाजात कोणी चुकीचे वागत असेल तर पोलीस हेल्पलाइनला संपर्क करण्याचे आवाहन केले आणि विविध विषयावर मार्गदर्शन केले.

यावेळी बसवराज कोरे, अण्णाराया तुप्पद, गंगाराम घोडके, गुरुसिद्धप्पा पाटील, अनिता हौदे, सुकेशनी गंगोडा आदी उपस्थित होते. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक सायरा शेख यांनी केले. सूत्रसंचालन मारुती माने यांनी केले. प्रतीक्षा बिडवे यांनी आभार मानले.

## तांदुळवाडी येथे 'एक पेड मां के नाम' उपक्रमांतर्गत वृक्षारोपण

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि.२८ जुलै-**

तांदुळवाडी ता. बार्शी ये़थील सुयश विद्यालयात 'एक पेड मां के नाम' या आगळ्या-वेगळ्या उपक्रमाअंतर्गत वृक्षारोपण करण्यात आले. प्रमुख पाहुणे संस्थापक शिवदास नलावडे होते तर अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक प्रदीप शिर्के होते.

कार्यक्रमात विद्यार्थी, शिक्षक आणि शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी सक्रिय सहभाग घेतला. प्रत्येकाने आपल्या आईच्या सन्मानार्थ एक रोप लावले आणि त्याचे संगोपन करण्याचा संकल्प केला. या उपक्रमामुळे आईप्रती कृतज्ञता व्यक्त करतानाच पर्यावरण संरक्षणाचे महत्वही अधोरेखित झाले. मुख्याध्यापकांनी आपल्या भाषणात आईचे स्थान आणि वृक्षांचे जीवनातील महत्त्व पटवून दिले. संस्थापक शिवदास नलावडे यांनीही विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरणाविषयीची जागरूकता वाढवण्याच्या उपक्रमाचे कौतुक केले. हा उपक्रम संवेदनशीलता, कृतज्ञता आणि पर्यावरणप्रेम वाढवणारा ठरला.

## पिलीव येथे आरिफखान पठाण यांचा नागरी सत्कार

**तभा वृतसेवा,**
**पिलीव, दि. २८ जुलै-**

पिलीव (ता.माळशिरस) येथील नागरी आघाडीचे अध्यक्ष आरिफखान पठाण यांचा नागरी सत्कार पतसंस्थेचे चेअरमन भजनदास चोरमले यांच्या हस्ते करण्यात आला.

यावेळी डॉ. मिलींद, ॲड. अजय घाटे, जीवन जानकर, माजी उपसरपंच नानासाहेब देशमुख, दत्तात्रय भैस, उमेशभाऊ घोंगडे, संतोष रजपुत, राष्ट्रवादी कॉंग्रेसचे शहराध्यक्ष कुमार



भैस, उद्योजक संतोष पडळकर, कल्याण जावळे, जीवन गुरव, राजाभाऊ जामदार, अमोल मदने, संग्राम पाटील, दादासो वगरे, वैभव वगरे, भगवान सुळ, जितेंद्र पाटील, विजय पिसे, केशव वाघमारे, दामोदर लोखंडे, संजय रोकडे, शिवराज पुकळे, सचिन भैस, अमिर पठाण,संतोष देशमुख, आबा सातपुते, शुभजित नष्टे, राहुल खलीपे, दत्तुसिंग भैस, प्रा संतोष शेंडगे, कुमार लोखंडे, उपस्थित होते.

## तब्बल साडेपाच हजार घरांत पोहोचविले नागपंचमीचे वाण

- मेहंदीचा कोन आणि नैवेद्यासाठी लाह्या
- मार्डीच्या सामाजिक कार्यकर्त्या सुवर्णा झाडे यांचा उपक्रम

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २८ जुलै-**

ज्यांची बाग फुलून आली त्यांनी दोन फुले द्यावीत, या कवि दत्ता हलसगीकर यांच्या कवितेच्या ओळीला साजेसे काम गेली चार वर्षांपासून मार्डी येथील सुवर्णा झाडे या करीत असून दिवाळी असो वा नागपंचमी या दोन्ही सणाचा कष्टकरी, शेतकरी, अंगणवाडी सेविका, आशा वर्कर यांचा आनंद व्दिगुणीत करण्याचे काम त्या स्वखर्चाने करतात. यंदा नागपंचमीच्या सणानिमित्त त्यांनी मार्डीसह परिसरातील दहा गावांमध्ये तब्बल साडेपाच हजार मेहंदीचे कोन, तितक्याच राख्या आणि तितकीच लाह्याची पाकीटे करुन साडेपाच



हजार माता-भगिनींपर्यंत नागपंचमीचे वाण पोहोचविले आहे.

तीस वर्षांपूर्वी स्वतःच्या जीवनात आलेला दुःखाचा डोंगर आणि बिकट परिस्थितीवर स्वाभिमानाने आणि जिद्दीने मात करुन पुन्हा स्वाभिमानाने उभा राहिलेल्या सुवर्णा झाडे यांनी गेली चार वर्षांपासून समाजसेवेच्या माध्यमातून माणसं जोडण्याचे काम हाती घेतले आहे. जर डोळे पुसणार असतील कोणी तर रडण्याला अर्थ आहे नाही तर तिथे मरणंही व्यर्थ आहे, या कवितेप्रमाणे स्वतःच्या वाट्याला आलेल्या दुःखातून सावरल्यानंतर सुवर्णा झाडे यांनी जन्मभूमीत (मार्डी) येऊन सामाजिक कार्य करायला सुरुवात केली. राजकीय प्लॅटफॉर्म असावा म्हणून उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या राष्ट्रवादी महिला कॉंग्रेसच्या प्रदेश सरचिटणीस म्हणून रुपालीताई चाकणकर यांच्या नेतृत्वाखाली कार्यरत आहेत. मकरसंक्रांतीचे हळदीकुंकू असो वा नागपंचमीचा सण असो किंवा दिवाळी असो. किंवा एखाद्या सामान्य कार्यकर्त्याचा किंवा कष्टकरी महिलेचा वाढदिवस असो तिथे सुवर्णा झाडे स्वागतासाठी जातात. जिथे कमी तिथे आम्ही या न्यायाने सुवर्णा झाडे कार्यरत आहेत.

नागपंचमीचा सण म्हटले की, मेहंदीचे आकर्षण असते. आणि नागोबाला नैवेद्यासाठी लाह्या असतात. वातावरण पाहता आरोग्याच्या दृष्टीने लाह्याला महत्व आहे. मात्र, हल्ली लाह्या ऐवजी चुरमु-याचा नेवैद्य दाखविला जातो. मात्र, आपली भारतीय परंपरा जपण्यासाठी सुवर्णा झाडे यांनी मार्डीसह बाणेगाव, भोगाव, गुळवंची, कारंबा, अकोलेकाटी, बिबीदारफळ, सावंतवाडी, खेड आदी गावांमध्ये तब्बल साडेपाच हजार मेहंदीचे कोन आणि तितकीच लाह्याची पाकीटे आणि पुढील आठवड्यात असलेल्या रक्षाबंधन सणाच्या पार्श्वभूमीवर तेवढ्याच राख्या पोहोच करण्याचे काम सुरु केले आहे.

> **यातून मनाला आनंद मिळतो**
>
> सध्या भारतीय सण,समारंभाची संस्कृती लोप पावत आहे. ती टिकली पाहिजे. माणसांतील माणुसकीचे नाते अभंग राहिले पाहिजे, याभूमिकेतून प्रत्येकाच्या सुख-दुःखात सहभागी झाले पाहिजे, हा दृष्टीकोन ठेवून मी स्वखर्चाने कोणतीही अपेक्षा न ठेवता मी हे उपक्रम राबवित आहे. उपमुख्यमंत्री अजितदादा पवार, राष्ट्रवादी महिला कॉंग्रेसच्या अध्यक्षा रुपालीताई चाकणकर यांच्या नेतृत्वाखाली व मार्गदर्शनाखाली काम करीत असताना सामाजिक उपक्रमाचा भाग म्हणून मी याकडे पाहते.
>
> **- सुवर्णा झाडे.**

CMYK

# आपला जिल्हा

**सोलापूर तरुण भारत,** सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## नागपंचमीनिमित्त सजल्या सुवासिनी

सोलापूर : नागपंचमी व मंगळागौरीनिमित्त नवी पेठ परिसरात सोमवारी सायंकाळी हातावर मेहंदी काढण्यात सुवासिनी दंग झाल्या होत्या.



## महत्त्वाचे

### प्रा.डॉ. प्रकाश बनसोडेंच्या प्रोजेक्टला रिसर्च इनोवेशन अवॉर्ड

**सांगोला,दि.२८ जुलै-**

वेल्लोर इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी आंध्रप्रदेश युनिव्हर्सिटी व अमेरिकन केमिकल सोसायटी यांच्या संयुक्त विद्यमाने केमिस्ट्री इनोवेशन चॅलेंज केम स्पार्क २०२५ ही संशोधन प्रकल्प स्पर्धा दि.१८ जुलै रोजी आयोजित करण्यात आली होती. सदर स्पर्धेचा निकाल नुकताच जाहीर झाला असून या स्पर्धेमध्ये सांगोला महाविद्यालयाच्या रसायनशास्त्र विभागातील प्राध्यापक व कॅन्सर संशोधक डॉ.प्रकाश अरुण बनसोडे यांच्या फेरोसिन लेबल्ड मॉलिक्युल्स अँड देअर अँटी कॅन्सर इव्हॅल्युएशन या संशोधन प्रकल्पास द्वितीय क्रमांकाचे पारितोषिक, रोख रक्कम व प्रशस्तीपत्रक देऊन गौरविण्यात आले.



सदर संशोधन प्रकल्पामध्ये डॉ.बनसोडे यांनी रसायनशास्त्र प्रयोगशाळेत निर्मिती केलेल्या फेरोसिन संयुगांची कॅन्सर वरील औषधे बनविण्यासाठीची उपयुक्तता, जागतिक बाजारपेठेतील मागणी व व्यापारीकरण आराखडा याबाबतची अभ्यासपूर्ण मांडणी केली. प्रा.डॉ.प्रकाश बनसोडे हे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाची रसायनशास्त्र विषयातील पीएच.डी. मार्गदर्शक मान्यता प्राप्त आहे. त्यांच्या मार्गदर्शनाखाली आठ विद्यार्थी पीएच.डी.चे संशोधन पूर्ण करीत आहेत. तसेच ते सांगोला महाविद्यालयाच्या संशोधन व विकास विभागाचे संचालक म्हणून कार्यरत आहेत. त्यांनी बौद्धिक संपदा कायदा, पेटंट्स व कॅन्सर जागरूकता याविषयी महाराष्ट्रातील विविध विद्यापीठे व महाविद्यालयांमध्ये पार पडलेल्या संशोधन परिषदा व कार्यशाळा मधून मार्गदर्शनपर व्याख्याने दिली आहेत. त्यांच्या यशाबद्दल त्यांचे सर्वस्तरातून अभिनंदन होत आहे.



### दत्तात्रेय घंटे यांची उपनिरिक्षकपदी पदोन्नती

**अक्कलकोट, दि .२८ जुलै-**

दत्तात्रेय घंटे यांचे पोलीस उपनिरीक्षकपदी पदोन्नती झाल्याबद्दल श्री वटवृक्ष स्वामी समर्थ देवस्थान चेअरमन महेश इंगळे यांच्या हस्ते स्वामींचे कृपावस्त्र देऊन सत्कार करण्यात आला. सुनिल कटारे मित्र परिवार अक्कलकोट महाविद्यालय चे प्राचार्य गुरुलिंग धबाले यांच्यावतीने पदोन्नतीबद्दल सत्कार करण्यात आला. याप्रसंगी सुनील कटारे बंडोबा घाडगे आत्माराम घाडगे पिंटू पवार आत्माराम घाडगे प्रवीण सूर्यवंशी उद्धव जाधव श्रीशैल गवंडी अक्कलकोट महाविद्यालयात डॉ. प्राचार्य गुरुलिंग धबाले, विरूपाक्ष कुंभार, दिनेश धाराशिवकर, प्रकाश सुरवसे, सेवानिवृत्त पोलीस उपनिरीक्षक सलीम जमादार, माजी सरपंच बसवराज नागणसूरे, महाविद्यालयातील शिक्षक व कर्मचारी स्टाफ उपस्थित होते. सत्कारमूर्ती दत्तात्रेय घंटे यांनी मनोगत व्यक्त केले. सुनील कटारे मित्र परिवाराकडून दत्तात्रय घंटे यांचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी काशिनाथ धनशेट्टी, शिवानंद बिराजदार, रामभाऊ खवळे व व्यापारी उपस्थित होते.



### श्री दिगंबर जैन गुरुकुल शाळेत नागपंचमी उत्सव उत्साहात साजरा

**सोलापूर, दि.२८ जुलै-**

श्री दिगंबर जैन गुरुकुल बालक मंदिर व प्राथमिक शाळेमध्ये नागपंचमीच्या निमित्ताने विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमात सर्पमित्र संजय भस्मे यांनी विद्यार्थ्यांना व शिक्षकांना सर्पांविषयी माहितीपूर्ण मार्गदर्शन केले. त्यांनी सर्पांचे पर्यावरणातील महत्त्व त्यांच्याविषयी असलेल्या गैरसमजुती आणि सर्पदंश टाळण्यासाठी आवश्यक खबरदारी याविषयी माहिती दिली. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान शैलेश पांगळ यांनी भूषवले, तर प्रमुख पाहुण्या म्हणून पुष्पा झुंजुडें उपस्थित होत्या. सुत्रसंचालन वाले यांनी केले. यावेळी सपना दुधनी कर यांनी विद्यार्थ्यांना नागपंचमी संदर्भातील गोष्टी सांगून भारतीय संस्कृतीतील सर्प पूजनाची परंपरा समजावून सांगितली. सर्व शिक्षिका यांनी एकत्र येऊन आरती केली. राणी तोडकरी यांनी आभार मानले.

### पिलीवच्या चैतन्यकुमार देवकर याचे नेट परीक्षेत यश

**पिलीव, दि. २८ जुलै-**

पिलीव येथील चैतन्यकुमार रघुनाथ देवकर याने नुकत्याच झालेल्या प्राध्यापक पात्रता परीक्षेत (नेट) परीक्षेत अर्थशास्त्र या विषयातुन यश संपादन केले. चैतन्यकुमार याचे प्राथमिक शिक्षण पिलीव येथील केंद्र शाळेतुन, माध्यमिक शिक्षण कर्मवीर भाऊराव पाटील विदयालयातुन, कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षण जवाहर नवोदय विद्यालय पोखरापुर येथुन, पदवीचे शिक्षण फर्ग्युसन कॉलेज पुणे येथुन पुर्ण केले. त्याचे श्रीराम गणेश मित्रमंडळ पिलीव,



श्रीराम दुर्गा माता मित्र मंडळ पिलीव, सर्व गणेशोत्सव व नवरात्र मित्र मंडळे, विविध संस्था, पिलीव पत्रकार संघ, सदगुरु श्री श्री साखर कारखाना, रामायण समीती, गुरू भक्ती भुषण हभप हरिहर नंदन महाराज, हभप मच्छीद्र कावडे महाराज आदींनी अभिनंदन केले.

---

**पहिल्या श्रावण सोमवारी**

# सिध्देश्वर मंदिरात भाविकांची गर्दी







### तीनशे किलो फुलांनी सजली मेघडंबरी

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २८ जुलै-**

श्रावण महिन्यातील पहिल्या सोमवारी सोलापूरचे ग्रामदैवत सिद्धेश्वर मंदिरातील मेघडंबरीस ३०० किलो फुलांची आकर्षक सजावट करण्यात आली. पहिल्या सोमवारनिमित्त मंदिरात पहाटेपासून भाविकांनी दर्शनासाठी मोठी गर्दी केली होती. यावेळी ओम नमः शिवायच्या गजराने मंदिर परिसर दुमदुमून गेला.

सिध्देश्वर मंदिरातील योग सम ाधीच्या मेघडंबरीस दर सोमवारी आकर्षक फुलांची सजावट करण्यात येते. यंदाच्या पहिल्या सोमवारीह यानिमित्ताने मेघडंबरीस आकर्षक सजावट करण्यात आली होती.म ेघडंबरीच्या सजावटीसाठी झेंडू, शेवंती, चिनी गुलाब, सुपारी फुल, गुलाब अशी विविध फुले वापरण्यात आली. मेघडंबरीच्या कळसाला साकारण्यात आलेली महादेवाच्या पिंडीची व शेषनाग फणीची प्रतिकृती आकर्षक दिसत होती. सोमवारी पहाटेपासूनच भाविकांनी मंदिर व समाधी स्थळ गजबजले होते. दर्शनासाठी भाविकांची मोठी रांग मंदिरात लागली होती. सकाळी ८:३० ते ९ च्या दरम्यान योग समाधीची विधीवत पूजा अर्चना करण्यात आली. मंदिरात पहाटे चार वाजल्यापासून भाविकांची दर्शनासाठी गर्दी होती. यावेळी मंदिरात सिध्देवर महाराज यांची हुबेहुब छबी दिसणारी आकर्षक रांगोळीही काढण्यात आली होती. भाविक यावेळी मंदिरात सेल्फी घेत धार्मिक उत्सावात सहभागी होत मनोभावे भक्तीत तल्लीन होताना दिसून आले.

---

## सांगोला वनपरिक्षेत्र अधिकारी यांची मालकी क्षेत्रात मोठी कारवाई

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला,दि.२८ जुलै-**

वनपरिक्षेत्र अधिकारी सांगोला, वनपाल जुनोनी व वनरक्षक ह.मंगेवाडी हे ह.मंगेवाडी नियत क्षेत्रात जवळा ते हातीद रस्ता येथे फिरती करत असताना विनापरवाना वृक्षतोड व वाहतूक करताना ट्रक क्र. एम.एच.१० ए डब्ल्यू ८६२२ हा लाकुड मालासह जप्त केला. त्यामध्ये कडूलिंब जळावू लाकुड व चिंच जळावू लाकुड २६.२० घ.मी अंदाजे ४० हजार किमतीचे १३ टन लाकूड आहे. याबाबत वनरक्षक ह.मंगेवाडी यांनी चंद्रकांत भाऊ अलदर रा.घेरडी, नारायण ज्ञानोबा काशिद रा.कडलास यांच्याविरुद्ध वन गुन्हा नोंद केला आहे. पुढील तपास चालु आहे. सदरची कारवाई पुण्याचे मुख्य वनसंरक्षक आशिष ठाकरे, सोलापूरचे उपवनसंरक्षक कुलराज



सिंह, सहा.वनसंरक्षक ए.बी.शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली सांगोला वनपरिक्षेत्र अधिकारी तुकाराम जाधवर, जुनोनी वनपाल एस.एल. वाघमोडे, ह.मंगेवाडी वनरक्षक एस.व्ही.नराळे यांनी केली.

---

## कौटुंबिक तक्रार निवारणा दरम्यान चाकुने हल्ला

### तिघांविरूध्द गुन्हा

**तभा वृत्तसेवा**
**बार्शी, दि.२८ जुलै-**

तालुक्यातील भोईजे गावातील ग्रामपंचायत कार्यालयात तक्रार मिटविण्याच्या बैठकीदरम्यान एका कुटुंबातील वाद विकोपाला जाऊन एकावर धारदार शस्त्राने पोटात खुपसून प्राणघातक हल्ला केल्याची धक्कादायक घटना रविवारी घडली. याबाबत पमाबाई सुभान्या भोसले (वय-६०) यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार तिघांविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. या घटनेत फिर्यादीचा पती सुभान्या भोसले हा गंभीर जखमी झाला आहे.

फिर्यादी या त्यांच्या पतीसह भोईजे येथे वास्तव्यास असून शेतमजुरी करुन उपजीविका करतात. काही दिवसांपूर्वी त्यांच्या पती सुभान्या भोसले यांनी नात असलेल्या अस्मिता या अल्पवयीन मुलीशी चेष्टेत काही बोलणे केले होते. त्यावरुन संबंधित मुलीचा वडील रविंद्र पवार याने पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली होती. त्या तक्रारीचे समाधान करण्याकरिता दोन्ही कुटुंबे काल रविवारी सकाळी ग्रामपंचायत कार्यालयात उपस्थितीत जमली होती. गावातील पदाधिकारी व गावकरी समवेत बैठकी दरम्यान सुभान्या भोसले यांनी त्यांचे म्हणणे मांडत असताना अचानकपणे रविंद्र पवार व त्याची पत्नी अंजली यांनी सुभान्यांवर शिवीगाळ व हाताने मारहाण सुरु केली. त्याचवेळी रविंद्रचा वडील बाबुशा इंग्लिशा पवार याने रागाच्या भरात तु माझ्या नातीला का अडवून बोललास असे म्हणत जवळ असलेल्या चाकूसारख्या धारदार शस्त्राने सुभान्या भोसले यांचे पोटात गंभीर वार केला. या हल्ल्यामुळे सुभान्या यांच्यापासून रक्तस्त्राव सुरु झाला. त्यांना तातडीने मुलगा श्रीकांत व पत्नी पमाबाई यांनी गावातील नागरिकांच्या मदतीने बार्शी येथील जगदाळे मामा हॉस्पिटलमध्ये उपचारासाठी दाखल केले. सध्या त्यांच्यावर उपचार सुरु असून त्यांची प्रकृती चिंताजनक आहे. सुभान्या यांना जाणीवपूर्वक ठार मारण्याचा प्रयत्न झाल्याचा आरोप त्यांच्या पत्नीने केला आहे.

---

## विवाहितेचा छळ; पतीसह पाचजणांवर गुन्हा दाखल

**सोलापूर, दि.२८ जुलै-**

विवाहितेचा छळ करणाऱ्या पतीसह पाचजणांविरुध्द विजापूर नाका पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत प्रमिला रणजित सावंत (वय ३८, रा. ओम निवास, वैष्णवी नगर, विजापूर रोड, सोलापूर) या विवाहितेच्या फिर्यादीवरुन पती रणजित, सासू सुलोचना, सासरे सुरेश, दीर अजय (सर्व रा. सोलापूर), नणंद सविता साळुंखे (रा. पुणे) यांच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. २३ जानेवारी २००७ पासून प्रमिला या पती रणजित सोबत सासरी नांदण्यास होत्या. त्यावेळी पती रणजित व त्याच्या घरातील लोकांनी प्रमिला यांना तुझ्या आई वडीलांनी आमचा मानपान केला नाही, आम्हांला प्रत्येक कार्यक्रम ात १ तोळ्याची सोन्याची अंगठी घेऊन येत जा असे म्हणून शारीरीक व मानसिक छळ करून जाचहाट केला. म्हणून विजापूर नाका पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हवालदार गायकवाड तपास करीत आहेत.

---

## ‘ओम नमः शिवाय’ च्या गजरात श्री शिव-पार्वती विवाह सोहळा संपन्न

### पहिल्या श्रावण सोमवारनिमित्त आयोजन

### उत्तमजी महाराजांनी संगीतमय शिवपुराण महाकथेत केले मार्गदर्शन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २८ जुलै-**

ओम नमः शिवायचा अखंड गजर, भारतीय वाद्यांचे वादन, पारंपरिक वेशभूषा केलेले, फेटे परिधान केलेले शेकडो भाविक तसेच लाल रंगाची साडी परिधान केलेल्या शेकडो महिला भाविकांच्या उपस्थितीत भक्तिमय वातावरणात सोमवारी श्री शिव पार्वती विवाह सोहळा संपन्न झाला.

मारवाडी युवा मंच मिडटाउन महिला शाखा आणि राजश्री लड्डा परिवारातर्फे श्रावण मासानिमित्त तुळजापूर वेस येथील माहेश्वरी सांस्कृतिक भवनात आयोजित संगीतमय भव्य महाशिवपुराण कथेमध्ये सोमवारी उत्तमजी महाराज यांनी श्री शिव पार्वती विवाह या विषयावर मार्गदर्शन केले. यावेळी कथेम ध्ये भाविकांसमोर शिव पार्वती विवाहाचा देखावा सादर करण्यात आला. याप्रसंगी भगवान श्री शंकरांची भूमिका लक्ष्मीकांत लड्डा यांनी तर माता पार्वतीची भूमिका मयुरी लड्डा यांनी केली.

उत्तमजी महाराज म्हणाले, भगवान शंकर हे भक्तांची सर्व दु:खे दूर करणारे ईश्वर आहेत. हिमालय पर्वताची कन्या असलेल्या माता पार्वतीनेही भगवान



शंकरांची आराधना करून प्रसन्न करून घेतले. आपल्या मातापित्यामध्येच प्रत्यक्ष भगवंताचा अंश आहे. आई वडिल हयात असेपर्यंत त्यांची सेवा करा. नंतर पाश्चाप करून उपयोग नाही. त्यांच्या ऋणातून आपण उतराई होऊ शकत नाही. गेल्या काही वर्षांपासून आपल्या खाण्यापिण्याच्या पद्धतीत अत्यंत चुकीचा बदल होत आहे. पिझ्झा, बर्गर अशा शिळ्या घटकांपासून बनविलेल्या पदार्थांमुळे हृदयविकार, पोटाचे विकार वाढत आहेत. त्यामुळे असे पदार्थ टाळणे आवश्यक आहे.

याप्रसंगी अध्यक्षा राणी होलाणी, कार्यक्रम प्रमुख ज्योती चंडक, सुनिता बजाज, नंदा लाहोटी, शोभा मालू, विजया भैय्या, राजश्री लड्डा, रामेश्वर करवा, गोविंद लाहोटी, गोविंद चंडक, श्रीकांत बजाज, विलास बजाज, श्रीकांत लड्डा, लक्ष्मीकांत लड्डा, मयुरी लड्डा आदी उपस्थित होते.

---

# कॉरिडॉरच्या बैठकीला आधिकाऱ्यांची दांडी; संभाव्य बाधित वैतागले

### पालकमंत्री गोरे यांचे कॉरिडॉर लादला जाणार नसल्याचे वक्तव्य

**तभा वृत्तसेवा । महेश भंडारकवठेकर**
**पंढरपूर, दि.२८ जुलै -**

कॉरिडॉर बाधितांना बोलावून सोमवारी (ता.२८) ठराविक दिलेल्या वेळेला चर्चेसाठी नेमणूक केलेले संबंधित आधिकारीच उपस्थित नसल्यामुळे कॉरिडॉर बाधित नागरिकांतून प्रशासनातील आधिकाऱ्यांच्या वागण्या बद्दल रोष व्यक्त केला जातो आहे. आधिकाऱ्यांच्या अशा वागण्याबद्दल प्रशासनाचा धिक्कार करीत अनेक बाधित नागरिकांनी नियोजित बैठकीत सहभागी न होताच परत घरी जाणे पसंत केले.

देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा ड्रीमप्रोजक्ट म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पंढरपूर कॉरिडॉर प्रकल्पाची गेल्या दोन,तीन वर्षापासून नुसतीच चर्चा होत असल्याची टिका होत होती. मात्र मुख्यमंत्र्यांनी सर्वांना विश्वासात घेऊन, सर्वोच्च मोबदला देवून तसेच सर्वांचे सम ाधान करुन लवकरच हा प्रकल्प सुरु होईल असे आश्वासन देवून जिल्हा प्रशासनाला तयारीला लागण्याच्या सुचना केलेल्या होत्या. त्या प्रमाणे जिल्हा प्रशासनाने मागील काही दिवसापूर्वी नुकतीच मुख्यमंत्र्यांशी मुंबई येथील त्यांच्या वर्षा या निवासस्थानी या प्रकल्पा विषयी चर्चा



केली. या प्रकल्पाचा तयार करण्यात आलेला अंतिम आराखडा मुख्यमंत्र्यांना दाखवून तो लवकरच कार्यान्वीत करण्यासाठी उपाययोजना सुरु केल्या. त्यानंतर जिल्हाधिकारी कुमार आर्शीर्वाद यांनी या आराखड्या विषयी संभाव्य बाधितांशी चर्चा करण्यासाठी खास तीन उपजिल्हाधिकारी दर्जाच्या आधिकाऱ्यांची येथे खास नेमणूक करुन २५ जुलै पासून ते ५ ऑगस्ट २०२५ या कालावधीत २५ च्या एका गटा प्रमाणे सर्व साडेसहाशे ते सातशे संभाव्य सवीबाधित नागरिकांशी चर्चा करुन त्यांच्या बद्दलची सर्व माहिती, बाधितांच्या अपेक्षा, त्यांच्या शंका या बद्दलची माहिती संकलीत केली जाईल. त्या प्रमाणे वरिष्ठ पातळीवर या माहितीचे सादरीकरण करुन सर्वोच्च मोबदला कसा दिला जाईल यासाठी प्रयत्न करण्याचे सांगण्यात आलेले होते. त्या प्रमाणे २५ जुलै पासून संभाव्य बाधित नागरिकांच्या बैठकांचे सत्र सुरु झाले होते. दरम्यान सोम वारी येथील भक्तीमार्गावरील योगधाम मध्ये दुपारी दीडच्या सुमारास संभाव्य बाधित २५ ते ३० नागरिकांच्या गटाला नोटीसा देवून बैठकीसाठी आमंत्रित करण्यात आलेले होते. त्या नोटीसां प्रमाणे नागरिक योगधाम येथे बैठकीसाठी नियोजित वेळे पेक्षा अगोदर काही वेळ जमा झाले. त्यावेळी पंढरपूरात पालकमंत्र्यांचा दौरा होता. त्यामुळे पालकमंत्र्यांकडे मिटींगसाठी जात असल्याचे सांगत आधिकारी या मंडळींशी चर्चा न करताच योगधाम येथून बाहेर पडले. दरम्यान चर्चेसाठी आलेले संभाव्य बाधित नागरिकांचा गट आत्ता आधिकारी येतील, थोड्या वेळाने येतील असे म्हणत त्यांची वाट पहात सुमारे अर्धा ते एक तास ताटकळत त्या ठिकाणीच त्यांची वाट पहात बसुन राहिले. अखेर आधिकाऱ्यांची वाट पहात असताना त्यातील काही नागरिकांचा पारा चढला. त्यामुळे प्रशासनातील आधिकाऱ्यांनी आजच आमची ही अवस्था केलेली आहे. त्यामुळे उद्या आमची घरे,दारे गेल्यावर ही आधिकारी मंडळी आम्हाला कशी वागणूक देतील असे म्हणत उपस्थित नसलेल्या आधिकाऱ्यांवर चांगलेच वैतागले. लगेचच या मधील काहीं नागरिकांनी आधिकाऱ्यांच्या विरोधात घोषणाबाजी सुरु केली. वेळ न पाळणाऱ्या आधिकाऱ्यांचा धिक्कार असो, एकच जिद्द कॉरिडॉर रद्द अशा घोषणा देत बैठकीला न थांबताच आधिकाऱ्यांची वाट पाहून कंटाळलेले नागरिकांनी अखेर आपल्या घराचा रस्ता धरणे पसंद केले.

> नागरिकांच्या समस्या जाणण्यासाठी सोमवारी दुपारी बैठक बोलाविण्यात आलेली होती. आम्ही बरोबर दीडच्या दरम्यान येथे बैठकीसाठी आलेलो होतो. पहिली मिटींग संपल्यानंतर आधिकारी थांबले पण आम्हाला दुसरे काम आहे आम्ही अर्ध्या तासात येतो असे सांगून आधिकारी निघून गेले.त्यामुळे तीन वाजून गेले आहेत तरी कोणताही आधिकारी येथे आलेले नाही. आम्ही काही भिकारी नाही आहोत की आम्हाला खायला मिळत नाही म्हणून आम्ही त्यांची वाट बघायची.त्यामुळे आम्ही मंडळी त्यांचा निषेध करुन निघुन जात आहोत.
>
> **- आनंद उत्पात (संभाव्य बाधित नागरिक )**

### सगळ्यांना समाधानी करुनच विठुरायाच्या नगरीचा विकास होईल : पालकमंत्री

दरम्यान सोमवारी पालकमंत्री पंढरपूरच्या दौऱ्यावर आलेले होते. नियोजित कार्यक्रमानंतर माध्यमांच्या प्रतिनिधींशी पालकमंत्र्यांनी संवाद साधला. कॉरिडॉरविषयी बोलताना पालकमंत्री म्हणाले, प्रकल्प उभा रहात असताना त्या प्रकल्पामुळे बाधित होत असलेल्या तेथील लोकांचा सुरुवातीला त्याला विरोध हा असतोच. समृध्दी महामार्ग जेव्हा उभा राहिला तेव्हा अनेक लोकांनी त्याला विरोध केलेला होता. तिच लोकं पुन्हा समृध्दी महामार्ग तयार झाल्यावर त्या मध्ये सहभागी झाले आणि सर्वोत्तम मार्ग झाल्याचे आज सांगत आहेत. अनेक विमानतळाला विरोध झालेला आहे. मात्र जेव्हा त्या ठिकाणी विमानतळ झाले तेव्हा हे विरोध करणारे लोकच हे खूप चांगले झाले असते सांगतात. अनेक ठिकाणी एमआयडीसी उभा रहात असताना विरोध झाल्याचे आपण पाहिलेले आहे. मात्र एमआयडीसी झाल्यावर झालेली प्रगती तेच लोक भरभरुन सांगतात. त्यामुळे कोणत्याही व्यवस्था उभ्या करीत असताना काही लोकांना वाटते की माझी स्वत:ची हक्काची जागा जाते आहे की काय, माझ्या व्यवसायाचे काय होईल ? त्यांच्या अशा भावना असतात. मात्र त्यांच्या अशा भावना या बिलकुल चुकीच्या नाहीत. त्यामुळे या सगळ्यांचा विचार हा सरकार करेल आणि सगळ्यांना समाधानी करुनच विठुरायाच्या नगरीचा विकास होईल, कॉरिडॉर होईल यात आपणाला शंका नाही. त्याबाबत सर्वजण निश्चिंत रहावा. कुठल्याही परिस्थिती मध्ये हा कॉरिडॉर कुणावरही लादला जाणार नाही असेही पालकमंत्री गोरे यांनी सांगितले.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.
सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

# नांदणीच्या चिल्ड्रन पार्कला दीड वर्षात लागले कुलुप

## टोल नाका ठरतोय पर्यटकांसाठी अडसर

### आमदारांनी लक्ष देण्याची गरज

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २७ जुलै ..**

दक्षिण सोलापूर तालुक्यातील नांदणी येथे वन विभागाच्या वतीने लहान मुलांसाठी चिल्ड्रन पार्क बनविण्यात आले आहे. दीड वर्षापूर्वी या पार्कचे उद्‌घाटन उच्च व तंत्र शिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील व आमदार सुभाष देशमुख यांच्या हस्ते करण्यात आले होते. या पार्कच्या विकासासाठी निधीची कमतरता पडू देणार नसल्याचे सांगण्यात आले होते. मात्र प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे दीड वर्षात ते बंद पडले असून मुख्य प्रवेशद्वाराला कुलूप लावण्यात आले आहे. पर्यटकांसाठी नांदणी टोलनाका खर्चिक ठरत असल्याने शहरातील पर्यटकांनी तिकडे पाठ फिरविली आहे. त्यामुळे नांदणी चिल्ड्रन पार्कला भेट देणाऱ्या पर्यटकांसाठी टोल माफ करणे गरजेचे आहे. त्यासाठी लोकप्रतिनिधीनी पाठपुरावा करण्याची मागणी होत आहे.

सोलापूर विजयपूर महामार्गावर नांदणी येथे लहान मुलांसाठी जंपिंग, पॅगोडा, घसरगुंडी, झुलता लाकडी पूल, फोटो सेशन पॉईंट, विश्रांती कक्ष आणि स्वच्छतागृहासह मुलांच्या मनोरंजनासाठी अनेक मनमोहक पॉईंट निर्माण करण्यात आली आहेत.



शेजारीच नागम्मा मंदिर व गावतलाव असल्याने विरंगुळ्यासाठी मन आकर्षित होते. मुलांना आकर्षक वाटेल असे मुख्यप्रवेशद्वारही आहे. शिवाय, लालम ातीचे रस्तेही बनवण्यात आले. हिरवळसुध्दा येथे केली आहे. येथील पार्क सुरू झाल्यानंतर पालकांचा व लहान मुलांकडून प्रतिसाद चांगला होता.

सीना-भीमा खोऱ्यातील विविध गावातील पालक लहान मुलांसह येथे विरंगुळ्यासाठी येत असत. सहा महिने ते एक वर्ष पर्यटकांचा प्रतिसादही चांगला होता. मात्र सध्या नांदणीचा चिल्ड्रन पार्क बंद असल्याने पालक, मुले व पर्यटक यांचा हिरमूड झाला आहे. टोल नाक्यापासून अर्धा कीलोमीटर अंतरावरच चिल्ड्रन पार्क असल्याने पर्यटकांना टोलनाक्याचा भुर्दंड सहन करावा लागत आहे. चिल्ड्रन पार्क मुलांसाठी मोफत आहे, मात्र प्रवासातील टोलसाठी पैसे मोजावे लागत असल्याने पालकांनी नांदणी टोल नाक्याला जाणे टाळत आहेत. म्हणून आमदार सुभाष देशमुख यांनी पर्यटकांना टोलमाफी करण्यासाठी पाठपुरावा करण्याची मागणी करण्यात येत आहे.



ग्रामपंचायत पातळीवरून पार्कसाठी सहकार्य केले आहे. प्रारंभीच्या काळात पाण्याचीही सोय ग्राम पंचायतीने केली होती. मात्र नांदणी टोलनाक्याम ुळे पर्यटक पार्कला भेट देण्याचे टाळत असल्याने पार्क बंद पडल आहे. ते बंद न करता लहान मुलांसाठी पुन्हा चालू करावेत. ग्रामपंचायत पातळीवरून सहकार्य करू.

**- शिवानंद बंडे, सरपंच, नांदणी**



चिल्ड्रन पार्क चालू आहे. पण, नांदणी येथील टोलनाक्यामुळे शहर व परिसरातील पर्यटक येत नसल्याचे निदर्शनास आले. मग, आमच्या स्तरावरून आमदार सुभाष देशमुख यांना ही गोष्ट कळवली. राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने या चिल्ड्रन पार्कसाठी सहकार्य केल्यास ते पुन्हा छान चालेल.

**- रोहीतकुमार गांगुर्डे, वनपरिक्षेत्र अधिकारी, सोलापूर**

## महत्वाचे...

### प्रॉव्हीडंट फंडच्या अनियमीतते प्रकरण; सिमकोच्या तत्कालीन व्यवस्थापकास अटकपूर्व जामीन मंजूर

**सोलापूर, दि. २८ जुलै -**



येथील सुप्रसिध्द ''सिमको स्पिनर्स'' या मिलमधील माजी व्यवस्थापक एम.एम. कुलकर्णी (वय ६४, रा. सोलापूर) यांना प्रॉव्हीडंट फंड अनियमीतता प्रकरणी दाखल असलेल्या गुन्ह्यात सोलापूर येथील सत्र न्यायालयातील न्यायाधीश जयदीप मोहिते यांनी अटकपूर्व जामीन मंजूर केला. सन २०१६-१७ या वर्षामध्ये देय असलेली प्रॉव्हीडंट फंडची ६४ लाख ७९ हजार ८०५ रुपये इतकी रक्कम न भरुन अनियमीतता केल्याप्रकरणी प्रॉव्हीडंट फंड कार्यालयाने सोलापूर तालुका पोलीस स्टेशन येथे फिर्याद दाखल केलेली होती. त्यावर तत्कालीन संचालक व व्यवस्थापक एम. एम. कुलकर्णी यांचेवर गुन्हा दाखल झाला. त्याप्रमाणे तपास चालु होता. तथापि, सदर प्रकरणात अटकेची शक्यता निर्माण झाल्याने तत्कालीन व्यवस्थापक एम. एम. कुलकर्णी यांनी ॲड. शशी कुलकर्णी यांचेमार्फत सोलापूर येथील सत्र न्यायालयात अटकपूर्व जामीन अर्ज दाखल केला होता. त्याची सुनावणी सत्र न्यायालयासमोर झाली. आरोपीच्या वकिलांचा युक्तीवाद ऐकून न्यायालयाने ५० हजार रूपयाच्या बंधपत्रावर अटकपूर्व जामीन मंजूर केला. सदर प्रकरणी सरकारतर्फे ॲड. दत्ता पवार यांनी तर आरोपीतर्फे ॲड. शशी कुलकर्णी, ॲड. स्वप्नील सरवदे, ॲड. प्रसाद अग्निहोत्री, ॲड. आदित्य आदोणे यांनी काम पाहिले.



### महिलांनी फेरावरच्या गाण्यांवर धरला ठेका; नागपंचमीनिमित्त गावोगावी उत्साह

**अक्कलकोट, दि.२८ जुलै-**

अक्कलकोट तालुक्यात श्रावणात घन निळा बरसल्याने रानात हिरवी चादर पसरल्याचे दृष्य आहे. त्यामुळे यंदाच्या नागपंचमीचा उत्साह मोठा असल्याचे दिसत आहे. गावोगावी महिलांनी फेरावरच्या गाण्यांवर ठेका धरल्याचे चित्र आहे. मंगळवारी दि. २९ जुलै रोजी नागपंचमी असल्याने घरोघरी नवविवाहिता माहेरी आल्या आहेत. उंचच ऊंच झोके, झिम्मा, फुगडी, फेर धरणे आदि खेळ रंगत आहेत. बहिणीने भाऊरायासाठी सोमवारी उपवास धरला . पंचमी सणासाठी भाऊरायाने बहिणीसाठी नानाविध नववस्त्रे, आभुषणे, बांगड्या, चुडे आदि खरेदी केली . ग्रामीण भागात ऊंचच ऊंच झोके ठिकठिकाणी आठ दिवसांपुर्वीच लागलेली आहेत. उंचच ऊंच झोके घेण्यास महिलामध्ये नागपंचमी सणास जणु स्पर्धाच लागते. नागोबा नरसोबाची चित्रे पुजेसाठी घरोघरी आणली आहेत. नागनाथ मंदिरात वारुळावर दुध लाहया कान्होलेचे नैवैदय दाखवले जातात. तरुणी नवविवाहिता साऱ्या एकत्र येऊन ऊंचच ऊंच झोका, फेर धरणे, झिम्मा फुगडी, गाणी, उखाणे आदि महिलांच्या खेळाने पंचमी रंगते आहे. शहरी भागात महिलांवर कुंटुंबाची मोठी जबाबदारी असल्याने असे सण परंपरा उत्सव साजरे करण्यात मर्यादा आल्यात पण आजही विशेषतः ग्रामीण भागात पंचमी सण मोठ्या उत्साहात साजरा होतो



### अशोक चौक, कर्णिक नगर परिसरातील रस्त्यावरील अतिक्रमण हटविले

**सोलापूर, दि. २८ जुलै -**

शहरातील अशोक चौक ते वालचंद कॉलेज पर्यंत आणि कर्णिक नगर येथील चिल्ड्रन्स पार्क शेजारील रस्त्यावर असलेल्या खाद्यपदार्थाच्या गाड्यांचे अतिक्रमण काढण्यात आले. या परिसरातील आठ रस्त्यावरील लोखंडी गाड्यांसह इतर साहित्य जप्त करण्यात आले. महापालिका अतिक्रमण प्रतिबंधक विभागाच्या वतीने ही कारवाई करण्यात आली. महापालिका अतिक्रमण प्रतिबंधक विभागाच्या वतीने आज सोमवारी सकाळच्या सत्रात ही मोहीम राबविण्यात आली. येथील अशोक चौक ते वालचंद कॉलेज पर्यंत तसेच कर्णिक नगर येथील चिल्ड्रन्स पार्क शेजारील रोडवरील असलेल्या खाद्यपदार्थाच्या गाड्यांवर ही कारवाई केली. या मोहिमेत आठ लोखंडी गाड्या, प्लास्टिक खुर्च्या , टेबल व इतर साहित्य जप्त करण्यात आले. कारवाई पाहण्यासाठी लोकांनी मोठी गर्दी केली होती. महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांच्या आदेशानुसार नियंत्रण अधिकारी तपन डंके यांच्या मार्गदर्शनाखाली अतिक्रमण प्रतिबंधक विभागाचे अधिकारी हेमंतकुमार डोंगरे यांच्या माध्यमातून कनिष्ठ अभियंता सुफियान पठाण, दीपक कुंभार यांच्यासह कर्मचाऱ्यांनी ही कारवाई केली. पोलीस बंदोबस्तात जेसीबीच्या साह्याने ही मोहीम राबविली.

# शेतकऱ्यांनी खर्च कमी अन् अधिक उत्पन्नसाठी झटावे

## सपोनि मनोज पवार यांचे प्रतिपादन

### पोलीस अधीक्षकांच्या मिशन विकसित गाव अभियानाचा प्रारंभ

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २८ जुलै-**

सध्या शेतीत रासायनिक खते व सुधारीत बियाणे वापरणे काळाची गरज बनल्याने शेती म हाग ठरत आहे. परंतू शेतकऱ्यांनी ऊस, द्राक्ष, केळी , उडीद, तूर, फळबाग व इतर पिकांच्या अधिक उत्पादनासाठी कमी खर्च करण्यासाठी प्रयत्न करावेत. कमी खर्चामुळे शेती व्यवसाय फायदेशीर ठरणार असून शेतीमध्ये सुधारणा करण्यासही मदत होणार असल्याचे प्रतिपादन सहाय्यक पोलीस निरिक्षक मनोज पवार यांनी माळकवठे (ता.दक्षिण सोलापूर) येथे केले.



पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी यांच्या संकल्पनेतून मिशन विकसित गाव अभियानाचा प्रारंभ श्री. पवार यांच्या हस्ते झाला. यावेळी भाजपाचे ज्येष्ठ नेते हणमंत कुलकर्णी, प्रगतशील शेतकरी अंकुश पाटील, लवंगीचे सरपंच संगमेश बगले-पाटील, मृत्यूंजय बगले, सागर चव्हाण यांच्यासह शेतकरी व ग्रामस्थ उपस्थित होते. सोलापूर ग्रामीण पोलीस , मंद्रुप पोलीस ठाणे, सोलापूर ॲग्रो प्रोड्यूसर कंपनी, माळकवठे, व पोलीस किसान, पंढरपूर आयोजित प्रशिक्षण कार्यशाळा माळकवठे येथील अम ोगसिध्द देवस्थान येथे संपन्न झाली. सदर कार्यशाळेस ७० शेतकरी उपस्थित होते. यावेळी प्रगतशील शेतकरी अंकुश पाटील यांनी शेतीम धील विकास व शेतकऱ्यांच्या आर्थिक उन्नतीसाठी शेतकऱ्यांनी झिरो बजेट शेती करताना कमी खर्चात अधिक उत्पादन घ्यावे. तसेच सेंद्रीय शेतीसाठी प्रयत्न करण्याचे आवाहन केले. यावेळी भाजपाचे प्रदेश सदस्य हणमंत कुलकर्णी यांनीही शेतीतील बदलाबाबत मार्गदर्शन केले.


# सोशल मिडीयावर घुमतोय भावी सदस्यांचा आवाज

## माळशिरसमध्ये जाहीरातबाजीला आला वेग

**तभा वृतसेवा,**
**पिलीव, दि. २८ जुलै -**

जिल्हा परिषद गटात व पंचायत समिती गणात इच्छुक उमेदवार व समर्थकांचा सोशल मीडियावरुन भावी जिल्हा परिषद सदस्य म्हणून आवाज घुमू लागला आहे.

सध्या जोरदार जाहीरातबाजी सुरु आहे. जणू काय निवडणून येत जिल्हा परिषद व पंचायत समिती सदस्य झालोच अशा अविर्भावात सोशल मि डीयावर त्यांची स्वतःचीच तसेच समर्थकांची जोरदार जाहीरातबाजी सुरु आहे. जिल्हा परिषद व पंचायत समितीचे गट व गण रचना जाहीर झाले आहेत. यामुळे लवकरच निवडणुका होण्याची शक्यता आहे. त्यादृष्टीने गावगाडयातील पुढारी सक्रिय झाल्याचे चित्र आहे. माळशिरस तालुक्यात जिल्हा परिषदेचे अकरा ऐवजी नऊ गट झाले आहेत. तर पंचायत समितीचे २२ ऐवजी १८ गण झाले आहेत. तालुक्यात यामुळे जिल्हा परिषद गटाची व पंचायत समिती गणाची पुनर्रचना झाली आहे. आता नव्याने तयार झालेले गट



किंवा गण यामध्ये वेगवेगळ्या नव्या गावांचा समावेश झाला आहे. यामुळे कोणत्याही पक्षातून निवडुन येण्यासाठी सदस्याला मोठी कसरत करावी लागणार आहे. नवीन गावातील मतदारापर्यंत पोहचुन त्याचे मतपरिवर्तन करुन मत पदरात पाडून घेणे एवढे सोपे नाही. जिल्हा परिषद व पंचायत समिती गट व गणांची रचना झाली आहे पण अदयापही याचे आरक्षण जाहीर होणे बाकी आहे. नक्की कोणते आरक्षण पडणार यानंतरच खरेतर उमेदवार निश्चित होणार आहे. पण निवडणूकीत आरक्षण कोणते पडणार किंवा पक्ष उमेदवारी कोणाला देणार हे माहित नसतानाही अशी जाहीरातबाजी म्हणजे उतावळा नवरा गुडघ्याला बाशिंग, अशीच अवस्था या सोशल मीडियावरुन जाहीरातबाजी करणाऱ्याबाबत म्हणावे लागेल.

# पत्रा तालीम मंडळाच्या उत्सव अध्यक्षपदी घाडगे

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २८ जुलै -**

पत्रा तालीम युकव, क्रिडा मंडळाच्या अध्यक्षपदी आदित्य घाडगे यांची एकमताने निवड करण्यात आली. पत्रा तालीम युवक क्रीडा मंडळाची



गणेशोत्सव पदाधिकारी बैठक नुकतीस पार पडली. सुरुवातीला मानाच्या श्री पणजोबा गणपतीची पूजा पैलवान दत्तात्रय कोलारकर, राजाराम दुधाळ, माजी स्थायी समिती चेअरमन पद्माकर काळे, बापू धंगेकर, श्रीकांत घाडगे, बापू जाधव, मनोज गादेकर, उम ाकांत घाडगे यांच्या हस्ते करण्यात आली. यानंतर परिसरातील निधन झालेल्या स्थानिक रहिवाश्याना श्रद्धांजली वाहण्यात आली. तदनंतर वर्षी मावळते उत्सव अध्यक्ष नवनाथ बन्ने यांनी मागील उत्सवाचा कार्य अहवाल सादर करून २०२५-२६ वर्षासाठी नूतन पदाधिकाऱ्यांच्या निवडी करण्यात आल्या. या बैठकीस उत्तम कोलारकर, जयंत शेळके, सचिन शिंदे, पैलवान अमर दुधाळ, पिंटू चव्हाण, आनंद कोलारकर, सु-धीर पाटील, राहुल बनसोडे, सुहास कोलारकर, सचिन स्वामी, धनराज शिंदे, प्रसन्न गायकवाड, सागर जाधव, निशांत सावळे, युवराज फडके, संतोष माने, ओंकार कदम, गणेश भुरळे यांच्यासह मंडळाचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**निवडण्यात आलेले नुतन अन्य पदाधिकारी**
उपाध्यक्ष सुमित ननवरे,अनिकेत बनसोडे, कार्याध्यक्ष - अजिंक्य शिंदे, खजिनदार - किशोर गादेकर , सेक्रेटरी - ओंकार भुरळे, मिरवणूक प्रमुख - सौरभ कन्हेरी, लेझीम प्रमुख - निलेश शिंदे, प्रसिद्धी प्रमुख - वैभव गंगणे, योगेश फडके.



# सद्यस्थितीत ज्ञानार्जनाशिवाय पर्याय नाही

## सेवानिवृत्त मुख्याध्यापक कुलकर्णी यांचे प्रतिपादन

### श्रीपूरच्या ब्राह्मण सेवा संघातर्फे विद्यार्थी गौरव

**तभा वृत्तसेवा,**
**श्रीपूर, दि. २८ जुलै-**

बदललेल्या सामाजिक स्थितीमध्ये विशेष करून ब्राह्मण तरुण मुलां-मुलीमध्ये न्यूनगंडाची भावना निर्माण होत आहे. परंतू अशा परिस्थितीत सर्वांनी आपले पूर्ण लक्ष शिक्षणावर केंद्रीत करून ज्ञानार्जन करून उद्योग, व्यवसाय, नोकरीच्या माध्यमातून आपले कुटूंब सक्षम करून देश, देव, धर्मासाठी कटिबद्ध होणे ही काळाची गरज असल्याचे प्रतिपादन माळशिरस येथील सेवानिवृत्त मुख्याध्यापक एम.पी. कुलकर्णी यांनी केले.

श्रीपूर येथील ब्राम्हण सेवा संघाच्या वतीने गुणवंत विद्यार्थ्यांच्या सत्कार समारंभात ते बोलत होते. कार्यकमाच्या अध्यक्षस्थानी प्रमोद मदाल होते. कल्पना कुलकर्णी यांनी प्रास्ताविक केले. यानंतर पहिली ते उच्च शिक्षण, सामाजिक क्षेत्रात उल्लेखनिय यश मिळवलेल्या सुमारे ३५ विद्यार्थ्यांचा शैक्षणिक साहित्य देवून सत्कार करण्यात आला. यावेळी अध्यक्ष प्रमोद मदाल यांनी ब्राम्हण सेवा संघाच्या या कार्यामुळे विद्यार्थ्यांचा उत्साह वाढण्यास मदत होते हा उपक्रम स्तुत्य असून याची व्याप्ती वाढणे गरजेचे असल्याचे सांगितले. प्रा. नितीन देशपांडे यांनी सुत्रसंचालन केले. प्रवीण कुलकर्णी, अभिजित आहेरसिंग, श्रीपाद कुलकर्णी, पर्जन्य कुलकर्णी, अर्णव देशपांडे, यांनी परिश्रम घेतले.

## निधन वृत्त...

### सुमन चव्हाण



**पिलीव, दि.२८ जुलै-**

माळशिरस तालुक्यातील कुसमोड येथील सुमन नामदेव चव्हाण (वय-८२) यांचे वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पश्चात दोन मुले, दोन मुली, सुना, नातवंडे असा परिवार आहे. धन्यकुमार चव्हाण यांच्या मातोश्री होत.

### शांताबाई मोरे



**अक्कलकोट दि २८ जुलै**

अक्कलकोट तालुका पंचायत समितीचे माजी विरोधी पक्ष नेते तथा श्री फत्तेसिंह शिक्षण संस्थेचे संचालक श्री बाळासाहेब मोरे यांच्या मातोश्री शांताबाई पांडुरंग मोरे (वय ८२) यांचे सोमवारी पहाटे सव्वा सहा वाजण्याच्या सुम ारास वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पश्चात दोन मुले,एक मुलगी, सुना, नातवंडे असा परिवार आहे. अंत्यविधी सोमवारी दुपारी अडीच वाजता कुरनूर( तालुका अक्कलकोट) येथे करण्यात आले..गव्हर्नमेंट कॉन्ट्रॅक्टर प्रमोद मोरे यांच्या ते काकू होत्या.

# ‘एआय’ ठरतोय नागरिक आणि शासन यामधील दुवा

## तक्रार निवारणासाठी जिल्ह्यात एआयचे ११ लाख कॉल

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २८ जुलै -**

शासनाच्या प्रत्येक विभागात एआय तंत्रज्ञानाचा वापर वाढत आहे. भविष्यात एआय वापर काळाची गरज बनणार असल्याचे संकेत दिसून येत आहेत. त्यामुळे पंढरपूर वारीतील भक्तांची संख्या असो अथवा जिल्हा प्रशासनाकडून नागरीकांसाठी पुरविण्यात येणाऱ्या सुविधा अशा प्रत्येक ठिकाणी एआय वापरून शासनाकडून उद्दीष्टे साध्य करण्याचे प्रयत्न सुरू आहेत. मार्च एप्रिल महिन्यात एंट्री केलेल्या एआयकडून जिल्हा प्रशासनाकडून रेशन, आरोग्य यासह इतर विभागाच्या सेवाबद्दल नागरीकांकडे विचारणा करण्यात आली. यासाठी जिल्हा प्रशासनाकडून




जिल्ह्यातील ११ लाख नागरीकांना एआय च्या माध्यमातून कॉल करून विभागातील तक्रारींची विचारणा करण्यात आली. त्यापैकी ८ लाख नागरीकांनी एआय कॉल उचलले आहेत. आठ लाखपैकी पाच लाख ५० हजार कॉल एक मिनिटापर्यंत संवाद साधण्यात आला आहे. त्यामुळे एआय कॉलच्या माध्यमातून जिल्ह्यातील विविध गावातील नागरीकांपर्यंत पोहोचण्यास मदत झाले असून लवकरच उर्वरीत नागरीकांपर्यंत पोहोचण्यास मदत होत आहे. एआय कॉलमुळे नागरीकांनी अद्याप परीपूर्ण म ाहीती नसल्याने पहिल्या टप्यात जिल्हा प्रशासनाचे प्रयत्न कौतुकास्पद आहे. एआय च्या कॉलवेळी तक्रार सांगितल्यानंतर संबंधित विभागाच्या अधिकारी व कर्मचारी यांना प्रत्यक्ष स्थळभेट देऊन तक्रारदारांची समस्या दूर करण्यास सांगण्यात आले आहे. त्यामुळे नागरीक आणि शासन याम ध्ये एआय दुवा म्हणून काम करीत आहे. त्यामुळे भविष्यात एआय वापर काळाची गरज बनणार आहे.

### नागरिकांच्या समस्यांचे निराकरण गरजेचे

सध्याचे युग तंत्रज्ञाचे आहे. धावपळीच्या युगात प्रत्येकाकडे वेळेची मर्यादा आहे. शासनाच्या विभागाविषयी सर्वे करण्यासाठी एआय उत्तम माध्यम आहे. मात्र शासनाने नागरीकांच्या समस्यांचे निराकरण करण्यासाठी पाठपुरावा करावे. मनुष्यबळा अभावी भविष्यात एआय काळाची गरज बनणार आहे.

**- महेंद्र उंबरजे, निवृत्त उपअभियंता, औज (मं.)**

### एआयमुळे विभागाच्या त्रुटी सुधारण्यासाठी संधी

एआय कॉलमुळे नागरीकांपर्यंत पोहोचण्यास मदत झाली आहे. शिवाय नागरीकांच्या विभागाविषयी समस्या व अडचणी सोडविण्यासाठी सहकार्य होत आहे. यामुळे संबंधित विभागातील त्रुटी व समस्या दूर करण्यास मदत होत आहे. त्यामुळे भविष्यात इतर विभागातही एआयचा वापर करणार आहे.

**- कुलदीप जंगम, मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प. सोलापूर**

### भाऊसाहेब व गुरूजी यांच्याकडे लक्ष

एआय कॉलमुळे आरोग्य, अंगणवाडी, रेशन, शासकीय दवाखाने यासह इतर विभागाच्या सेवासंदर्भात जिल्हा प्रशासनाला माहीती मि ळाल्यानंतर आता तलाठी, ग्रामसेवक, गुरुजीसह इतर विभागाचे अधिकारी व कर्मचारी लक्ष्य असणार आहेत. त्यामुळे नागरीकांना सुलभ सेवा मिळण्यास मदत होणार आहे.

## महत्त्वाचे

### समर मॅकइंटोशला दुसऱ्या सुवर्णपदकाची आशा



**सिंगापूर** : येथे सुरु असलेल्या जागतिक जलतरण अजिंक्यपद स्पर्धेत पहिल्या दिवशी ४०० फ्रीस्टाईलमध्ये सुवर्णपदक जिंकल्यानंतर समर मॅकइंटोशला आपले दुसरे सुवर्णपदक जिंकण्याची आशा आहे. १८ वर्षीय कॅनेडियन सिंगापूरमधील आठ दिवसांच्या स्पर्धेत पाच वैयक्तिक सुवर्णपदके जिंकण्यासाठी प्रयत्न करत आहे. ती आता २०० मीटर वैयक्तिक मेडलीमध्ये आपले दुसरे सुवर्णपदक मिळविण्यासाठी प्रबळ दावेदार आहे. तिने काही महिन्यांपूर्वी कॅनेडियन ट्रायल्समध्ये २ मिनिटे, ०५.७० सेकंदांचा जागतिक विक्रम केला होता. मॅकइंटोशला अमेरिकन ॲलेक्स वॉल्शकडून आव्हान मिळण्याची अपेक्षा आहे. तसेच १२ वर्षीय चिनी यु झिदी देखील मैदानात आहे, तिचे वय आणि आश्चर्यकारक वेळ जागतिक जलतरणात चर्चेत आहेत. महिलांची १०० बटरफ्लाय ही आणखी एक लक्षवेधी शर्यत आहे. अमेरिकन ग्रेचेन वॉल्श - ॲलेक्सची मोठी बहीण - ही विजेतेपदाची दावेदार आहे आणि तिने या वर्षाच्या सुरुवातीला ५४.६० चा विश्वविक्रम केला आहे. बेल्जियमचा रुस व्हॅनोटर्डिज्क आणि ऑस्ट्रेलियाचा अलेक्झांड्रिया पर्किन्स वॉल्शला धक्का देतील.

### नाओमी ओसाका आता प्रशिक्षक पॅट्रिकपासून वेगळी



**वॉशिंग्टन** : चार वेळा ग्रॅण्ड स्लॅम विजेत्या नाओमी ओसाका आणि प्रशिक्षक पॅट्रिक मौराटोग्लू यांनी एका वर्षापेक्षा कमी कालावधीत एकत्र काम करणे थांबवले आहे, अशी घोषणा समाजमाध्यमावर केली. मर्सी पॅट्रिक, अशी ओसाकाने आपल्या पोस्टची सुरुवात केली. पॅट्रिक जवळ उभा असताना ओसाका सराव सर्व्ह करत असल्याचा फोटो आहे. 'तुमच्याकडून शिकण्याचा हा एक उत्तम अनुभव होता. तुम्हाला शुभेच्छा. तुम्ही मी भेटलेल्या सर्वात छान लोकांपैकी एक आहात आणि मला खात्री आहे की मी तुम्हाला नक्की भेटेन.', असे नाओमी ओसाका म्हणाली. डी.सी. ओपनमध्ये ओसाकाचा दुसरा सामना हरल्यानंतर तीन दिवसांनी आणि टोरंटोमध्ये स्पर्धा सुरू होण्यापूर्वी ही बातमी आली आहे. अमेरिकन ओपन, वर्षातील शेवटची मोठी स्पर्धा आणि ओसाकाने दोनदा जिंकलेली ही स्पर्धा २४ ऑगस्ट रोजी न्यू यॉर्कमध्ये सुरू होत आहे. गत वर्षीच्या अमेरिकन ओपनमध्ये दुसऱ्या फेरीतून बाहेर पडल्यानंतर लगेचच ओसाकाने विम फिसेटला काढून टाकले तेव्हा ओसाकाने मोराटोग्लू - जी सेरेना विल्यम्सची दीर्घकाळ प्रशिक्षक होती - यांना कामावर ठेवले. माजी प्रथम विश्वमानांकित ओसाका सध्या ५१ व्या क्रमांकावर आहे आणि या हंगामात तिच्या विजयाचा रेकॉर्ड २१-११ असा आहे. २०२१ मध्ये ऑस्ट्रेलियन ओपन जिंकल्यानंतर ती ग्रॅण्ड स्लॅम स्पर्धेत तिसऱ्या फेरीच्या पुढे गेलेली नाही.

### तुरुंगातील मुष्टियोद्धा विजेता ड्वाइट मुहम्मद कावीचे निधन

**कॅमडेन** : तुरुंगात मुष्टियोद्धाचे धडे गिरवणारा व दोन वजन गटांचा विश्वविजेता झालेला हॉल ऑफ फेम फायटर ड्वाइट मुहम्मद कावी यांचे निधन झाले आहे. ते ७२ वर्षांचे होते. कावीची बहीण वांडा किंग म्हणाली की, पाच वर्षांच्या डिमेंशियाशी झुंज दिल्यानंतर त्यांचे शुक्रवारी निधन झाले. बाल्टीमोरमध्ये ड्वाइट ब्रेक्सटनमध्ये जन्मलेला कावीची वाढ कॅमडेनमध्ये झाली. सशस्त्र दरोड्याच्या शिक्षेदरम्यान त्याने राहवे स्टेट तुरुंगात मुष्टियुद्ध स्पर्धेत भाग घेतला आणि १९७८ मध्ये सुटका झाल्यानंतर लगेचच २५ व्या वर्षी तो व्यावसायिक झाला. जुलै १९८६ मध्ये १५ फेऱ्यांमध्ये कावीने भविष्यातील हेवीवेट चॅम्पियन इव्हँडर होलीफिल्डकडून किताब गमावला. कावीने नंतर हेवीवेट म्हणून लढा दिला, जॉर्ज फोरमनने त्याला सात फेऱ्यांमध्ये रोखले.

### फर्नांडिस, डी मिनौर डीसी ओपन विजेते



**वॉशिंग्टन** : लेला फर्नांडिसच्या कारकिर्दीतील सर्वात मोठे टेनिस विजेतेपद पटकावले. डीसी ओपन टेनिस स्पर्धेत अंतिम सामन्यात ३६ व्या क्रमांकावर असलेल्या कॅनडाच्या २२ वर्षीय डावखुऱ्या लेला फर्नांडिसने अंतिम फेरीत अण्णा कालिंस्कायाचा ६-१, ६-२ असा पराभव करून एका मोठ्या आठवड्यातील कठीण सामन्यांचा शेवट केला. फर्नांडिसने आपले चौथे एकेरी चषक जिंकले. ५०० स्पर्धेती ही तिची पहिलीच ट्रॉफी आहे. एम्मा राडुकानूकडून पराभूत होण्यापूर्वी न्यू यॉर्कमध्ये अंतिम फेरीत पोहोचली. पुरुषांचा करंडक क्रमांक ७ च्या ॲलेक्स डी मिनौरने जिंकला. ॲलेक्सने १२ व्या क्रमांकाच्या अलेजांद्रो डेव्हिडोविच फोकिनाविरुद्ध ५-७, ६-१, ७-६ (३) असा विजय मिळवून आपले १० वे एटीपी जेतेपद मिळवले.

# बुमराह पाचवी कसोटी खेळल्यास हिताचे ठरेल : गिल



शुभमन गिल



जसप्रीत बुमराह

◆ **मॅन्चेस्टर, २८ जुलै**

जर वेगवान गोलंदाज जसप्रीत बुमराहला तीन सामन्यांपर्यंत मर्यादित ठेवण्याची संघाची मूळ योजना असूनही तो मालिका निर्णायक पाचवी कसोटी खेळू शकला तर तो संघासाठी मोठा करार असेल, असे भारताचा कर्णधार शुभमन गिल म्हणाला.

वर्षाच्या सुरुवातीला तणावग्रस्त झालेल्या बुमराहला त्याच्या वर्कलोड व्यवस्थापन करण्यासाठी व पुढील दुखापती टाळण्यासाठी सुरुवातीला इंग्लंडच्या दीर्घ दौऱ्यात केवळ तीन कसोटी सामन्यांमध्ये खेळायचे होते. तो एजबॅस्टनमधील दुसऱ्या कसोटी सामन्याला मुकला, परंतु उर्वरित तीन सामन्यांमध्ये खेळला.

मॅन्चेस्टरमधील बरोबरीनंतर इंग्लंडने मालिकेत २-१ अशी आघाडी घेतली आहे, त्यामुळे पाच सामन्यांच्या सामन्यात बरोबरी साधण्यासाठी भारताला ओव्हल येथे विजय मिळवावा लागेल.

जर त्याला वाटत असेल की तो पूर्णपणे तंदुरुस्त आहे व आमच्यासाठी उपलब्ध आहे, तर मला वाटते की तो आमच्यासाठी मोठा करार असेल, असे गिल म्हणाला. जर तो खेळत नसेल, तरी मला वाटते की आमच्याकडे योग्य प्रकारचे गोलंदाजी आक्रमण आहे, असेही तो म्हणाला.

ओल्ड ट्रॅफर्ड येथे झालेल्या चौथ्या कसोटी सामन्यात बुमराहने ३३ षटके टाकली आणि ३१ जुलैपासून सुरू होणाऱ्या अंतिम सामन्यासाठी त्याला साडेचार दिवसांचा अवधी आहे. त्याने आतापर्यंत तीन कसोटी सामन्यांमध्ये पाच डावांमध्ये ११९.४ षटके टाकली आहेत, जी प्रति डाव अंदाजे २४ षटके आहे.

तथापि, तो मोहम्मद सिराजसह मालिकेत भारताचा संयुक्त सर्वाधिक बळी घेणारा गोलंदाज आहे, यात तीन सामन्यांमध्ये दोन वेळा पाच बळींचा समावेश आहे, त्यामुळे संघ त्याला अंतिम सामन्यासाठी परत आणण्याचा मोह करू शकतो.

**बुमराहबाबत केवळ रणनीतिक खेळी**

गिलने बुमराह मालिकेतील पाचवा आणि शेवटचा कसोटी सामना खेळणार की नाही हे उघड न करून योग्य रणनीतिक निर्णय घेतला, असे इंग्लंडचा माजी कर्णधार ॲलिस्टर कुकने म्हटले आहे. जरी बुमराह खेळणार नसला तरी, तुम्ही लोकांना आता सांगणार नाही, ही खेळी केवळ पूर्णपणे रणनीतिक आधारावर आहे, असे कुक म्हणाला. त्यांनी मालिकेच्या सुरुवातीलाच चूक केली होती की तो केवळ तीनच खेळाडू खेळवू शकतो, कारण तुम्हाला अशा परिस्थितीत टाकले जात आहे, जिथे मालिका अजूनही धोक्यात आहे. जर बुमराह खेळण्यास तंदुरुस्त नसेल तर न खेळणे हा योग्य निर्णय आहे, असेही तो म्हणाला.

**बुमराहबाबत अद्याप निर्णय नाही : गंभीर**

भारताचे मुख्य प्रशिक्षक गौतम गंभीर यांनी पुष्टी केली की, ओव्हल कसोटीपूर्वी सर्व जलद गोलंदाज निवडीसाठी उपलब्ध आहेत आणि चौथ्या सामन्यात बुमराह खेळण्याची शक्यता नाकारली नाही. सर्व जलद गोलंदाज आहेत. दुखापतीची कोणतीही भीती नाही, असे गंभीर यांनी ठामपणे सांगितले.

'शेवटच्या कसोटीसाठी संघ संयोजनाबाबत आमची कोणतीही चर्चा झालेली नाही. जसप्रीत बुमराह खेळेल की नाही याबद्दल कोणताही निर्णय झालेला नाही. शेवटी, जो कोणी खेळेल, तो देशासाठी काम करण्याचा प्रयत्न करेल, असे ते म्हणाले.

लॉर्ड्स कसोटीनंतर, भारताला अनेक अडचणींना तोंड द्यावे लागले. अर्शदीप सिंगला त्याच्या गोलंदाजीच्या हाताला दुखापत झाली, आकाश दीप कंबरेच्या दुखापतीमुळे बाहेर पडला व मोहम्मद सिराज सामान्य थकव्याने ग्रस्त झाला. अष्टपैलू नितेश कुमार रेड्डीलाही मालिकेतून बाहेर काढण्यात आले. परिणामी, भारताला घरून अधिक सैन्य आणावे लागले. अंशुल कंबोज संघात सहभागी झाला व त्याला अंतिम एकादशमध्ये प्रसिध कृष्णापेक्षा पसंती देण्यात आली. ◀(वृत्तसंस्था)

# अक्कलकोट तालुका क्रीडा संकुलासाठी ३ कोटींचा निधी प्राप्त

**▸▸संकुलात नवीन सोयी सुविधा करणार : आ. कल्याणशेट्टी यांची माहिती**

**तभा वृत्तसेवा**
**अक्कलकोट दि २८ जुलै-**

अक्कलकोट येथील एवन चौकातील फत्तेसिंह क्रीडांगणाच्या उर्वरित भौतिक विकास कामासाठी नव्याने तीन कोटी रुपये प्राप्त झाल्याची माहिती आमदार सचिन कल्याणशेट्टी यांनी दिली. शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी असलेले हे जिल्ह्यातील सर्वात मोठे मैदान मागील तीस वर्षे दुर्लक्षित होते. स्पर्धेच्या युगात सर्व सोयीचे मैदान असणे गरजेचे आहे. त्यासाठी अथक प्रयत्न करून ३ कोटी प्राप्त झालेले आहेत. येत्या काळात आणखी नवीन सोयी सुविधा युक्त मैदान बनविण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे त्यांनी सांगितले.



अक्कलकोट तालुका क्रीडा संकुलला यापूर्वी १ कोटी रुपये अनुदान प्राप्त झाले होते. त्यामध्ये ४०० मीटर धावणमार्ग, बॅडमिंटन हॉल, विविध खेळाचे क्रीडा साहित्य, पाण्याचे बोअर, सी.सी.टी.व्ही कॅमेरे व कबड्डी, खोखो, क्रीडांगणे तयार करण्यात आले होती आणि याचा वापर दररोज खेळाडू नागरिक घेत आहेत. आता नवीन शासन निर्णयानुसार तालुका क्रीडा संकुल योजना विकास निधी हा १ कोटीवरुन तब्बल ५ कोटी रुपये इतका करण्यात आला आहे. त्यानुसार अक्कलकोट तालुक्यास त्यातील ३ कोटी निधीची मान्यता शासनाकडून प्राप्त झाली आहे.

यासाठी अक्कलकोट तालुक्याचे आमदार तथा तालुका क्रीडा संकुल समिती अक्कलकोटचे अध्यक्ष सचिन कल्याणशेट्टी यांच्या सततचा पाठपुरावा आणि प्रयत्नातून ३ कोटीचा निधी प्राप्त झाला आहे. यामध्ये योग विज्ञान केंद्र, स्वच्छ व शुद्ध पिण्याच्या पाण्याची सुविधा, अंतर्गत रस्ते, वॉकींग ट्रॅक, ४०० मीटर धावणे मार्ग, मैदान संपाटीकरण, तसेच विद्युतीकरण इत्यादी बाबींवर उपरोक्त निधीचा वापर होणार आहे. त्यामुळे जिल्हयामध्ये अक्कलकोट तालुका क्रीडा संकुल सर्व सोयीसुविधा युक्त असे संकुल होणार आहे. याचा लाभ खेळाडू आणि नागरिक यांना होणार आहे. यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, पालकमंत्री जयकुमार गोरे आणि क्रीडा व युवक कल्याणमंत्री दत्तात्रय भरणे यांचे सहकार्य लाभल्याचे कल्याणशेट्टी यांनी स्पष्ट केले.

# योगासन स्पर्धेत कस्तुरबाई महाविद्यालयाची कामगिरी



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २८ जुलै-**

जिल्हास्तरीय योगासन स्पर्धेमध्ये कस्तुरबाई कॉलेज ऑफ एज्युकेशनमधील सहा विद्यार्थी शिक्षकांनी ट्रॅडिशनल एकल, फॉरवर्ड बेंड एकल, बॅकवर्ड बेंड एकल, ट्विस्टिंग बॉडी एकल, सुपायन पो एकल व तालात्मक युगल अशा विविध योगासन प्रकारांमध्ये वरिष्ठ गटातून सहभाग घेऊन कामगिरी केली. महाराष्ट्र योगासन स्पोर्ट्स असोसिएशन व सोलापूर जिल्हा योगासन स्पोर्ट्स असोसिएशन तसेच सोलापूर जिल्हा योग परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित ही स्पर्धा कै. वि. मो. मेहता माध्यमिक शाळा जुळे सोलापूर येथे पार पडली.

या स्पर्धेत मुलींमधून मानसी गांधी व श्रुतिका लोंढे यांना तालात्मक युगल मध्ये सिल्वर मेडल तर ट्रेडिशनल एकल मधून दिपाली दुरुगकर यांना ब्राँझ मेडल प्राप्त झाले. मुलांमधून शिवम आरे यांना फॉरवर्ड बेंड व ट्विस्टिंग बॉडी या योग प्रकारातून प्रत्येकी एक सिल्वर मेडल मिळाले. आशुतोष जाधव यास बॅकवर्ड बेंड या स्पर्धेत सिल्वर मेडल मिळाले. आणि ओंकार काकडे यांना सुपायन पो मध्ये ब्राँझ मेडल मिळाले. संस्थेचे सचिव डॉ. रणजीत गांधी सर्व विश्वस्त, प्राचार्य डॉ. अश्विन बोंदार्डे व सर्व प्राध्यापक वृंद यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

# सुमतीबाई स्कूलच्या सानिका शिंदे हिची राज्य योगासन स्पर्धेसाठी निवड



**सोलापूर, दि. २८ जुलै-**

पी. एस. स्कूलच्या सानिका शिंदे हिची ऑगस्ट महिन्यात होणाऱ्या राज्य योगासन स्पर्धेसाठी निवड झाली. वि.मो. मेहता प्रशालेत झालेल्या जिल्हा योगासन स्पर्धेत सानिकाने कलात्मक युगल या प्रकारामध्ये प्रथम क्रमांक पटकाविला. तिला योगगुरु रोहन घाडगे, क्रीडा शिक्षक अजित पाटील व सोम नाथ मगर यांनी मार्गदर्शन केले. तिचे मुख्याध्यापिका स्वाती कांबळे, पर्यवेक्षक जयेश शिरढोणे, कल्पना रमावत व अर्चना अक्कलकोटे यांनी कौतुक केले.

# मयुरेश स्वामी, नैतिक होटकर, जय आणेराव यांची आघाडी

**जगन्नाथ शिंदे चॅम्पियन चषक स्पर्धा क्रमांक तीन**

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २८ जुलै-**

जगन्नाथ शिंदे चॅम्पियन चषक बुद्धिबळ स्पर्धेत १४ वर्षाखालील गटात मयुरेश स्वामी, नैतिक होटकर, जय आणेराव या खेळाडूंनी पाच पैकी पाच गुण मिळवून आघाडी घेतली आहे. त्यांनी अनुक्रमे विहान कोंगारी प्रसेंजित जांभळे प्रथम मुदगी यांना पराजित केले आहे

सुशील रसिक सभागृह येथे सुरू असलेल्या या स्पर्धेत साईराज घोडके व रुद्र फुले यांच्यात बरोबरी झाली आहे तर खुल्या गटात चौथ्या फेरी अखेर स्वप्निल हदगल सागर गांधी कोरे प्रज्वल पवार रणवीर चंद्रशेखर बसर्गीकर लिमकर वरद सानवी गोरे गोरे दत्तात्रय पवार सागर हे हे खेळाडू आघाडीवर आहेत या स्पर्धेत प्रमुख पंच म्हणून प्रशांत पिसे,इरान्ना जमादार, सम्मेद हुल्ले, सचिन चव्हाण, रोहित केशपाग, हरी ओम नाईक,मंगला हुल्ले हे स्पर्धेच्या यशस्वीतेसाठी विशेष प्रयत्न करत आहेत. ही स्पर्धा श्री रमा जगदीश बहूउद्देशीय महिला उत्कर्ष संस्थेच्या वतीने व सोलापूर डिस्ट्रिक्ट चेस असोसिएशनच्या सहकार्याने सुरु आहे.





# कॉम्रेड मॅरेथॉनमधील १३ फिनिशर्सचा वाघचवरे परिवाराकडून गौरव




**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २८ जुलै-**

दक्षिण आफ्रिकेत झालेल्या ९० किलोमीटर कॉम्रेड मॅरेथॉन स्पर्धा फिनिश करणाऱ्या १३ रनर्सचा गौरव १४ वेळा कॉम्रेड मॅरेथॉन फिनिश केलेले मुंबईचे सुप्रसिद्ध कॉम्रेड कोच सतीश गुजारन यांच्या हस्ते करण्यात आला.

हा कार्यक्रम नुकताच वाघचवरे एक्सीडेंट हॉस्पिटल, जुळे सोलापूर येथे पार पडला. यावेळी उपस्थित रनर्स व सोलापुरातील सायकलिस्ट यांचे स्वागत डॉ. शुभांगी वाघचवरे यांनी केले तर सर्व कॉम्रेड मॅरेथॉनर्सची ओळख डॉ. राजश्री वाघचवरे यांनी करून दिली. यामध्ये सांगलीचे अमित पेंडुलकर, स्वरूप पुजारी, इचलकरंजीचे सचिन बोरसे, इंडपूरचे संतोष वाघचवरे, संदीप जाधव, गोपीनाथ मोरे, पंढरपूरचे भारत ढोबळे, रवींद्र नागणे, बार्शीचे अनिल कांबळे, पुण्याच्या डॉ.स्मिता राहुल झांजुर्णे आणि सोलापूरचे डॉ.अभिजीत वाघचवरे, डॉ. सत्यजित वाघचवरे बंधू या सर्वांचे कार्यक्रमाच्या सुरुवातीला फेटे बांधून व गुलाब पाकळ्याची उधळण करून स्वागत करण्यात आले. प्रत्येक कॉम्रेड मॅरेथॉन फिनिशर्स यांनी आपला अनुभव सांगितला ते ऐकताना सोलापुरातील सर्व रनर्स व सायकलिस्ट उत्साहीत झाले होते. सर्व कॉम्रेड फिनिशर्सला डॉ. वाघचवरेंकडून एक सुंदर कॉम्रेड फिनिशर्सचे सन्मान चिन्ह व सोलापूरची ओळख असलेली उबदार चादर देऊन गौरविण्यात आले.

यावेळी सोलापूरच्या डॉ. वाघचवरे भावंडांचा मॅरेथॉन रनिंग चे ''वर्ल्ड रेकॉर्ड'' झाल्याबद्दल विशेष सत्कार करण्यात आला. याच कार्यक्रमाचा एक भाग म्हणून शनिवारी सोलापुरातील सर्व महिला सायकलीस्टना व रनर्सला आयर्न मॅन व कॉम्रेड फिनिशर असलेल्या पुण्याच्या डॉ. स्मिता राहुल झांजुर्णे/वाघचवरे यांचे महिलांनी त्यांच्या व्यस्त कौटुंबिक व्यापातून स्वतःचे शारीरिक व मानसिक आरोग्य कसे चांगले राखावे व त्यासाठी कसा वेळ द्यावा या संदर्भात मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. अभिजीत वाघचवरे यांनी केले.

# गुजरातची वैभवी त्रिवेदी विजेती, सोलापूरच्या पूजा सालगुडेला उपविजेतेपद

- **आयटीएफ एमटी ४०० वर्ल्ड मास्टर्स टेनिस अजिंक्यपद स्पर्धा**
- **मिश्र दुहेरीत संध्याराणी बंडगर व राजीव देसाई यांचा अंतिम फेरीत प्रवेश**





**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, २८ जुलै-**

सोलापूर जिल्हा लॉन टेनिस संघटना(एसडीएलटीए) यांच्या वतीने आयोजित व आयटीफ, एआयटीए, एमएसएलटीए यांच्या मान्यतेखाली होत असलेल्या एमएसएलटीए एसडीएलटीए आयटीएफ एमटी ४०० वर्ल्ड मास्टर्स टेनिस अजिंक्यपद स्पर्धेत ३० वर्षांवरील महिला गटात अंतिम फेरीत अव्वल मानांकित वैभवी त्रिवेदी हिने सोलापूरच्या पूजा सालगुडेचा ६-0, ६-0 असा एकतर्फी पराभव करून विजेतेपदाचा मान पटकावला.

एमएसएलटीए टेनिस सेंटर आणि इलीसीएम क्लब जामश्री कॉम्प्लेक्स सिद्धेश्वर पेठ, सोलापूर या ठिकाणीसुरु असलेल्या या स्पर्धेत ४० वर्षांवरील महिला गटात उपांत्य फेरीत अव्वल मानांकित सिद्धी खजुरियाने गुरवीर कौर तूरचा ६-१, ६-0 असा तर, बिगर मानांकित पारुल गुजरातीने दुसऱ्या मानांकित प्रणिता पेडणेकरचा ६-३, ४-६, १०-६ असा पराभव करून अंतिम फेरी गाठली. ५० वर्षांवरील पुरुष गटात उपांत्य फेरीत पहिल्या सामन्यात कुमुद्दीन खानने तिसऱ्या मानांकित आशिष पंतचा ६-४, ३-६, ११-९ असा कडवा प्रतिकार केला. अव्वल मानांकित पुण्याच्या सुनील लुल्ला याने आपल्या लौकिकाला साजेशी खेळी करत शंकर सुब्रमण्यमचा ६-२, ६-0 असा पराभव करून अंतिम फेरीत आपले स्थान निश्चित केले. ६0 वर्षांवरील पुरुष गटात दुसऱ्या फेरीत बिगर मानांकित लक्पा शेरपाने चौथ्या मानांकित शरद टाकचा ४-६, ७-६(५), १0-७ असा तर, अनिल कुमारने सातव्या मानांकित अरुण अग्रवालचा ६-0, ६-२ असा पराभव करून अनपेक्षित निकाल नोंदवला. सोलापूरच्या राजीव देसाईने आठव्या मानांकित शिरीष नांदुर्डीकरवर ६-२, ६-४ असा सनसनाटी विजय मिळवला.

४५ वर्षांवरील मिश्र दुहेरीत उपांत्य फेरीत सोलापूरच्या संध्याराणी बंडगर व राजीव देसाई या जोडीने बेंगळूरच्या स्मिता रवींद्र व निलेश रुंगठा या जोडीचा अडीच तास चाललेल्या अटीतटीच्या व रोमहर्षक सामन्यात ५-७, ६-२, १६-१४ असा सुपर टायब्रेक मधे पराभव करून अंतिम फेरीत प्रवेश केला.

**आज झालेले निकाल**

▸ **४० वर्षांवरील पुरुष: उपांत्यपूर्व फेरी:** संदीप पवार१ वि.वि.आशिष कनया ६–०, ६–२; रमजान शेख३ वि.वि.अविस समंता६–१, ६–०;

▸ **६० वर्षांवरील पुरुष : दुसरी फेरी:** भूषण चंद्र१वि.वि.रणदीप दत्ता ६–०, ६–०; परेश पटेल५वि.वि.विजय देसाई ६–१, ६–०; दीपंकर चक्रवर्ती६ वि.वि.मोहम्मद साब ६–१, ६–२; पवन जैन ३ वि.वि.सुदेश सिंग(भारत)६–१, ६–०;

▸ **६५ वर्षांवरील पुरुष: पहिली फेरी :** अजित भारद्वाज १ वि.वि.संन्यासी राव पल्सुप्लेट ६–०, ६–०; अजय तलवार३ वि.वि.विनायक गुजराथी ६–३, ६–३; रवीन चौधरी वि.वि.अनिल निगम४ ६–४, २–६, १०–७; अजय लखोटिया वि.वि.प्रदीप शर्मा ६–०, ६–०; राजेंद्र सिंग वि.वि.राजू बिद्री ६–४, ५–७, १०–८; विनय सिंग वि.वि.राकेश कोहली६–०, ६–०; प्रमोद दिक्षित वि.वि.ओपी दिक्षित२ ६–३, ६–१; मेहेर कोदुरी वि.वि.प्रभुदयाल मीना६–१, ६–१;

▸ **७० वर्षांवरील पुरुष: पहिली फेरी :** रत्नाकरराव अणे वि.वि.शिवाजी चव्हाण ६–०, ६–१; एसजेएस रंधवा४ वि.वि.पर्वतसम गिनागम ६–०, ६–२; एकनाथ किणीकर वि.वि.अरविंद भसीन ६–०, ६–२; ताहिर अली३ वि.वि.श्रीनिवासन अय्यर ६–१, ६–२; राजेंद्रसिंग राठोड वि.वि. दिलीप देसाई ६–१, ६–०; महेंद्र कक्कड वि.वि.नरहरी कडेकर ६–०, ६–१;

# स्वच्छता मोहिमेच्या दुसऱ्या दिवशी ५ स्मशानभूमींची साफसफाई

## मोहिमेत एकूण १८ टन कचरा उचलला

## ८८ सेवक, ५ जेसेबी व 3 डंपर अशी राबली यंत्रणा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २८ जुलै-**

महापालिकेची स्वच्छता मोहीम ५.० अंतर्गत शहरात असलेल्या स्मशानभूमीमध्ये विशेष स्वच्छता मोहीम राबविण्यात येत आहे. मोहिमेच्या दुसऱ्या दिवशी सोमवारी एकूण कर्मचाऱ्यांच्या माध्यमातून ५ स्मशानभूमीची स्वच्छता करण्यात आली. आज एकूण १८ टन कचरा संकलित करण्यात आला. यामुळे स्मशानभूमींचा परिसर चकाचक झाला.



सोलापूर शहरात असलेल्या स्मशानभूमीमध्ये अंत्यसंस्काराच्या वेळी वापरण्यात आलेल्या साहित्य तसेच तेथील झाडामुळे निर्माण होणारा कचरा पावसामुळे जागेवर कुजून त्यामुळे दुर्गंधी पसरून नागरिकांचे आरोग्य धोक्यात येण्याची शक्यता असते. यामुळे आयुक्त सचिन ओम्बासे यांच्या आदेशानुसार अतिरिक्त आयुक्त रवि पवार व सहाय्यक आयुक्त शशिकांत भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली दि.२८ जुलै २०२५ रोजी सोलापूर महानगरपालिका घनकचरा व्यवस्थापन विभागाकडील १ ते ८ विभागीय कार्यालयांतर्गत असलेल्या स्मशानभूमीच्या कार्यक्षेत्रामध्ये स्वच्छता मोहीम राबविण्यात येत आहे. या स्वच्छता मोहिमेच्या आज सोमवारी दुसऱ्या दिवशी एकूण ५ स्मशानभूमीची स्वच्छता करण्यात आली. दैनंदिन कचरा संकलना व्यतिरिक्त आज घेण्यात आलेल्या मोहिमेमध्ये एकूण १५ ते १८ टन इतका कचरा संकलित करण्यात आला. जेसीबीच्या साह्याने स्मशानभूमी परिसरातील झाडी, झुडपे काढली. साचलेली माती हटविण्यात आली. कोपरा न कोपऱ्यातील साफसफाई करण्यात आली. कचरा उचलण्यात आला. या मोहिमेमध्ये एकूण ८८ सेवक ५ जेसेबी व ३ डंपर अशी यंत्रणा कार्यरत होती. महापालिका घनकचरा व्यवस्थापन विभाग तसेच मुख्य सफाई अधीक्षक नागनाथ बिराजदार, सफाई अधीक्षक अनिल चराटे, विभागीय अधिकारी, मुख्य आरोग्य निरीक्षक, आरोग्य निरीक्षक व अवेक्षक यांचे नियंत्रणाखाली सर्व झाडूवाला/झाडूवाली, बिगारी, सफाई कामगार, मजूर यांचे समन्वयाने ही मोहीम राबविण्यात आली.

### मोहिमेत या स्मशानभूमीची केली स्वच्छता

या स्वच्छता मोहिमेच्या पहिल्या दिवशी ८ स्मशानभूमीची साफसफाई करण्यात आली होती. त्यानंतर आज सोमवारी दुसऱ्या दिवशी लक्ष्मी नगर बाळे, भीम नगर-सोरेगाव,रूपाभवानी, अक्कलकोट रोड हिंदू स्मशानभूमी व कोयना नगर - देगाव येथील या ५ स्मशानभूमी परिसरातील स्वच्छता करण्यात आली. यामुळे येथील परिसर चकाचक झाला असल्याचे पाहायला मिळाले.

### अतिरिक्त आयुक्त रवी पवार यांनी केली प्रत्यक्ष पाहणी

महापालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन विभागाचे नियंत्रण अधिकारी तथा अतिरिक्त आयुक्त रवी पवार यांनी आज या स्वच्छता मोहिमेची प्रत्यक्ष पाहणी केली. कोयना नगर स्मशानभूमी येथील कामाची ऑन द स्पॉट पाहणी करून संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांना आवश्यक त्या सूचना दिल्या.

**सोलापूर महानगरपालिका, सोलापूर**
इंद्रभुवन पुण्यश्लोक अप्पासाहेब वारद पथ,
डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक, रेल्वे लाईन्स, सोलापुर ४१३००१

**Expression of Interest**

सोलापूर महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रात स्मार्ट सिटी अंतर्गत विकसित केलेले रंगभवन प्लाझा आहे त्या स्थितीत ताब्यात घेऊन व त्याचे देखभाल दुरुस्ती करुन कार्यान्वित ठेवणेकामी अनुभवी अभिकर्ते, इच्छुक व्यक्ती / संस्थेकडुन EOI मागविण्यात येत आहे. तरी अनुभवी अभिकर्ते, इच्छुक व्यक्ती / संस्थां यांनी दि. ०८/०८/२०२५ अखेर भुमी व मालमत्ता विभाग, सोलापुर महानगरपालिका, सोलापूर याठिकाणी आपले अर्ज दाखल करण्यात यावे.

टीप : १. हि जाहिरात फक्त EOI मागविण्यापुरती असुन, यामधुन कोणत्याही प्रकारे थेट कामगिरीचे / कंत्राटाचे आश्वासन दिले जात नाही.
२. कोणतेही अर्ज स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा संपुर्ण अधिकार मा. आयुक्त, सो.म.पा. यांनी राखुन ठेवला आहे.
३. अर्ज दाखल झालेनंतर मा. आयुक्त यांचे आदेशानुसार पुढील उचित कार्यवाही ठेवणेत येईल.

सही/-
(आशिष सुमन सधाकरराव लोकरे)
उपायुक्त तथा नियंत्रण अधिकारी
भुमी व मालमत्ता कार्यालय, सो.म.पा.

# लगतची पडीक जागा घेऊन डॉ. आंबेडकर उद्यानाचा विस्तार करावा

## विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर उद्यान कृती समितीचे आयुक्तांना निवेदन

**सोलापूर, दि. २८ जुलै-**

सम्राट चौक जवळील न्यू बुधवार पेठ येथील विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर उद्यान लगतची पडीक जागा घेवून उद्यानाचा विस्तार करण्यात यावा या मागणीचे निवेदन विश्वरत्न डॉ. आंबेडकर उद्यान कृती समितीचे अध्यक्ष अशोक जानराव यांच्या नेतृत्वाखाली महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांना देण्यात आले.



न्यु बुधवार पेठ, मसरे माळा येथील टी.पी.२ फायनल प्लॉट नं.४८, भाग-९ येथे विश्वरत्न डॉ. आंबेडकर उद्यान सोलापूर महानगरपालिकेने विकसित केले आहे. सध्याच्या उद्यानाची जागा ८८ हजार चौरस फुट इतकी आहे. येथे डॉ. आंबेडकर पुर्णाकृती पुतळा उभा केलेला आहे. त्या शेजारीच मातोश्री रमाबाई आंबेडकर यांचाही पुर्णाकुती पुतळा उभा करण्याचे काम प्रस्तावीत असून ते काम पूर्ण करण्यात येत आहे. माता रमाईचा पुतळा उभा करण्यात येणार आहे. ५२ झाडे असलेला प्लॉट बाथरुम आणि २ पुतळयासाठी १ प्लॉट व्यापलेला आहे. लहान मुलांसाठी खेळणी, व्यायामाचे साहित्य यामध्ये १ संपूर्ण प्लॉट व्यापलेला आहे. १ प्लॉटमध्ये विविध कार्यक्रमासाठी ॲम्पी थिएटर बांधण्याचे काम चालू आहे. त्यामुळे श्रम परिहरासाठी मॉर्निंग वॉकसाठी येणाऱ्या कष्टकरी वृध्द व इतर नागरिकांना बाकीची जागा अपुरी पडत आहे. त्यामुळे या उद्यानाचा मोठ्या प्रमाणात विस्तार करण्याची गरज आहे. यावेळी प्रविण कांबळे, विनोद जाधव, आर. जे. गायकवाड, चित्ररंजन सातपुते, गोरख लोंढे, सरोजनी जानराव, धम्मरक्षिता कांबळे, सुमित्रा जाधव, मिनाक्षी बनसोडे, शाम शिंगे, भिमराव लोखंडे, अनिल जगझाप, रत्नदिप कांबळे, नागसेन माने, मुक्ता बनसोडे, मंगल दुडडे यांच्यासह पदाधिकारी व सदस्य उपस्थित होते.

# १ ऑगस्टपासून लागू होणार नवे यूपीआय नियम

**नवी दिल्ली :** १ ऑगस्टपासून यूपीआयमध्ये अनेक बदल होणार आहेत. आता तुम्ही कोणत्याही एका ॲपवरून दिवसातून ५० पेक्षा जास्त वेळा तुचा बँक शिल्लक तपासू शकणार नाही. ऑटोपे (जसे की ईएमआय, सबस्क्रिप्शन किंवा बिल पेंट) आता दिवसाच्या रँडम वेळेऐवजी निश्चित वेळेच्या स्लॉटवर होतील. जर पेंट अडकले तर तुम्ही त्याची स्थिती फक्त तीन वेळा तपासू शकता, तेही प्रत्येक वेळी ९० सेकंदांच्या अंतराने. एनपीसीआय म्हणते की यूपीआय सिस्टमवर खूप भार असतो, विशेषतः गर्दीच्या वेळी (सकाळी १० ते दुपारी १ आणि संध्याकाळी ५ ते रात्री ९:३०). वारंवार बॅलन्स किंवा व्यवहाराची स्थिती तपासल्याने सिस्टम मंदावते.

Classifieds

**भरतीविषयक**

**सिक्युरिटी गार्ड भरती चालू आहे. महिला व पुरुष ८ व १२ तासांसाठी सोलापूर शहर व MIDC योग्य पगार दिला जाईल. मो. ९७३६१२७९९९**

दै. सोलापूर तरुण भारत मध्ये प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातींमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसारच प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही मजकुराच्या सत्यतेबाबत दै. सोलापूर तरुण भारत हमी घेऊ शकत नाही, याची वाचकांनी नोंद घ्यावी.

**जाहीर नोटीस**

तमाम लोकांस विशेष करून सिंधूबाई नामदेव बाळखुडे, मंगल मनोहर गोडसे, लक्ष्मी महादेव बजळबे, आशाताई बाळू नरळे, सुशिलाबाई मनोहर कर्चे, रतन गणपत खिलारे, शोभा विजय कर्चे, सुरेखा सोमनाथ कुटे, आनंद विठ्ठल कुटेकर व नंदाबाई विठ्ठल मुटेकर यांचे वारस यांना कळविणेंत येते की, मौजे ढेंबरेवाडी ता. बार्शी जि. सोलापूर येथील गट नंबर १८ ही जमिन आमचे आशिलांची वडिलोपार्जित इस्टेट आहे. सदर जमिनीमध्ये आमच्या आशिलांचे अविभक्त हिस्से आहेत. तुम्ही तुमच्या जमिनीतील हिस्से हस्तांतर करणेचे विचारात असलेमुळे व आमचे आशिल तुमचे लगत पक्षकार असलेमुळे आमचे आशिलास तुमचे हिस्से खरेदी करणेचा अग्रहक्क असलेमुळे आमचे आशिलांनी तुमचे हिश्श्याची जमिन खरेदी करणेची दिनांक १५/०७/२०२५ रोजी इच्छा प्रदर्शित केली होती. परंतु तुम्ही तुमची जमिन आमचे आशिलांना खरेदी देणेस नकार दिला आहे. तरी तुम्हास या नोटीसीने असे कळविणेत येते की, उपरोक्त जमिनी संदर्भाने बार्शी येथील दिवाणी कोर्टामध्ये जमिनीचा दावा प्रलंबित आहे. तुम्हास तुमची जमिन विक्री करावयाची झाल्यास आमचे आशिलास विक्री करावी तुम्ही इतरांना जमिन विक्री केलेस आमचे आशिल तुमची जमिन अग्रहक्काने खरेदी करणेसाठी कोर्टात दावा करतील. तसेच तुम्ही अनाधिकारे जमिन विक्री करुन खरेदीदाराची फसवणुक होऊ नये म्हणून ही जाहीर नोटीस दिली असे. ता. २८/०७/२०२५.

सही/-
पी.डी उबाळे (म्हैसगावंकर) ॲडव्होकेट
फुले प्लॉट बार्शी ता. बार्शी मो. ९८८१८३०३५४/९४०३४९६१२३
(१) अशोक किसन दोडमिसे, २) वसंत लक्ष्मण दोडमिसे,
३) अनंत संभाजी दोडमिसे तर्फे ॲडव्होकेट)

# लंम्पी रोगा संदर्भात प्रशासनाकडे अधिकची माहिती विचारणार

**सोलापूर, दि. २८ जुलै-**

लंम्पी हा आजार खूप भयंकर रोग असून संसर्गजन्य असल्याने या विषाणूचा प्रसार हा बाधित गोमाता व जनावरांपासून निरोगी जनावरास स्पर्शाद्वारे जनावरे ही निरोगी जनावरांपासून वेगळे ठेवणे आवश्यक आहे. प्रशासनाने सरकारने खबरदारी म्हणून राज्य गोमाता व जनावरांचे बाजार भरू नये मौल्यवान जनावरांना एकत्रित आणू नये यासाठी जनावरांची वाहतूक देखील थांबवली पाहिजे. सदर रोग हा संसर्गजन्य असल्याने रोग आल्यानंतर उपचार करण्यापेक्षा रोग होवू नये याकरिता प्रतिबंधात्मक उपाययोजना करणे व रोग आल्यास त्याचा प्रसार होऊ नये याकरिता आवश्यक ती काळजी घेणे महत्त्वाचे आहे. याबाबतची अधिकची विचारना केतन शहा यांनी जिल्हाधिकारी कुंभार आशीर्वाद यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे. सोलापूर जिल्ह्यांत मृत पशुधनांच्या आकडेवारी सोलापूर ५६४, या जिल्ह्यांमध्ये मृत पशुधनाचे प्रमाण सर्वाधिक आहे. आपल्या जिल्ह्यातील लम्पी चर्मरोग प्रादुर्भावामुळे बाधित झालेल्या पशुधनातील मृत पशुधनाचे प्रमाण जास्त आढळून येत असून या बाबत तात्काळ माहिती द्यावी अशी मागणी ही जिल्हाधिकाऱ्यांकडे करण्यात आली आहे. दोषींवर सखोल चौकशी करून त्यांच्यावर कारवाई गरजेचे आहे.

**जाहीर प्रसिध्दीकरण** — दिवाणी किरकोळ अर्ज नं.८३/२०२५

**बार्शी येथील मे. जिल्हा व सत्र न्यायाधिश साहेब यांचे कोर्टात**

१) **सुरेखा भरत यादव,** वय- ५५ वर्षे, धंदा- मजुरी/ घरकाम, रा. भुताष्टे ता. माढा जि. सोलापुर मो.नं. ९६०४८२१४४५
२) **गणेशराज भरत यादव,** वय- २७ वर्षे, धंदा- काही नाही, रा. सदर, यांची पालनकर्ता म्हणुन आई अर्जदार नं. १ सुरेखा भरत यादव — अर्जदार

विरुध्द

महाराष्ट्र शासन - सामनेवाला

ज्याअर्थी, यातील अर्जदार यांनी मौजे भुताष्टे येथील जमीनीचे वर्णन : शेतजमिन गट नं. ७४/२/ब याचे एकुण क्षेत्र ०१ हे ५१ आर आकार ०० रु. ७० पैसे यासी चतुः सिमा पुर्वेस - गट नं. ७४/२/अ चे क्षेत्र, दक्षिणेस गट नं. ७१/१/अ चे क्षेत्र, पश्चिमेस गट नं. ३७ चे क्षेत्र, उत्तरेस- चिंचोली लऊळ रस्ता. पैकी महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ पुणे-११ अंतर्गत सिना माढा प्रकल्प उपविभाग क्र. ३ भिमानगर अंतर्गत उजवा कालवा वितरीका क्र. १ वरील उजवी लघु वितरीका क्र. १ करीता भुसंपादीत होणारे ०० हे १० आर क्षेत्र ही शेतजमिन खरेदीदेणेकामी परवानगी मिळणेसाठीचा अर्ज मे. कोर्टात आणलेला असून सदर शेतजमिन खरेदीदेणेकामी कोणाची कोणत्याही प्रकारचा हरकत असेल तर किंवा सदर मिळकतीसंबंधी कोणताही खरेदी, विक्री, गहाण, दान, बोजा, लिज, चोळी, बांगडी, पोटगी, अथवा इतर कोणत्याही प्रकारचे हक्क हितसंबंध व हरकत असेल तर सदर प्रकरणाची पुढील नेमलेली तारीख दि.२५/०८/२०२५ रोजी या कामी मे. कोर्टात सकाळी ११.०० वा हजर राहुन कागदपत्रानिशी आपले म्हणणे अगर हरकत द्यावी. त्याअर्थी कोणाचेही काही म्हणणे / हरकत न आल्यास सदरील अर्जदारांना सदर शेतजमिन विक्री करणेबाबत परवानगी देण्यात येईल. कळावे, हे जाहीर प्रसिध्दीकरण दिले ता. २८/७/२०२५

सही/- क. लिपिक — शिक्का — सही/- सहा. अधीक्षक, जिल्हा व सत्र न्यायालय बार्शी

**जाहीर प्रसिध्दीकरण**

पुढील नेमली तारीख : २०/०८/२०२५
दि.कि.अ.नं. ७९/२०२५
नि.५

**बार्शी येथील मे. अपर जिल्हा न्यायाधिश यांचे न्यायालयात**

**मयूर तुकाराम नेमाने,** वय १७ वर्षे, धंदा-शिक्षण, रा. चिखलठाण नं.१, ता. करमाळा, जि. सोलापूर अज्ञान याचे आ.पा.क.आई
**सुरेखा तुकाराम नेमाने** वय ४७ वर्षे, धंदा-शेती, घरकाम, रा. सदर — अर्जदार

विरुध्द

महाराष्ट्र शासन - सा.वाला

ज्याअर्थी डि. सोलापूर सब डि.व ता. करमाळा पैकी मौजे मांजरगाव हद्दीतील क.ग.नं. ६५/२ पैकी समाईकातील न विभागलेली अज्ञानाची सर्व क्षेत्र पो.ख.०.४९ आर आकार रु.०.०० पैसे यासी चतुःसिमा पुर्वेस - ग.नं.६५/१/अ.६५/१/ब, दक्षिणेस - ग.नं.६६, पश्चिमेस ग.नं.५२,५१/६ तसेच गाडीरस्ता, उत्तरेस- ग.नं. ६३/१अ, ६३/१ब, ६३/२ तसेच गाडीरस्ता येणेप्रमाणे जमीन आतील तदंगभूत वस्तुसह.

वर मिळकत अज्ञान अर्जदार यांचे मालकी कब्जे वहिवाटीची व ७/१२ हक्कपत्रकी नमूद असलेली मिळकत आहे. अर्जदार हा अज्ञान असून त्याचा सांभाळ शिक्षण, पालनपोषण सर्व कांही त्याची आई सुरेखा तुकाराम नेमाने हेच आई या नात्याने पाहते व तशी ७/१२ हक्कपत्रकी नोंद ही आहे. सदर मिळकत ही अज्ञान अर्जदाराचे शिक्षण, भवितव्याचा विचार करुन विक्री करणे गरजेचे झालेले आहे व तसा व्यवहारही बाजारभावाने किंमत ठरवून अर्जदाराचे अ. पा. क. आईने ठरवलेला आहे तथापी, अर्जदार हा अज्ञान असून त्याचे नावावरील मिळकत विक्री करण्यास मा. जिल्हा न्यायालयाची परवानगी आवश्यक आहे. सदरची कृती योग्य असून अज्ञानाचे हिताची आहे, असे कथन करुन अर्जदाराचे वतीने तिचे अज्ञान पालनकर्ता आईनी या मे. न्यायालयात अज्ञानाची मिळकत विक्री करणेस परवानगी मागणेचा अर्ज आणला आहे.

त्याअर्थी या जाहीर प्रसिध्दीकरणाने कळविण्यात येते की, अर्जदारांच्या वरील मागणी, कथनां संबंधाने कोणाचे कांही हरकती, तक्रारी, आक्षेप असल्यास वा सदर मिळकतीत अन्य कोणाचे कांही हक्क अधिकार असलेस संबंधीतानी ही जाहीर प्रसिध्दीकरण प्रसिध्द झालेपासून ३० दिवसाचे आत अगर पुढील नेमली तारीख २०/०८/२०२५ रोजी या मे. कोर्टात स्वतः अगर माहितगार वकीलामार्फत हजर राहून आपले लेखी म्हणणे, हरकती, सादर कराव्यात. मुदतीत कोणाच्याही हरकती न आल्यास मा. न्यायालयाचे प्रकरणी पुढील यथायोग्य आदेश होतील. हे जाहीर प्रसिध्दीकरण आमचे सहीनिशी व मे. कोर्टाचे शिक्क्यानिशी प्रसिध्दी केले असे. तारीख २८/०७/२०२५.

शिक्का — सही/- अधीक्षक, अपर जिल्हा न्यायालय, बार्शी

**IDFC FIRST Bank Limited**
(erstwhile Capital First Limited, amalgamated with IDFC Bank Limited and presently known as IDFC First Bank Limited) | CIN : L65110TN2014PLC097792
Registered Office: - KRM Towers, 8th Floor, Harrington Road, Chetpet, Chennai- 600031.
Tel : +91 44 4564 4000 | Fax: +91 44 4564 4022

IDFC FIRST Bank

**वित्तीय मालमत्तेची पुनर्बांधणी आणि सुरक्षा व्याज अंमलबजावणी कायदा, २००२ च्या कलम १३ (२) अंतर्गत सूचना**

खालील कर्जदार आणि सह-कर्जदारांनी आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड (पूर्वी कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये विलीन झालेले आणि सध्या आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड म्हणून ओळखले जाणारे) कडून खाली नमूद केलेले सुरक्षित कर्ज घेतले. खाली नमूद केलेल्या कर्जदार आणि सह-कर्जदारांची कर्जे त्यांच्या संबंधित मालमत्तेच्या गहाणखताने सुरक्षित करण्यात आली आहेत. त्यांनी संबंधित कर्ज करारांच्या अटी आणि शर्तींचे पालन केले नाही आणि ते अनियमित झाले आहेत, त्यांचे कर्ज आरबीआयच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार एनपी म्हणून वर्गीकृत करण्यात आले आहे. आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड (पूर्वीची कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये विलीन झालेली आणि सध्या आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड म्हणून ओळखली जाणारी) यांना त्यांच्याकडून देय असलेली रक्कम खालील तक्त्यात अधिक स्पष्टपणे वर्णन केलेल्या संबंधित सूचनांनुसार नमूद केली आहे आणि त्या रकमेवरील पुढील व्याज देखील लागू असेल आणि ते त्यांच्या संबंधित तारखांपासून लागू होणाऱ्या कराराच्या दरानुसार आकारले जाईल.

| अ. क्र. | कर्ज खाते क्रमांक | कर्जाचे प्रकार | कर्जदार आणि सह-कर्जदारांची नावे | कलम १३ (२) सूचना तारीख | कलम १३ (२) सूचनेनुसार थकबाकी रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 126726700 | मालमत्तेवर कर्ज | १. अमोल नागनाथ देवकर<br>२. सुरेखा नागनाथ देवकर | 30/06/2025 | रुपये 9,75,301.59/- |
| **मालमत्तेचा पत्ता**: सोलापूर, उपविभाग: पंढरपूर येथे असलेल्या मालमत्तेचा सर्व तुकडा आणि पार्सल, ग्रामपंचायतीच्या हद्दीत भोसे, गट क्रमांक ४५९ पैकी प्लॉट क्रमांक ३४, एकूण क्षेत्रफळ ५५७.४१ चौ. मीटर पैकी ३७१.६१ चौ. मीटर, आणि पूर्वेकडील सीमा: प्लॉट क्रमांक ३४ भाग, पश्चिमेकडील रस्ता, उत्तर: रस्ता, दक्षिणेकडील रस्ता: खुली जागा | | | | | |
| 2 | 106066000 | मालमत्तेवर कर्ज | १. ज्ञानेश्वर गणपत रेडे मालमत्ता<br>२. राजकुमार विष्णू रेडे | 16/07/2025 | रुपये 45,00,163.38/- |
| **मालमत्तेचा पत्ता** : पंढरपूर नगरपरिषदेचा तो सर्व तुकडा आणि पार्सल, प्लॉट क्रमांक १४ पैकी गट क्रमांक १०२/३, एकूण क्षेत्रफळ १३५ चौ. मीटर आमचे २७० चौ. मीटर, पंढरपूर येथे स्थित, तालुका: पंढरपूर, जिल्हा: सोलापूर, महाराष्ट्र-४१३३०४, आणि पूर्वेकडे: रस्ता, उत्तर: सर्वेक्षण क्रमांक १०२/१, पश्चिम: भूखंड क्रमांक १३, दक्षिणेकडे: भूखंड क्रमांक १४ चा उर्वरित क्षेत्र. | | | | | |
| 3 | 154636042 & 104132565 | मालमत्तेवर कर्ज | १. सत्यशरण सूर्यकांत बनजागोळे<br>२. फुलाबाई सूर्यकांत बनजागोळे | 24/05/2025 | रुपये 7,51,741.08/- |
| **मालमत्तेचा पत्ता**: ग्रामपंचायत मिळकत क्रमांक ७३/१, ७०० चौरस फूट क्षेत्रफळ असलेले संपूर्ण भाग आणि पार्सल, मौजे बोरेगाव येथे स्थित, ग्रामपंचायत बोरेगावच्या हद्दीत, उपविभाग: अक्कलकोट, विभाग: सोलापूर, महाराष्ट्र-४१३२२८, आणि पूर्वः रस्ता, पश्चिम: रस्ता, उत्तर: मुतन्ना बिराजदार, दक्षिण: कलप्पा सालुरे | | | | | |

या प्रकाशनाच्या तारखेपासून ६० दिवसांच्या आत तुम्हाला वरील तक्त्यात दाखवलेल्या तपशीलांनुसार आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड (पूर्वीची कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये विलीन झालेली आणि सध्या आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड म्हणून ओळखली जाणारी) कडे रक्कम त्यांच्या संबंधित तारखांपासून आणि इतर खर्च, शुल्क इत्यादींपासून करारबद्ध व्याजदरासह भरण्याचे आवाहन करण्यात येत आहे. असे न केल्यास, वर नमूद केलेल्या गहाण ठेवलेल्या मालमत्तेविरुद्ध कलम १३ (४) आणि कलम १४ अंतर्गत, आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड (पूर्वीची कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये विलीन झालेली आणि सध्या आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड म्हणून ओळखली जाणारी) देय रक्कम वसूल करण्यासाठी कार्यवाही सुरू करण्यास अधीन असेल. शिवाय, तुम्हाला सदर कायद्याच्या कलम १३ (१३) अंतर्गत सदर सुरक्षित मालमत्ता विक्री/भाडेपट्टा किंवा इतर कोणत्याही प्रकारे हस्तांतरित करण्यास मनाई आहे.

दिनांक : २९/०७/२०२५
ठिकाण : सोलापूर, महाराष्ट्र

सही/- अधिकृत अधिकारी
आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड
(पूर्वीची कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये विलीन झाली आणि सध्या आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड म्हणून ओळखली जाते)

**फेर जाहीर लिलाव - २**

**लोकमंगल नागरी सहकारी पतसंस्था, मर्या, सोलापूर**

**९४/२९ मंगल प्लाझा, जोडभावी पेठ, सोलापूर फोन नं. ०२१७-२७३५५३७**

**परिशिष्ठ-२०**

महाराष्ट्र सहकारी संस्थ अधिनियम १९६० चे कलम १५६ व महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ चे नियम १०७ यास अनुसरून लोकमंगल नागरी सहकारी पतसंस्था मर्या., सोलापूर या पतसंस्थेचे थकबाकीदार श्री. नानासाहेब ऊर्फे महेश रेवणसिध्दप्पा पाटील रा. होनमुर्गी, ता. दक्षिण सोलापूर, जि. सोलापूर यांची खालील नमुद केलेली पतसंस्थेस तारण असलेली स्थावर मालमत्ता त्यांचेकडील थकबाकी वसूलीसाठी विशेष वसुली अधिकारी यांनी दिनांक १८/०४/२०१७ रोजीच्या आदेशाने जप्त केलेली आहे. सदर स्थावर मिळकत मा. उपविभागीय अधिकारी दक्षिण सोलापूर यांचे आदेशाने मंडलाधिकारी दक्षिण सोलापूर यांनी ताब्यात दिलेली मालमत्ता असून खाली नमूद केलेप्रमाणे सदर मिळकतीचा जाहीर लिलावाने विक्री करणेत येणार आहे. तरी इच्छुक खरेदीदारांनी सदर लिलावाचे वेळी हजर राहून लिलाव विक्रीमध्ये सहभागी व्हावे.

**स्थावर मिळकतीचे वर्णन**

| अ. क्र. | संस्थेचे नाव | थकबाकीदारांचे नांव व पत्ता | स्थावर मिळकतीचा तपशिल गट नंबर |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| | लोकमंगल नागरी सहकारी पतसंस्था मर्या. सोलापूर | श्री. नानासाहेब ऊर्फे महेश रेवणसिध्दप्पा पाटील रा. होनमुर्गी ता. दक्षिण सोलापूर जि. सोलापूर | मौजे होनमुर्गी ता. दक्षिण सोलापूर, जि. सोलापूर येथील गट नं. १२९ क्षेत्र ४.२२ |

| लिलावाची तारीख | लिलावाची वेळ | लिलावाची ठिकाण | शेरा |
|---|---|---|---|
| ४ | ५ | ६ | ७ |
| वार मंगळवार दि. ०२/०९/२०२५ | सकाळी ११.०० वाजता | लोकमंगल नागरी सहकारी पतसंस्था मर्या. सोलापूर प्रधान कार्यालय | |

टिप - १) लिलावाच्या शर्ती व अटी लिलावाचे वेळी वाचून दाखविणेत येईल.
२) लिलाव तारखेपूर्वी कर्जदाराने संपूर्ण व्याजासह रक्कम भरल्यास लिलाव रद्द करणेत येईल.
३) सदर मालमत्ता "जशी आहे जेथे आहे" या तत्वावर लिलाव करणेत येईल.

ठिकाण : सोलापूर
दिनांक: २८/०७/२०२५

शिक्का

सही/-
विशेष वसूली व विक्री अधिकारी
द्वारा लोकमंगल नागरी सहकारी पतसंस्था मर्या., सोलापूर

**हरवले आहे**

श्री. संदिप मोहन कासार रा. वैराग ता. बार्शी जि. सोलापूर आपल्या वखार केंद्रावर खालील माल साठवणुकीस ठेवलेला आहे. **वखार पावती क्र. 1817101534 दि. 14/11/2022 माल - सोयाबीन, पोते - 82, वजन - 41 क्विंटल.** सदर वरीलप्रमाणे वखार पावती माझ्याकडून गहाळ झाली आहे. सबब वखार पावतीच्या डुप्लीकेट वखार पावती तयार करून मिळावी. जेणेकरून सदर मालाची जावक घेणे सोईस्कर होईल, ही विनंती.

सही/-
श्री संदिप मोहन कासार
रा. वैराग ता.बार्शी जि. सोलापूर
मो. नं. ८६६८३४२८३८

**जाहीर नोटीस**

तमाम लोकांस विशेषतः मौजे रातंजन येथील तसेच आसपासचे परिसरातील तमाम लोकांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, **मिळकतीचे वर्णन** : डि. सोलापूर सब डि. वैराग व ता. बार्शी पैकी मौजे रातंजन हद्दीतील शेतजमीन ग.नं. १३०/२ याचे एकूण क्षेत्र ३ हे.४९ आर. यासी आकार रु. ०३.४० पैसे या वर्णनाची शेतजमीन ही रामेश्वर संतू बनसोडे व श्रीधर रामेश्वर बनसोडे यांचे एकत्रित मालकी हक्काची जमीन येणेप्रमाणे जमीन आतील तदंगभूत सर्व हक्कासहची शेतजमीन,

वर नमूद मिळकत ही अनुक्रमे रामेश्वर संतू बनसोडे व श्रीधर रामेश्वर बनसोडे यांचे सामाईक मालकी कब्जे वहिवाटीची असून ७/१२ हक्क पत्रकी नोंद आहे. सदर ७/१२ हक्कपत्रकी इतर अधिकारात गोपाळ गुंडो जोशी असे नावाची ताबा नाही अशी पोकळ नोंद आहे. परंतु त्यांचा वर नमूद मिळकतीशी काहीही संबंध, ताबा, नाही ते आमच्या कुटुंबाशी संबंधित नाहीत, सदर गोपाळ गुंडो जोशी हे हयात आहेत किंवा नाहीत याची देखील माहिती नाही. सदर मिळकतीमध्ये त्यांचा कधीही कब्जा नव्हता व नाही वहिवाट नव्हती व नाही त्यामुळे सदर नोंद पोकळ स्वरूपी असल्याने ती कमी होऊन मिळण्याकरिता आमचे अशिलाने अर्ज दिलेला आहे. तेव्हा या जाहीर नोटीसीद्वारे सर्वांना कळविण्यात येते की वर नमूद गोपाळ गुंडो जोशी हे हयात असल्यास अगर त्यांचे कोणी वालीवारस असलेस संबंधितांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाले पासून आठ दिवसाचे आत आमचे खालील पत्त्यावर कागदोपत्री समक्ष भेटून आमची खात्री करून द्यावी. मुदतीत कोणाचीही तक्रार न आल्यास प्रोसिजर प्रमाणे कार्यवाही होऊन सदर मिळकतीचे इतर अधिकारातील पोकळ नोंद कमी करण्यास कोणाची कसलीही हरकत नाही असे समजून सदर नोंद कमी करण्यात येईल याची नोंद घ्यावी. कोणाचीही फसगत होऊ नये म्हणून ही जाहीर नोटीस प्रामाणीक हेतुने प्रसिद्ध केली असे. ता.२७/०७/२०२५.

सही/-
श्री. नंदकिशोर नारायण पाटील
बी.ए. (ऑ), एलएल. बी. ॲडव्होकेट
लक्ष्मीनारायण निवास, शिवाजीनगर,
मु.पो.वैराग, ता. बार्शी, जि. सोलापूर
मो.नं. ९६५७६९३०५५
(अशिलातर्फे ॲडव्होकेट)

ओम नमः शिवाय — नीलकंठ

रिझर्व बँक ला.नं.-यू.बी.डी.महाराष्ट्र/१३८४ पी दि. ३ मार्च १९९७

**Neelkanth Co-op. Bank Ltd.**
42-B/3, Samrat Chowk, Budhwar Peth, Solapur-413002.

C.E.O. - 2621454/55
Phone Office : 2728105
2725011

**नीलकंठ को. ऑप-बँक लि., सोलापूर.**
४२ बी/३, सम्राट चौक, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२.
Email ID - ceo@neelkanthbank.com

**मागणी नोटीस**

ज्याअर्थी, निलकंठ को-ऑपरेटीव्ह बँक लि. म.स.का. १९६० अन्वये नोंदविलेली सहकारी बँक आहे. ज्याअर्थी खाली कॉलम नं. ३ मध्ये नमुद ऋणको यांनी, निलकंठ को-ऑपरेटीव्ह बँक लि. यांचेकडुन कर्ज घेतलेले आहे. सदर कर्जास कॉलम नं. ६ मध्ये नमुद मालमत्ता तारण दिलेली आहे. कर्जदाराने कर्जाची रक्कम न फेडल्यामुळे आर.बी.आय. चे नियमानुसार सदर कर्ज खाते एन.पी.ए घोषीत केलेले आहेत. म्हणुन बँकेचे प्रधिकृत अधिकाऱ्याने खालील कॉलम नं. ३ मध्ये नमुद ऋणको व त्यांचे जामिनदार यांना सुरक्षिता आणि पुर्नबांधनी वित्त मालमत्ता आणि अंमलबजावणी सुरक्षा हीत कायदा २००२ चे कलम १३(२) आणि नियम ३ सुरक्षितता हमी (अंमलबजावणी) नियमावली २००२ या कायद्यामधील तरतुदीनुसार मागणी नोटीस देऊन कलम ४ मधील नमुद थकीत रक्कमेची मागणी केली असुन सदर नोटीसीचे तारखेपासुन ६० दिवसाचे आत पैशाचा भरणा करण्याबाबत कळविलेले आहे. परंतु काही कारणामुळे काही ऋणको व त्यांचे जामिनदार यांना काही नोटीसीची बजावणी झालेली नाही. म्हणुन त्या सर्वांना ही नाहीर नोटीस काढण्यात आलेली आहे.

| क्र. | कर्ज खाते क्र. | ऋणको व त्यांचे जामिनदार | शिल्लक असलेले एकूण कर्ज | या तारखेस असलेले देणे | सुरक्षित मिळकत |
|---|---|---|---|---|---|
| १ | ६०१/६५२ डिमांड सिक्युअर्ड कर्ज. | १. मैनोद्दीन मोमीन अली शेख (कर्जदार)<br>२. सचिन नागेश चव्हाण (जामिनदार)<br>३. गौतम दयानंद रॉय (जामिनदार) | २५,३६,५१३=०० त्यापुढील व्याज व इतर रक्कम | ३१/१०/२०२४ | डि व सब डि सोलापुर तालुका उत्तर सोलापुर सो.म.पा. हद्दीतील, पुर्व मंगळवार पेठ, सी.स.नं. ३५१६/सी/१/ए/१, एकुण क्षेत्र ४६२.८९ चौ.मी. यापैकी पश्चिमेकडील क्षेत्र २९५.६१ चौ.मी., ''शिवरत्न गोल्ड पॅलेस'', ऑफिस नं. ४, पहिला मजला, कारपेट क्षेत्र ८.७५ चौ.मी., बिल्टअप क्षेत्र १०.१६ चौ.मी. जागा याची चतुःसिमा - पूर्वेस- सी.स.नं. ३५१६/सी/१ए/१/बी, पश्चिमेस- पॅसेज, दक्षिणेस- ऑफिस नं. ५, उत्तरेस- ऑफिस नं. ३. |
| २ | ६०२/६८४ डिमांड सिक्युअर्ड कर्ज. | १. मिनाक्षी कांतीलाल तोडकरमाळी (कर्जदार)<br>२. अरविंद शिवाजी चपने (जामिनदार)<br>३. नवनाथ कांतीलाल तोडकरमाळी (जामिनदार) | ३३,७६,३२८=०० त्यापुढील व्याज व इतर रक्कम | ३१/१०/२०२४ | डि व सब डि सोलापुर तालुका उत्तर सोलापुर सो.म.पा. हद्दीतील, पुर्व मंगळवार पेठ, सी.स.नं. ३५१६/सी/१/ए/१, एकुण क्षेत्र ४६२.८९ चौ.मी. यापैकी पश्चिमेकडील क्षेत्र २९५.६१ चौ.मी., ''शिवरत्न गोल्ड पॅलेस'', ऑफिस नं. ८, पहिला मजला, कारपेट क्षेत्र ९.७८ चौ.मी., बिल्टअप क्षेत्र ११.२५ चौ.मी. जागा याची चतुःसिमा - पूर्वेस- पॅसेज, पश्चिमेस- रस्ता, दक्षिणेस- ऑफिस नं. ७, उत्तरेस- ऑफिस नं. ९. |

वर कलम ३ मध्ये नमुद केलेले ऋणको व त्यांचे जामिनदार यांना वर नमुद कलम क्र. ४ मध्ये नमुद केलेली थकीत कर्ज रक्कम त्यावरील पुढील व्याज व इतर देणे यासह भरणा करण्याकरिता ही नोटीस बजावण्यात येत असुन सदरील नोटीस प्रकाशीत झालेल्या तारखेपासुन ६० दिवसाचे आत वर नमुद कलम क्र. ४ मध्ये नमुद केलेली थकीत कर्ज रक्कम त्यावरील पुढील व्याज व इतर देणे यासह भरणा बँकेत करण्याचा आहे. सदर रक्कम आपण वर नमुद मुदतीत न भरल्यास सुरक्षिता आणि पुर्नबांधनी वित्त मालमत्ता आणि अंमलबजावणी सुरक्षा हीत कायदा २००२ या कायद्यातील कलम १३(४) तरतुदींनुसार कर्जाच्या वसुलीकरीता तारण मालमत्तेबाबत पुढील कारवाई करण्यात येईल.
ही जाहीर नोटीस दिली

दि. : २९/०७/२०२५
स्थान : सोलापूर

सही/-
प्राधिकृत अधिकारी
निलकंठ को-ऑपरेटीव्ह बँक लि. सोलापुर

Shri Swami Samarth Ads

## महत्वाचे...



### साहित्यरत्न आण्णाभाऊ साठे जयंती अध्यक्षपदी ज्ञानेश्वर कांबळे

**अक्कलकोट, दि. २८ जुलै-**

साहित्यसम्राट लोकशाहीर आण्णाभाऊ साठे यांच्या १०५ व्या दिव्यांग्री उत्सव समिती अध्यक्षपदी ज्ञानेश्वर कांबळे यांची एकमताने निवड करण्यात आली. सदर निवड दिव्यांग्री उत्सव समितीचे संस्थापक अध्यक्ष किसन जाधव यांच्या उपस्थितीत लहुजी शक्ती सेनेचे जिल्हाध्यक्ष नागेश जाधव यांच्या अध्यक्षतेखाली झाली. याप्रसंगी लहुजी शक्ती सेनेचे जिल्हा संपर्कप्रमुख वसंत देडे यांनी विविध उपक्रम राबविण्याचे आवाहत प्रास्ताविकात केले. मातंग समाजाचे जेष्ठ समाजसेवक राजशेखर लोखंडे, महिपती क्षीरसागर, संतोष पारखे, दीपक देडे, पत्रकार स्वामीराव गायकवाड राजेश जगताप नंदकुमार जगदाळे आदि उपस्थित होते . जेष्ठ समाजसेवक राजशेखर लोखंडे यांनी अक्कलकोट येथे प्रथम जयंती उत्सव साजरा करण्याची प्रथा चालू केल्याचे सांगुन मिरवणुक बैलगाडी मध्ये काढल्याचे सांगून आठवणीना उजाळा दिला.




### शिक्षक पालक संघाच्या उपाध्यक्षपदी अमोल मंडलिक, उपाध्यक्षपदी रूपाली शिंदे

**वेळापूर, दि. २८ जुलै-**

शिक्षण प्रसारक मंडळ मंगळवेढा संस्थेच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त इंग्लिश स्कूल वेळापूर प्रशालेत शिक्षक-पालक सभेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी उपाध्यक्षपदी अमोल मंडलिक तर महिला उपाध्यक्षपदी रूपाली शिंदे यांची निवड करण्यात आली. ए.एम.अवताडे यांनी प्रास्ताविक केले. सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षातील शिक्षक पालक संघाची नवीन कार्यकारणी स्थापन करण्यात आली. यामध्ये शिक्षक पालक संघाच्या अध्यक्षपदी मुख्याध्यापक आर बी, पवार, उपाध्यक्ष अमोल मंडलिक, महिला उपाध्यक्षा रूपाली शिंदे, कोषाध्यक्ष श्रीनिवास होडगे, सचिव जी जी जगताप, सहसचिवा माधुरी बनकर, सदस्य साधू पिसे, रवि गुरव, गिरीष चव्हाण, शहीनाज आतार, माधुरी पनासे यांची निवड करण्यात आली. प्रशालेचे पर्यवेक्षक बी एस सावळे, मुख्याध्यापक पवार यांनी मार्गदर्शन केले. जी.जी. जगताप यांनी सूत्रसंचालन केले. नामदेव बावचे यांनी आभार मानले.

### मांडेगावची कन्या पूनम मिरगणे यांची सहाय्यक पोलीस निरीक्षकपदी पदोन्नती

**बार्शी, दि. २८ जुलै-**

तालुक्यातील मांडेगावची कन्या पूनम मच्छिंद्र मिरगणे पोलीस उपनिरीक्षक यांची सहाय्यक निरीक्षकपदी पदोन्नती करण्यात आली आहे. पूनम मिरगणे ह्या पोलीस उपनिरीक्षक म्हणून मुंबईमध्ये दादासाहेब नौरोजीनगर पोलीस स्टेशन, जुहू पोलीस स्टेशन सध्या अंधेरी पो. स्टेशन अशा मुंबईत नावाजलेल्या पो. स्टेशनमध्ये सेवा केली आहे. त्यांना या कार्यकाळात विविध पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. विशेष म्हणजे निर्भया अधिकारी म्हणून बेस्ट अधिकारी पुरस्कार आयपीएस अधिकारी विश्वास नांगरे पाटील यांच्या हस्ते देण्यात आला. त्याचबरोबर अपहरण केलेल्या मुलाला कर्नाटकमधून शोधल्यामुळे बेस्ट तपास अधिकारी म्हणून गौरवण्यात आले. शाळेत कॉलजमध्ये जाऊन पोलीस दीदी या कार्यक्रमांतर्गत मुलींना सक्षम बनवण्याचे काम करतात. त्याचबरोबर महिला व बालकल्याण अधिकारी म्हणून अनेक उपक्रम त्यांनी केले आहेत. यासाठी त्यांना विशेष पुरस्काराने ही सन्मानित करण्यात आले आहे. सध्या त्या अंधेरी पोलीस स्टेशन या ठिकाणी कार्यरत असून त्यांना सहाय्यक निरीक्षक पदी पदोन्नती मिळाली आहे. पदोन्नती झाल्याबद्दल त्यांचे सर्व स्तरावरुन कौतुक व शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.



# पंढरपुरात पूरसदृश्य स्थिती



## उजनी आणि वीर धरणातील पाण्यामुळे प्रशासनाचा सतर्कतेचा इशारा

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.२८ जुलै -**

भीमा आणि निरा नदीच्या खोऱ्यात सध्या दमदार पाऊस सुरु आहे. या दमदार पावसामुळे उजनी धरणातून सोमवारी सकाळी दहा वाजल्यापासून ६० हजार क्युसेकने भीमा नदीमध्ये पाणी सोडले जात आहे. वीज निर्मितीसह भीमा नदीपात्रात ६१ हजार ६०० क्युसेकने पाण्याचा विसर्ग केला जात आहे. पंढरपूर जवळ भीमा नदी सुमारे ४० हजार क्युसेकने सध्या वाहत आहे तर नीरा नरसिंहपूर येथील जो संगम आहे तेथून ६८ हजार ३५८ क्युसेकने विसर्ग भीमा नदीपात्रात सुरु आहे. असाच दमदार पाऊस सुरु राहिल्यास धरणातून सोडण्यात येणाऱ्या पाण्याच्या विसर्गामध्ये केव्हाही वाढ करण्यात येईल असे देखील धरण प्रशासनाकडून जिल्हा प्रशासनला कळविण्यात आलेले आहे.

दरम्यान वीर धरणातून नीरा नदी मध्ये सोमवारी सकाळी दहा वाजल्या पासून ३२ हजार ६६३ क्युसेक्सने पाणी सोडले जात आहे. नीरा नदीवरील वीर धरण ९६ टक्के भरलेले आहे. त्यामुळे धरणातून मोठ्या प्रमाणावर पाण्याचा विसर्ग सुरु करण्यात आला आहे. यापूर्वी वीर धरणातून २३ हजार ६४५ क्युसेक्सने पाणी सोडण्यात येत होता. मात्र सोमवारी सकाळी दहा वाजल्या पासून धरणातील पाण्याच्या विसर्गात वाढ करण्यात आली असून ३२ हजार ६०० क्युसेक्सने पाणी सोडले जात आहे. दरम्यान उजनी आणि वीर धरणातून मिळून जवळपास ९० हजार क्युसेक्स इतके पाणी सोडले जात आहे. म्हणून सोमवारी संध्याकाळ पासून मंगळवारी सकाळ पर्यंत भीमा नदीतील विसर्ग मोठ्या प्रमाणावर वाढणार आहे. त्यामुळे भीमा नदीकाठावरील गावांना तसेच पंढरपूर तालुक्यातील गावांना सतर्कतेचा इशारा देण्यात आलेला आहे.

### चंद्रभागा वाहू लागली दुथडी भरुन

उजनी आणि वीर धरणातून सोडल्या जाणाऱ्या मोठ्या प्रमाणावरील पाण्याच्या विसर्गामुळे येथील चंद्रभागा नदी सध्या दुथडी भरुन वाहू लागलेली आहे. चंद्रभागा नदीच्या पात्रातील मंदिरांना पाण्याचा वेढा पढलेला दिसत आहे. साधारणपणे मे महिन्या नंतर तिसऱ्यांदा पंढरपूरात पूरसदृश्य परिस्थिती निर्माण झाली आहे. शहरातील चंद्रभागा नदीवरील ब्रिटीशकालीन जुना दगडी पूल देखील पाण्याखाली गेलेला आहे. या बरोबरच चंद्रभागेच्या पैलतिरावरील इस्कॉन मंदिराच्या घाटाचा काही भाग देखील पाण्याखाली गेला आहे. चंद्रभागा नदीच्या विविध घाटांवर पोलिस प्रशासनाकडून भाविकांना चंद्रभागेच्या स्नानास जाण्यासाठी मज्ञाव करण्यात आला आहे. मात्र एकीकडे शहरात चंद्रभागा नदीला पूरसदृश्य परिस्थिती निर्माण झालेली असताना आपत्ती व्यवस्थापन विभागाची यंत्रणा कुठेही कार्यरत असल्याचे दिसत नाही. आषाढी यात्रेच्या काळात आपत्ती व्यवस्थापन विभागाने अनेक भाविकांचे प्राण वाचविले होते. मात्र सद्यस्थितीत ही यंत्रणा कुठे गायब झाली आहे सवाल नागरिकांतून उपस्थित केला जात आहे.

### भीमा आणि निरा खोऱ्यातील धरणातील पाणीसाठा

सध्या भीमा खोरे आणी घाटमाथ्यावर जोरदार पाऊस सुरु आहे. त्यामुळे भीमा आणि नीरा खोऱ्यातील धरणे ही झपाट्याने भरलेली आहेत. पिंपळगावजोगे धरण ५५ टक्के भरलेले आहे. माणिकडोह हे ३८.१६, यडगाव ६६.१३, वडस ७६.४१, डिंभे ८९.९७, घोड ८४.८६, विसापूर धरण शंभर टक्के, चिलेवाडी ८०.२४, कळमोडी शंभर टक्के, चासकमान ९१.५७, भामाआसखेड ८१.३०, वडीवळे ८७.३३,आद्रा शंभर टक्के,पवना ८६.३२ कासारसाई ८८.९८, मुळशी ८५.९५, टेंमघर ८८.४८, वरसगाव ९३.२६, पानशेत ९२.६९, खडकवासला ७७ टक्के भरलेले आहे. निरा खोऱ्यातील गुंजवणी ७७ टक्के, निरादेवघर ८७.३५, भाटघर ९७.३५,वीर ९५.३३, नाझरे शंभर टक्के या बरोबरच उजनी धरण ९७.१३ टक्के इतके भरलेले आहे.

### दोन महिन्यात चाळीस टीएमसी पाण्याचा विसर्ग

मे महिन्याच्या शेवटच्या आठवड्यापासूनच दमदार पावसाला सुरुवात झालेली आहे. त्यामुळे मे महिन्या पासून आज पर्यंत येथील चंद्रभागा नदी मध्ये तीन वेळा पूरसदृश्य परिस्थिती निर्माण झालेली दिसून येत आहे. साधारणपणे या दोन महिन्यात सुमारे ४० टिएमसी पाण्याचा विसर्ग करण्यात आलेला आहे.



### या धरणातून सोडले जाते आहे

भीमा खोऱ्यातील खडकवासला मधुन १८ हजार क्युसेक्स, निरा खोऱ्यातील वीर धरणातून ३२ हजार क्युसेक्स, घोड धरणातून १ हजार क्युसेक्स या बरोबर डिंभे आणि वडद या प्रकल्पातून देखील पाण्याचा विसर्ग केला जात आहे. चिलेवाडी धरणातून ३ हजार क्युसेक्स, कळमोडीतून ९१८ क्युसेक्स, चासकमान मधुन ९ हजार ५२० क्युसेक्सचा विसर्ग वडीवळे प्रकल्पातून १८५५ क्युसेक्स, आंद्रा मधुन ११५३ क्युसेक्स, पवना मधून ११०० क्युसेक्स, कासारसाई प्रकल्पातून ४१४ क्युसेक्स, मुळशी मधून ९ हजार ७०० क्युसेक्सने पाणी सोडले जात आहे.या बरोबरच खडकवासला साखळी धरण परिसरात देखील मोठ्या प्रमाणावर पाऊस सुरु आहे. खडकवासला धरणाच्या पाठीमागील जी धरणे आहेत त्यामधून देखील पाण्याचा विसर्ग केला जात आहे. टेमघर मधून ८ हजार ४७४, वरसगाव मधून ३ हजार ८, पानशेत मधून ३ हजार ८ क्युसेक्सचा विसर्ग सुरु आहे.

## डॉ. कलाम सरांचे कार्य प्रेरणादायी : डॉ. नगरकर

### ड्रीम फाउंडेशनच्या प्रेरणा पुरस्काराचे थाटात वितरण



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२८ जुलै-**

डॉ कलामांच्या दूरदृष्टीतून आज भारत महासत्ता बनण्याच्या उंबरठ्यावर आहे. भारताची अवकाश मोहीम, संरक्षण क्षेत्र, विविध शैक्षणिक कार्य कलामांच्या प्रेरणेने सुरू असल्याचे प्रतिपादन डीआरडीओचे वरिष्ठ वैज्ञानिक डॉ. अशोक नगरकर यांनी केले.

येथील द्वारकाधीश मंदिर सभागृहात ड्रीम फाउंडेशन, डॉ. कलाम कौशल्य विकास केंद्र व चाणक्य गुरुकुल आयोजित डॉ. कलाम राष्ट्र उभारणी प्रेरणा पुरस्कार वितरण कार्यक्रमात डॉ. नगरकर बोलत होते. अध्यक्षपदी वरिष्ठ वैज्ञानिक डॉ. व्यंकटेश गंभीर होते. यावेळी सहायक आयुक्त प्रकाश राठोड, एसव्हीसीएस संस्थेचे शांतय्या स्वामी, नितीन जाधव, संचालक अनअकॅडमी विश्वनाथ सोनटक्के, नितेश वेदपाठक, गणेश इरकल आदी उपस्थित होते. विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या शरण मठ संकुल अक्कलकोट, रवि राठोड, प्रा प्रबुद्धचंद्र झपके, शशिकांत अकळवाड, उद्योजक शीतल गांधी, अरुण तलिखेडे, वीरभद्र यादवाड, मल्लिकार्जुन पाटील, किशोर जाधव, संस्कार फाउंडेशनचे प्रमोद तमनावर, महारुद्र माडेकर, दत्तात्रय पाठक, सुधीर कडगंची, रूपा कणमुसे, भगवती गौरिमाता प्रश्नाला धोत्री, फर्जना बागवान यांचा डॉ. कलाम राष्ट्र उभारणी प्रेरणा पुरस्कार देऊन गौरव करण्यात आला.

सन्मानचिन्ह, सन्मानपत्र, शाल, फेटा व ग्रंथ पुरस्काराचे स्वरूप होते. ड्रीम फाउंडेशनचे काशीनाथ भतगुणकी यांनी प्रास्ताविक केले. कोल्हापूरचे केरबा पाटील, रुईचे इंद्रजित पाटील, सेवा फाउंडेशनचे राठोड, म. फुले विद्या संकुल पुणेचे डॉ व्ही,एस अंकलकोटे पाटील यांनी मनोगत व्यक्त केले. डॉ. गंभीर यांनी डॉ कलाम यांची पुण्यतिथी विशेष प्रेरणा दिवस म्हणून यापुढे साजरी व्हावी असा मनोदय व्यक्त केला. प्रा. स्वामिनाथ कलशेट्टी यांनी सूत्रसंचालन केले. संगीता भतगुनकी यांनी आभार मानले.

## कामगारांच्या विकासासाठी प्रशिक्षण शिबिराचे महत्त्व : प्रा. चंद्रहंस गंभीर




**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि.२८ जुलै-**

कामगारांच्या सेवेस संरक्षण, न्याय आणि त्यांच्या सामाजिक विकासासाठी प्रशिक्षण शिबिराचे महत्त्व आहे, असे प्रतिपादन भारतीय कामगार महासंघाचे राष्ट्रीय कार्याध्यक्ष प्राचार्य चंद्रहंस गंभीर यांनी केले.

भारतीय आझाद कामगार महासंघ, शाखा महाराष्ट्र राज्य यांचेवतीने आयोजित केलेल्या काम गार प्रतिनिधींच्या प्रशिक्षण शिबिरात ते बोलत होते. संतोष गुंड प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. श्री. गंभीर म्हणाले की, अभिव्यक्ती स्वातंत्र्य, क्षमता निर्माण, महिला कामगार नेत्यांचे सक्षमीकरण आणि संघटनात्मक विस्तार यासाठी प्रशिक्षण शिबिरांचे आयोजन केले जाते. या शिबिरात कृषी, औद्योगिक, शासकीय कर्मचारी संघटना, असंघटित कामगार, दुकान प्रतिष्ठान, वाहतूक संघटना, घरेलू महिला कामगार, हमाल -तोलार, अंगणवाडी, बालवाडी, ग्रंथालय आणि शिक्षक संघटनाचे प्रतिनिधी सहभागी झाले होते. नियोजन राज्य महासचिव बी आर. देशमुख यांनी केले होते.

कौशल्य विकास, क्षमता निर्माण, वेतनविषयक माहितीपूर्ण प्रशिक्षण तसेच मूलभूत कामगार कायद्यांचे उपयोजन व सामाजिक न्यायासाठी कृती कार्यक्रम हे प्रशिक्षणाचे मुख्य विषय होते. शिबिरात ॲड. शितल भोसले, नागनाथ सोनवणे, प्रदीप कांदे, भीमराव कदम, राधिका क्षीरसागर व बी आर.देशमुख यांनी मार्गदर्शन केले. ज्येष्ठ साहित्यिक दत्ता गोसावी, आदर्श शिक्षक शशिकांत चेचे, भाग शिक्षणाधिकारी भारत बावकर आणि सेवानिवृत्त शिक्षक पांडुरंग शिंदे यांचा उत्कृष्ट कार्याबद्दल सत्कार करण्यात आला. सूत्रसंचालन दिलीप साळवे यांनी तर आभार प्रदर्शन हेमंत मस्के यांनी केले. रामराजे सूर्यवंशी, भीमा मस्के, राजाराम माने, तेजस्विनी मस्के, मंदा बोकेफोडे, मनीषा देवरे, कुमुदिनी बावकर, विनोद गायकवाड यांनी परिश्रम घेतले.

## अवैध दारु विक्रीप्रकरणी दोनजणांना अटक; २० लिटर दारु जप्त

**बार्शी, दि.२८ जुलै-**

शहरात अवैध दारु विक्रीच्या दोन स्वतंत्र घटनांमध्ये बार्शी शहर पोलिसांनी तातडीने कारवाई करत दोन व्यक्तींना अटक केली आहे. या कारवाईत एकूण २० लिटर अवैध हातभट्टी दारु जप्त करण्यात आली असून, दोन्ही प्रकरणांमध्ये महाराष्ट्र दारुबंदी कायदा, १९४९ च्या कलम ६५(ई) अंतर्गत गुन्हे नोंदवण्यात आले आहेत.

पहिल्या घटनेत, बार्शी शहर पोलीस ठाण्याचे पोलीस कॉन्स्टेबल सचिन भारत देशमुख (पो.कॉ./१९७४) यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, संतोषी माता चौक, सुभाषनगर येथे गोपनीय माहितीच्या आधारे छापा टाकण्यात आला. यावेळी दत्तात्रय संभाजी सावंत (वय ४५, रा. संतोषी माता चौक, सुभाषनगर, बार्शी) याला एका प्लास्टिक कॅनसह अवैध दारु विक्री करताना आढळून आले. त्याच्याकडून १० लिटर हातभट्टी दारु (किंमत अंदाजे १००० रुपये) जप्त करण्यात आली. दारु विक्रीचा परवाना नसल्याचे सावंत याने कबूल केले. जप्त दारुपैकी १८० मिली नमुना तपासणीसाठी घेण्यात आला असून, उर्वरित दारु वाहतुकीस अयोग्य असल्याने जागेवर नष्ट करण्यात आली. दुसऱ्या घटनेत, पोलीस कॉन्स्टेबल अविनाश धिरु पवार (पो.कॉ./७८७) यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, त्याच दिवशी संतोषी माता चौक येथील नवलेच्या भट्टीमागे हिरा अर्जुन पेटाडे (वय ३७, रा. लहुजी चौक, बार्शी) याला दोन प्लास्टिक कॅनसह अवैध दारु विक्री करताना पकडण्यात आले. त्याच्याकडून १० लिटर हातभट्टी दारु (किंमत अंदाजे १००० रुपये) जप्त करण्यात आली. पेटाडे याच्याकडेही दारु विक्रीचा परवाना नव्हता. याप्रकरणीही १८० मिली दारुचा नमुना तपासणीसाठी घेण्यात आला असून, उर्वरित दारु नष्ट करण्यात आली. दोन्ही कारवाया पोलीस निरीक्षक बालाजी कुकडे यांच्या मार्गदर्शनाखाली झाल्या असून, यामध्ये पोहेकॉ/१६४ दबडे, पोहेकॉ/१९३ घाडगे यांच्यासह इतर कर्मचारी सहभागी होते. कारवाई दरम्यान दोन स्वतंत्र पंचनामे करण्यात आले असून, स्थानिक नागरिकांना पंच म्हणून बोलावण्यात आले होते. दोन्ही आरोपींविरुद्ध महाराष्ट्र दारुबंदी कायदा, १९४९ च्या कलम ६५(ई) अंतर्गत गुन्हे नोंदवण्यात आले.

## सिंहगडचे नियतकालिक 'अद्विक'चे कुलगुरुंच्या हस्ते प्रकाशन

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर,दि.२८ जुलै -**

तालुक्यातील कोर्टी येथील एस. के. एन. सिंहगड अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या वार्षिक नियतकालिक अद्विक २०२४ चे प्रकाशन पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. डॉ. प्रकाश महानवर व तारापाका विद्यापीठ चिली चे प्रा. डॉ. एडुआर्दो गॅल्वेझ सोटो, झागाझीग विद्यापीठ इजिप्तचे प्रा. डॉ. एम. ए. तौफिक यांच्या हस्ते संपन्न झाल्याची माहिती महाविदयालयाचे प्राचार्य डॉ. कैलाश करांडे यांनी दिली.

विद्यार्थ्यांच्या सुप्त कलागुणांना वाव मिळावा म्हणून महाविद्यालयात नियमित पणे विविध उपक्रम राबविले जातात. याचाच एक भाग म्हणून विद्यार्थ्यांच्या विचारांना व्यक्त करण्यासाठी अद्विक या नियतकालिकाचे प्रकाशन केले जाते. अव्दिक नियतकालिकात मायबोली, प्रयास, अभिमान, इंग्रजी व कलाव्दिक इ. विभागात विदयार्थ्यांनी वैचारिक लेखन केलेले आहे. या वर्षीचे नियतकालिक पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. डॉ. प्रकाश महानवर यांच्या हस्ते व इतर मान्यवरांच्या उपस्थितीत



प्रकशित करण्यात आले. या नियतकालिकासाठी डॉ. संपत देशमुख यांनी प्रमुख संपादक, डॉ. दिपक गानमोटे संपादक, गीतांजली देशमुख, प्रतीक कुलकर्णी, वैष्णवी पाटील, श्वेता पाटील, वैष्णवी माने, श्रावणी बुचके, कीर्ती पुजारी, कोमल जाधव, उमामा बेदरेकर, आणि शरयू जोशी यांनी विद्यार्थी संपादक म्हणून काम पहिले. या प्रकाशनाच्या सोहळयास उप-प्राचार्य डॉ. स्वानंद कुलकर्णी, ट्रेनिंग अँड प्लेसमेंट ऑफिसर डॉ. समीर कटेकर, डॉ. चेतन पिसे, डॉ. भालचंद्र गोडबोले, डॉ. श्याम कुलकर्णी, डॉ. श्रीगणेश कदम, डॉ. अल्ताफ मुलाणी, डॉ. बाळासाहेब गंधारे, डॉ. अतुल आराध्ये, डॉ. सोमनाथ कोळी, डॉ. सुभाष पिंगळे, डॉ.अनिल निकम, डॉ. शिवशंकर कोंडूरु, डॉ. यशवंत पवार, डॉ. सत्यवान जगदाळे, आदींसह महाविद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी कार्यक्रमास उपस्थित होते.

**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : **विवेक कृष्णाजी घळसासी**. ● समूह मुख्य संपादक : **दिलीप यशवंत पेठे**.● मुख्य संपादक :**प्रशांत वसंतराव माने** दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Website:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi -** Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Group Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/.** The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)